# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ४ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## AC चा स्फोट; झोपेतच ९ जण जळून खाक

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** दिल्लीतील विवेक विहार परिसरात आज पहाटे एका इमारतीला भीषण आग लागली. AC चा स्फोट झाल्याने ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या दुर्दैवी घटनेत ९ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात



आहे. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून १२ हून अधिक नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले आहे.

**पहाटेच्या वेळी काळाचा घाला-** घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ३:४७ च्या सुमारास अग्निशमन नियंत्रण कक्षाला आगीची माहिती मिळाली. ही आग विवेक विहारमधील एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर लागली आणि काही वेळातच तिने तिसऱ्या मजल्यालाही कवेत घेतले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. ढिगाऱ्यातून आणि धुराच्या लोटातून मार्ग काढत बचावकार्य सुरू करण्यात आले.

**गाढ झोपेत असताना 'बेड'वरच जळून खाक**

दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये एसीचा स्फोट झाल्याने आग वेगाने पसरली. तिसऱ्या मजल्यावरील रहिवाशांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी गच्चीच्या दिशेने धाव घेतली. मात्र, दुर्दैवाने गच्चीचा दरवाजा बंद असल्याने त्यांना बाहेर पडता आले नाही. त्यामुळे धुराने गुदमरून आणि आगीने होरपळून अनेकांचा मृत्यू झाला. दुसऱ्या मजल्यावर चार जणांचे मृतदेह आढळले असून, काही जणांच्या मृतदेहाची गाढ झोपेत असताना 'बेड'वरच राख झाली. अग्निशमन दलाने ☞(पान २ वर)

# नसरापूरप्रकरणी एसआयटी स्थापन, नराधमाला फाशी होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न: मुख्यमंत्री फडणवीस

### विशेष सरकारी वकिलांच्या नियुक्तीची शिफारस, राष्ट्रीय महिला आयोगाकडूनही प्रकरणाची गंभीर दखल

**मुंबई/ प्रतिनिधी :** नसरापूर येथे ६५ वर्षीय नराधमाने चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण राज्याात संतापाची लाट उसळली असून, तीव्र जनभावनेची दखल घेऊन शासनाने या प्रकरणाचा वेगाने तपास करण्यासाठी विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) स्थापना रविवारी केली. दरम्यान, यातील आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा व्हावी यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विशेष चौकशी पथकात दोन महिला अधिकाऱ्यांसह पुणे ग्रामीण पोलिसांमधील सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या एसआयटीमार्फत पुराव्यांची साखळी भक्कम करून आरोपीला कठोर कायदेशीर शिक्षा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

नसरापूर प्रकरणाची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली. या प्रकरणात आरोपीला कायद्याच्या चौकटीत जास्तीत जास्त शिक्षा मिळावी आणि पीडित बालिकेला न्याय मिळावा यासाठी आयोग शासनाला महत्त्वपूर्ण शिफारशी करणार आहे. न्यायप्रक्रिया जलदगतीने पार पडावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याची आणि हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याची शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांनी दिली. राष्ट्रीय महिला आयोगाने या घटनेचा तीव्र निषेध केला असून याला



'बालकांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन' म्हटले आहे. आयोगाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत आरोपीविरुद्ध अत्यंत कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले.

**पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून मदत-** या प्रकरणातील पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

स्थानिक आमदार शंकर मांडेकर यांच्या माध्यमातून मंत्री तटकरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. या कठीण प्रसंगी राज्य सरकार पीडित कुटुंबाच्या पाठीशी उभे असून, प्रकरणाचा जलद निपटारा व्हावा यासाठी सुनावणी जलदगती न्यायालयात होणार असल्याचे त्यांनी ग्रामस्थांना आश्वस्त केले.

**जलदगतीने खटला चालवणार : मुख्यमंत्री**

नराधमाला भर रस्त्यात फाशी देण्याची मागणी होत आहे. यासंदर्भातील नागरिकांचा रोष साहजिक असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, त्या नराधमाला कोणतीही पळवाट मिळणार नाही, अशा पद्धतीने हा खटला जलदगतीने चालविणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी जलद न्यायाचे लेखी पत्र ☞(पान २ वर)

# पश्चिम बंगालमधील महासंग्रामाचा आज निकाल

## १५ दिवस केंद्रीय सुरक्षा दलांच्या कंपन्या बंगालमध्येच तैनात

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-:** पश्चिम बंगालमधील २९४ जागांसाठी पार पडलेल्या महासंग्रामाचा ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीत केवळ सत्ताच नव्हे, तर राज्याची राजकीय दिशाही ठरणार असल्याने ही लढत अत्यंत अटीतटीची मानली जात आहे. सकाळी ८ वाजता टपाली मतदानापासून मोजणीला सुरुवात होईल. निकालानंतर होणारा संभाव्य हिंसाचार रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढील १५ दिवस केंद्रीय सुरक्षा दलांच्या कंपन्या बंगालमध्येच तैनात ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पीएम मोदी अमित शाहांसह तब्बल जवळपास १९ राज्यातील नेते ममतांविरोधात प्रचारात होते. केंद्रीय फौजा सुद्धा मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आल्या होत्या. त्यामुळे बंगालमध्ये यावेळी अटीतटीची लढत झाली आहे. तृणमूलची जबाबदारी एकहाती ममता बॅनर्जी यांच्याकडेच होती. बंगालमध्ये यंदा एकूण दोन टप्प्यात (२३ आणि २९ एप्रिल) मतदान पार पडले. मतदानाची एकूण टक्केवारी तब्बल ९२ टक्केच्या आसपास राहिली आहे. त्यामुळे मागील निवडणुकीच्या तुलनेत



वाढलेला आकडा कोणाला धक्का देणार याची सुद्धा उत्सुकता आहे. बंगाल विधानसभेच्या एकूण २९४ जागा असून बहुमतासाठी १४८ हा जादूई आकडा गाठणे आवश्यक आहे.

२०२१ मध्ये काय घडलं होतं?

गेल्या निवडणुकीत ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसने २१५ जागांसह दणदणीत विजय मिळवला होता. भाजपने ७७ जागा जिंकून प्रमुख विरोधी पक्ष म्हणून स्थान मिळवले होते.

दरम्यान, निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, हिंसाचार आणि तांत्रिक बिघाडामुळे मालदा आणि मुर्शिदाबादमधील काही केंद्रांवर (अंदाजे ८-१० केंद्रांवर) ३ मे रोजी पुन्हा मतदान घेण्याचे आदेश दिले होते.

यंदा भवानीपूरमधून ममता बॅनर्जी, नंदीग्राम आणि फाल्टा (अभिषेक बॅनर्जी यांचा मतदारसंघ) या जागांवर संपूर्ण देशाचे लक्ष आहे. तसेच सुवेंदु अधिकारी यांच्या प्रभावाखालील मेदिनीपूर पट्ट्यातील जागाही महत्त्वाच्या आहेत.

**भाजपकडून जोरदार प्रचार** -भाजपने कथित भ्रष्टाचार, ओबीसी आरक्षणातील तफावत, संदेशखाली प्रकरणावरून महिला सुरक्षा, घराणेशाही या मुद्द्यांवरून तृणमूलला लक्ष्य केले.दुसरीकडे ममतांनी 'बंगालची मुलगी' हे भावनिक आवाहन करत केंद्राकडून मिळणाऱ्या निधीत होणारा भेदभाव आणि बाह्य शक्तींचे आक्रमण यावर भर दिला. लक्ष्मी भंडार आणि आरोग्य साथी यांसारख्या लोककल्याणकारी ☞(पान २ वर)

# धाडसी घरफोडी, तब्बल १४ लाखांचा ऐवज लंपास

### साडेसात तोळे सोने, चांदीचे दागिने आणि अंदाजे दीड लाख रुपयांची रोकड चोरीला

**यवतमाळ / प्रतिनिधी::** अनोळखी चोरट्यांनी घरफोडी करीत तब्बल १४ लाखांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना महागाव तालुक्यातील उटी येथे शनिवारी मध्यरात्री उघडकीस आली. या घटनेत सुमारे साडेसात तोळे सोने, चांदीचे दागिने आणि अंदाजे दीड लाख रुपयांची रोकड चोरट्यांनी चोरून नेल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजू नानाराव गावंडे यांच्या राहत्या घरात चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत प्रवेश केला. घरातील आलमारीचे लॉकर तोडून चोरी करण्यात आली. विशेष म्हणजे, घरातील इतर वस्तूंना हात न लावता केवळ मौल्यवान दागिने



आणि रोकड यांनाच लक्ष्य करण्यात आले. त्यामुळे चोरट्यांनी घराची पूर्वमाहिती घेतली असावी, तसेच घरातील हालचालींचा अभ्यास करूनच हा डाव आखला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.

या घटनेमुळे उटी गावासह संपूर्ण महागाव तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना अधिकच तीव्र झाली आहे. रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणीही स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

आयपीएस हर्षवर्धन बीजे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा ☞(पान २ वर)

## ट्रॅव्हल्स-दुचाकी धडकेत दोघांचा मृत्यू, एक गंभीर

**चंद्रपूर/ वृत्तसंस्था- :** तळोधी-नागभीड मुख्य महामार्गावर सोनेवाट (तळोधी) परिसरात रविवारी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक युवक गंभीर जखमी झाला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून महामार्गावरील वाढत्या वेगामुळे आणि नियमभंगामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मृतांमध्ये जगदीश नामदेव नेवारे (वय २६, रा. मुरपार) व शारदा यादव दुधकुरे (वय १९, रा. तळोधी) यांचा समावेश आहे. तर पियूष उर्फ




मयूर कोहळे (रा. मुरपार) हा युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर गडचिरोली येथे उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तळोधीहून सोनेवाट मार्गे मुख्य रस्त्यावर ☞(पान २ वर)

## ..तोपर्यंत कुठल्याही राजकारण्याने माझ्या घरी येऊ नये

### पीडित मुलीच्या वडिलांनी स्पष्टच सांगितले

**पुणे / नसरापूर/ प्रतिनिधी : :** भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षीय निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. महाराष्ट्र दिनाच्या दिवशीच घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण राज्यात संताप व्यक्त होत आहे.

उन्हाळ्याच्या सुटीसाठी आई-वडिलांसोबत आजोळी आलेल्या चिमुकलीला आरोपीने 'वासरू दाखवतो' असे सांगत गोठ्याकडे नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करून हत्या करण्यात आली. इतकेच नव्हे तर



पुरावे लपवण्यासाठी आरोपीने मृतदेह गोठ्यातील शेणात पुरल्याची धक्कादायक माहिती तपासातून समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी भीमराव कांबळे (वय ६५, रा. साळवडे, ता. भोर) याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. गावात शोककळा पसरली असून नागरिकांकडून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

या घटनेनंतर पीडित मुलीच्या वडिलांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी म्हटले की, माझ्या मुलीला न्याय मिळत नाही☞(पान २ वर)






महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन अध्यक्षपदी

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची निवड

**पुणे/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (एमओए) च्या अध्यक्षपदी असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे



पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या असोसिएशनच्या विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्याच्या क्रीडा क्षेत्रात मोहोळ यांच्या निवडीमुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने हे पद रिक्त झाले होते. या पदावर अध्यक्ष नेमणे आणि इतर विषयासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये मोहोळ यांच्या नावाला ☞(पान २ वर)

## निकालापूर्वी बंगालमध्ये भाजप नेत्याच्या घरावर गोळीबार, दोघांना अटक

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आता काहीच तास शिल्लक आहेत. मात्र, त्यापूर्वी, काही समाजकंटकांकडून राज्यात दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यात सोमवारी (४ मे) विधानसभेच्या २९३ जागांचे निकाल जाहीर



होणार आहेत. मात्र त्यापूर्वीच उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील नोआपारा येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास भाजपचे संघटनात्मक जिल्हा सचिव कुंदन सिंह यांच्या घरावर दोन☞(पान २ वर)

## बारामती पोटनिवडणूक मतमोजणी ४ मे रोजी

**बारामती पुणे/ प्रतिनिधी ::** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान पार पडले असून, या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी (दि. ४) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोडाऊन, एमआयडीसी बारामती येथे सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मतमोजणीसाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी पूर्ण केली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली.

या मतमोजणीच्या कामकाजाकरिता पुरेशा अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात



आली आहे. निकालाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था बिघडू नये याकरिता पर्याप्त व पुरेसा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात असून, त्याअनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ईव्हीएम मशीनच्या मतमोजणीसाठी २० टेबल, तर पोस्टल मतपत्रिकांच्या मतमोजणीसाठा☞(पान २ वर)




# फोटो व्हायरलची धमकी; आरोपीला हिमाचलमधून अटक

## -अल्पवयीन मुलीचे छळ प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियावरील ओळखीचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलीचा छळ केल्याप्रकरणी बेनोडा पोलिसांनी उत्तर प्रदेशातील एका युवकाला अटक केली आहे. बाबू हसन (वय २२, रा. मुरादाबाद, उत्तर प्रदेश) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर पोक्सो व माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित १६ वर्षीय मुलीची दोन वर्षांपूर्वी इंस्टाग्रामवर आरोपीशी ओळख झाली होती. दोघांमध्ये सतत चॅटिंग सुरू असताना मुलीने त्याला स्वतःचा एक फोटो पाठविला होता. दरम्यान, जानेवारी महिन्यात नागपूर येथे भेट झाल्यावर आरोपीने तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी अश्लील चाळे केले आणि त्याचा फोटो काढल्याचा आरोप आहे. एप्रिल महिन्यात दोघांमध्ये वाद झाल्यानंतर मुलीने आरोपीला सोशल मीडियावर ब्लॉक केले. त्यानंतर संतापलेल्या आरोपीने मुलीच्या आईला फोन करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. पुढे त्याने मुलीचा फोटो आई व तिच्या आजीकडे पाठवून मानसिक छळ केल्याचे समोर आले. घटनेची गंभीर दखल घेत पीडित मुलगी व तिच्या आईने बेनोडा पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली. त्यावरून भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५, ७८, ७९, ३५१ तसेच पोस्को कायद्यांतर्गत कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम ६७(अ)ही जोडण्यात आले आहे. तपासादरम्यान आरोपी मुरादाबाद येथे नसून हिमाचल प्रदेशातील बिलासपूर येथे काम करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने तेथे जाऊन त्याला ३० एप्रिल रोजी ताब्यात घेत अटक केली. न्यायालयाने त्याला २ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

आरोपीकडून दोन मोबाईल फोन व पीडितेच्या आजीचा एक मोबाईल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये संबंधित फोटो आढळले आहेत. इतर कोणतेही आक्षेपार्ह साहित्य आढळले नसले तरी सर्व उपकरणांची न्यायवैज्ञानिक तपासणी करण्यात येणार आहे. दरम्यान, या प्रकरणात कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन अमरावती ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# 'बौद्धांचा स्वतंत्र कायदा' विषयावर सहविचार व जनजागृती सभा

## अमरावतीत ९ मे रोजी संबोधी हॉल, भीमटेकडी येथे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑल इंडिया ॲक्शन कमिटी फॉर बुद्धिस्ट पर्सनल लॉ, अमरावती जिल्ह्याच्या वतीने बुद्ध जयंतीच्या पावन पर्वावर एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. 'बौद्धांचा स्वतंत्र कायदा - सहविचार व जनजागृती सभा' या विषयावर ही सभा शनिवार, ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता संबोधी हॉल, भीमटेकडी, अमरावती येथे पार पडणार आहे.

बौद्धांच्या स्वतंत्र कायद्याचे सुमारे २०० पानांचे अभ्यासपूर्ण बिल भारत सरकारला २४ जुलै २०१८ मध्ये सादर करण्यात आले आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयावर चर्चा करणे आणि या महत्त्वपूर्ण कायद्याबाबत बौद्ध समाजात जनजागृती करणे, हा या सभेचा मुख्य उद्देश आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालयात बौद्धांच्या बाजूने प्रभावी युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील ॲड. शांती प्रकाश दिल्ली यांचा विशेष सत्कारही करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्षपद एस. बी. खोब्रागडे (समन्वयक, ऑल इंडिया ॲक्शन कमिटी, महाराष्ट्र) भूषवणार असून, उद्घाटन खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते होईल. प्रमुख अतिथी म्हणून सतवीर बौद्ध (हरियाणा), मनोज छापाणी (अमरावती), सुनील बौद्ध (दिल्ली), प्रदिप फुलझेले (कामठी), ॲड सत्यपाल कातकर, मधुकर कांबळे (तेलंगणा), प्रोफेसर मनिराम डेकाटे (मुंबई),प्रा. दिनकरराव तुरकाने आणि अरुण वानखडे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन इंगळे करतील. या सभेच्या यशस्वीतेसाठी संयोजक म्हणून धर्मा रामटेके, बाबुराव छापाणी मोहन, दिपक इंगळे, नयन मोंढे आणि भीमराव निसवाडे परिश्रम घेत आहेत. नियोजनात शामराव मोरे, नंदकुमार खंडारे, सुर्याभान बनसोड आणि खुशालराव अवसरमोल यांचा सहभाग आहे.

मुख्य आयोजक मनोज छापाणी मोहन यांनी अमरावतीतील तमाम बौद्ध बांधवांना या ऐतिहासिक लढ्यात सामील होण्यासाठी आणि माहिती जाणून घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# श्रीमती नरसम्मा महाविद्यालयातील १२ वी च्या विद्यार्थ्यांचे नेत्रदिपक यश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने वर्ग १२ वी चा निकाल नुकताच जाहीर केला असून यामध्ये स्थानिक नरसम्मा हिरया शैक्षणिक ट्रस्ट द्वारा संचालित श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नरसम्मा परिसर, किरण नगर, अमरावती येथील महाविद्यालयाचा निकाल ९२.३८ टक्के लागला. यामध्ये अनुक्रमे कला शाखा ७५ टक्के, वाणिज्य ८२.३५ टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल ९९.५० टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून सुमित सुधीर झोडे याने ८६.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच अस्मि प्रवीन कुकरेजा हिने ८५.८३ टक्के घेवून द्वितीय क्रमांक तर आशिता वर्गिस मैथ्यू हिने ८४.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

कला शाखेतून सायली गोविन्द तिरमनवार ८०.६७ टक्के गुण घेवून प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे. तर तनूजा सुभाष गायगोले हिने ७५.८३ टक्के गुण घेवून द्वितीय क्रमांकांचे यश संपादन केले तर संयुक्ता बाळापुरे या हिने ७३.६७ टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविलेला आहे. वाणिज्य शाखेतून अक्षरा नितिन म्हाला हिने ७८ टक्के गुण घेवून प्रथम क्रमांक मिळविला तर, अयान युनुस खान याने ७२.५० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक व मैत्री राजेशराव नागलकर या हिने ७२.०० टक्के गुण घेवून तिसरा क्रमांकाचा मान मिळविला आहे.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर भोंदू, संस्थेचे सचिव राम महाजन, डॉ. श्रीकांत काळीकर, समस्त विश्वस्त मंडळ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट, कला शाखाप्रमुख डॉ.सुमित पवार, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. निखिल मोहोड तसेच विज्ञान शाखा प्रमुख डॉ. शितल खापरे, डॉ. मंगेश तिहिले आणि सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी समस्त गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.



# प्रमोद पोकळे यांना संगीतरत्न माहुलकर स्मृती पुरस्कार

**अंजनगाव बारी/प्रतिनिधीः-** श्री गुरुदेव सेवा मंडळ, नागपूर यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार तसेच कला, साहित्य, सेवा, कृषी आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत विशेष योगदान देऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान म्हणून नुकतेच पुरस्कार प्रदान करण्यात आले. यांत संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल बडनेरा येथील प्रयोगशील संगीतकार तथा दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे यांना संगीतरत्न अण्णाजी माहुलकर स्मृती पुरस्कार देऊन एका जाहीर समारंभात आमदार प्रवीण दटके व आ. ॲड. अभिजीत वंजारी यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ११७ व्या ग्रामजयंतीनिमित्त श्रीगुरुदेव सेवाश्रम, नागपूर येथे संपन्न झालेल्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार ॲड. अभिजीत वंजारी, आमदार प्रवीण दटके, ॲड. अशोक यावले, दिलीप सुरकार, पुरोगामी विचारवंत देविदास घोडेस्वार, नगरसेविका कांचन चव्हाण, संगीता जावळे, रामदास टेकाडे, राजेश कुंभलकर, विठ्ठल पुनसे, राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ, नागपूरचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते आयोजित समारंभात विविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले.



# 'गायब होणार' आपली सावली ७ ते २६ मे येणार शून्य सावलीचा अनुभव

**अमरावती/प्रतिनिधीः-** सूर्य अगदी ९० अक्षाच्या कोनात डोक्यावर येणार असल्याने ७ मे पासून महाराष्ट्रातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या तारखेला दुपारी १२ वाजता सावली गायब होण्याचा अनुभव घेता येणार आहे. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन रेषांच्या मधल्या पट्ट्यातच सूर्यकिरणे क्रमाक्रमाने लंबरूप पडतात. त्यामूळे या भागातूनच वर्षातून दोनदा शून्य सावलीचा अनुभव घेता येतो. आपली सावली आपल्या पायातच राहील तर सरळ उभ्या वस्तूची सावलीच दिसणार नाही.

कर्कवृत्तांच्या उत्तरेकडे आणि मकरवृत्ताच्या दक्षिणेकडे सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. त्यामूळे तेथे नेहमी तिरपी सावली पडते. पृथ्वी अक्ष जर सरळ ९० अंक्षात असता तर विषुववृत्तावरच नेहमीसाठी शून्य सावली अनुभवता आली असती. सूर्य दररोज ०.५० अंशच सरकतो म्हणून तो एकाच अंशावर दोन दिवस राहतो. अक्षांशावर येणाऱ्या सर्व परिसरात एकाच वेळी शून्य सावलीचा अनुभव येतो. वस्तूसमांतर पृष्ठभागावर एखादा दंडगोल, पेन्सील अथवा तत्सम वस्तू अगदी सरळ उभी ठेवून शून्य सावलीचा अनुभव घेता येणार आहे. ७ मे कोल्हापूर, मिरज, सांगली, १० मे सातारा, अक्कलकोट, ११ मे वाई, महाबळेश्वर, १२ मे बारामती, बार्शी, १३ मे लातूर, १४ मे अलिबाग, दौंड, पूणे, १५ मे मुंबई, १६ मे नगर, कल्याण, नांदेड, ठाणे, १८ मे पैठण, १९ मे जालना, २० मे संभाजी नगर, नाशिक, २१ मे मनमाड, २२ मे यवतमाळ, २३ मे बुलढाणा, मालेगाव, २४ मे अकोला, २५ मे अमरावती, २६ मे जळगाव, भुसावळ आणि नागपूर येथे शून्य सावलीचा अनुभव घेता येणार आहे. या ठिकाणी ठिक दुपारी १२ वाजता सूर्य अगदी डोक्यावर येईल. सर्व खगोलप्रेमींनी आपआपल्या शहरात शून्य सावलीचा अनुभव घ्यावा असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर व प्रवीण गुल्हाने यांनी केले आहे.



# १ व १० वरील उर्वरित

### टाकळी जहागीरमध्ये वरातीत

हाताबाहेर जाऊ नये म्हणून अक्षय प्रकाश सोनोने यांनी मध्यस्थी करत वाद शांत केला. मात्र, हा वाद फक्त वरवर शांत झाला होता.दरम्यान, मध्यरात्री सुमारे १२:३० वाजण्याच्या सुमारास संतप्त झालेल्या काही तरुणांनी पुन्हा एकत्र येत थेट बौद्ध विहार परिसर गाठला. यावेळी त्यांच्या हातात लोखंडी रॉड, चाकू आणि दगड होते. अचानक हल्ला चढवत त्यांनी तेथे उपस्थित तरुणांवर तुटून पडत बेदम मारहाण सुरू केली.

या हल्ल्यात मोहित गवई, अमर रामरतन सोनोने, सुमित धुंदळे आणि प्रतीक कांबळे यांना काठी, लोखंडी रॉड व दगडांनी निर्दयपणे मारहाण करण्यात आली. काहीजण गंभीर जखमी झाले असून परिसरात एकच गोंधळ उडाला. हल्लेखोरांनी यानंतर आजूबाजूच्या विटांची सर्रास फेकाफेक करत बौद्ध विहारावर दगडफेक केली. त्यामुळे धार्मिक स्थळाचा अवमान झाल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये पसरली.हल्लेखोर इतक्यावर थांबले नाहीत. त्यांनी अश्लील शिवीगाळ करत जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि चाकू दाखवत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. या संपूर्ण प्रकारामुळे गावात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले. काही काळासाठी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणाबाहेर गेली.

घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे आपल्या ताफ्यासह तात्काळ घटनास्थळी पोहचले व परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. दरम्यान, आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी रात्री उशिरापर्यंत शेकडो नागरिक पोलीस ठाण्यात जमा झाले होते.या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीसांनी आरोपी यश रमेश लिंगोट, वय २४ वर्षे,सार्थक वासुदेव मोरे, वय २३ वर्षे,राम दिलीप काळपांडे,भूषण मोरे,पंकज जयराम पांडे,सुरज दाभणे,धीरज दाभणे,ओम काळपांडे सर्व रा. टाकळी जहागीर यांना अटक करून त्यांच्यावर गुन्हा क्र. १६०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम १८९(२), १८९(४), १९१(२)(३), २९६, २९९, ३५१(२)(३) आदी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी वेगाने कारवाई करत सर्व आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. गावात तणावपूर्ण शांतता असून कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### परतवाडातील लक्कड बाजारात

माहिती समोर आलेली आहे .यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यावेळी नागरिकाकांकडून त्या दुकानातील साहित्य बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू होते . आग मोठ्या प्रमाणात लागल्याने वृत्त लिहे पर्यंत ९ दरम्यान आटोक्यात आली नव्हती .अचलपूर नगर परिषदेचे अग्निशमन दलाचे दोन वाहन दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवणेचे शर्तीचे प्रयत्न सुरू होते. परतवाडा शहरातील महावितरण विभागाकडून विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. लक्कड बाजार मध्ये आजू - बाजूला अनेक प्लायवूडचे दुकाने आहे .अचलपूर नगरपरिषद अग्निशमन दल व नागरिकांच्या समयसूचकतेमुळे मोठी दुर्घटना टळली . भविष्यात अशा घटना होऊ नये व काही अनुचित घटना होऊ नये यासाठी स्थानिक प्रशासनाने ठोस उपाय योजना राबवण्याची मागणी सुद्धा नागरिकांनी केलेली आहे.

आगीवर नियंत्रण मिळवण्यात रात्री ९ पर्यंत यश मिळालेले नव्हते . दोन्ही वाहन काही काळ तिथे येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. आणि पुन्हा ते वाहन परतले आणि नंतर आगीने अजून जास्त पेट घेतला. यामुळे अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात आग लागल्यास अचलपूर नगरपरिषद अग्निशमन दलातील वाहनं वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर 'मकोका'ची

केले जाईल. दूरवरच्या भागातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी आठवड्यातून एकदा प्रत्येक पोलीस ठाण्याला भेट देणार आहेत. यामुळे नागरिकांना स्थानिक पातळीवरच न्याय मिळविणे सुलभ होईल.

### मातीतच अंतिम समर्पण

स्व. दिगंबरराव गाठे यांच्या अस्थी व राख नदीत न विसर्जित करता त्यांच्या स्वतःच्या शेतात पुरण्यात आली. यावेळी 'ज्या मातीत आयुष्यभर श्रम केले, त्या मातीतच अंतिम समर्पण व्हावे,' अशी भावना व्यक्त करण्यात आली. या निर्णयामागे त्यांच्या तिन्ही मुलांनी एकमुखाने पुढाकार घेतला असून, परंपरेपेक्षा पर्यावरण आणि पितृऋणाची जाणीव यांना प्राधान्य देत हा निर्णय अमलात आणला. त्यांच्या या संवेदनशील आणि विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजातही याची सकारात्मक चर्चा रंगताना दिसत आहे. ही कृती केवळ परंपरेपासून वेगळेपण दर्शवणारी नसून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ठरली आहे. नद्यांमध्ये होणारे प्रदूषण टाळण्याचा आणि निसर्गाशी अधिक सुसंवाद साधण्याचा हा प्रयत्न असल्याचे ग्रामस्थांमध्ये चर्चिले जात आहे. ग्रामीण भागात शेत आणि मातीशी असलेले नाते अतूट असते; त्याच नात्याची ही भावनिक अभिव्यक्ती असल्याचेही मत व्यक्त होत आहे.एकूणच, गाठे कुटुंबियांच्या या निर्णयाने परंपरा, पर्यावरण आणि भावनिक जिव्हाळा यांचा संगम साधत समाजासमोर एक विचारप्रवर्तक उदाहरण ठेवले आहे.

### पॅरोलवर जाण्यासाठी कैद्याने

अधिकारी दीपक रमेशराव टोणपे (वय ४६) यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी स्वप्निल खरपे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील चौकशी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकारे बनावट कागदपत्रांच्या आधारे रजा मिळवण्याचा प्रयत्न उघडकीस आला होता. त्या वेळीही संबंधित बंद्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.

### पोलिस पाटलांचा प्रामाणिकपणा,

देशमुख, रफिक भाई आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत ही रक्कम मंगेश देशमुख यांना परत करण्यात आली.

या घटनेमुळे बाजार समितीत प्रामाणिकतेचा संदेश पसरला असून गजानन धुमाळे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे.

### कूलरचा शॉक लागल्यामुळे

वायर अस्ताव्यस्त अवस्थेत होत्या. डोक्यावर जखमेचे चिन्हही आढळले. घटनेची माहिती मिळताच तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे कर्मचारी सचिन गायधने व अमोल तातड घटनास्थळी पोहोचले. पंचनामा केल्यानंतर मृतदेह धामणगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. दरम्यान, मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने घटनेचे गांभीर्य वाढले असून नेमका मृत्यू कशामुळे झाला, याचा सर्वांगीण तपास पोलीस करत आहेत. पुढील तपास ठाणेदार किरण अवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### ११ वर्षीय चिमुकलीवर

घटना घडूनही ती जवळपास महिनाभर दडपून ठेवण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित प्रकरण का लपविण्यात आले, याबाबत चर्चा सुरू आहे. अखेर पीडितेच्या आईने धैर्य दाखवत पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर कारवाईला सुरुवात झाली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### शेतकऱ्याचा मुलगा झाला

करण्याची संधी त्यांच्या मुलांने करून दाखवली. आणि सतत परीक्षा देऊन आज पोलीस उपनिरीक्षक पदी त्याची निवड झाली आहे. त्याकरिता त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे.

### कार उलटली; एक

तातडीने नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

### AC चा स्फोट; झोपेतच

आगीवर नियंत्रण मिळवले असून सध्या घटनास्थळी 'कुलिंग ऑपरेशन' सुरू आहे. इमारतीचा काही भाग अद्यापही तापलेला असल्याने शोधमोहीम राबवताना अडथळे येत आहेत. या आगीचे नेमके कारण काय आणि इमारतीत सुरक्षेचे नियम पाळले होते का, याचा तपास पोलीस आणि अग्निशमन दलाचे प्रशासन करत आहे.

### नराधमाला फाशी होण्यासाठी

पीडितेच्या वडिलांना दिले असून त्यांनी परिस्थिती समजून घेतल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे आभारही मानले.

आरोपीला सात मेपर्यंत पोलिस कोठडी आरोपीला पुणे न्यायालयाने ७ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर यासंदर्भातील सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान आरोपीने स्वतःचा बचाव करण्यासाठी भांडणातून गोवल्याचा धक्कादायक बनाव रचला. मात्र, पोलिसांनी सादर केलेले प्राथमिक पुरावे आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने हा दावा फेटाळून लावत त्याला पोलिस कोठडीत पाठवले. विशेष म्हणजे आपल्या कृत्याचा कोणताही पश्चात्ताप आरोपीच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

### पश्चिम बंगालमधील महासंग्रामाचा

योजनांचा त्यांनी प्रभावी वापर केला.

**निवडणूक आयोगावर गंभीर आरोप-**बंगालच्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून अत्यंत गंभीर आरोप झाले आहेत. सत्ताधारी तृणमूल कॉँग्रेसने निवडणूक आयोगावर 'पक्षपातीपणा'चा आरोप केला. विशेषतः, केंद्रीय सुरक्षा दलांचा वापर करून मतदारांना घाबरवल्याचा आणि मतदानाचे वेळापत्रक भाजपला पूरक केल्याचा आरोप खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी केला होता.

**मतदानाला हिंसाचाराचे गालबोट -** यंदाही बंगालमधील निवडणुकीला हिंसाचाराचे गालबोट लागले. कूचबिहार आणि उत्तर परगणा या भागात मतदानाच्या दिवशी कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या राड्यामुळे काही ठिकाणी गोळीबार आणि जाळपोळीच्या घटना घडल्या. मतदानापूर्वी संदेशखाली येथील महिला अत्याचाराचा मुद्दा ऐरणीवर आला होता, ज्याचे पडसाद निवडणुकीच्या शेवटच्या दिवसापर्यंत उमटत राहिले.

### धाडसी घरफोडी, तब्बल १४ लाखांचा

पुसदचे प्रमुख धीरज बांडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील अंबुरे, पोलिस उपनिरीक्षक अमोल राठोड, देवानंद कायंदे, शरद लोहकरे, पोलिस जमादार गजानन एडतकर, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, वसीम शेख, चालक विवेक पारडकर व श्रीरामे यांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तपासादरम्यान ठसे तज्ज्ञ, श्वानपथक व फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले.घटनास्थळावरून काही ठसे हाती लागले असून त्याच्या आधारे संशयितांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. मात्र, श्वानपथकाला ठोस धागेदोरे न सापडल्याने ते रिकाम्या हाती परतले. दरम्यान, या प्रकरणी अनिकेत गावंडे यांनी महागाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### ट्रॅव्हल्स-दुचाकी धडकेत दोघांचा

दुचाकीवरून तिघे जण ट्रिपल सीटने जात होते. त्याचवेळी विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या सांकेत ट्रॅव्हल्स (श्प १५ ँख १७०४) या प्रवासी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तिन्ही जण ट्रॅव्हल्सच्या पुढील भागात जाऊन आदळले.या अपघातात दुचाकी पूर्णपणे चकनाचूर झाली असून तिचे समोरील चाक दूरवर फेकले गेले. घटनास्थळी अपघाताचे भीषण चित्र पाहून नागरिकही स्तब्ध झाले. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली होती.

स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमी पियूष कोहळे याला तातडीने रुग्णालयात हलविले. काही काळासाठी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली व वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास ठाणेदार राहुल गुहे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय लांबट व मानकर करीत आहेत.

### ..तोपर्यंत कुठल्याही राजकारण्याने

, तोपर्यंत आणि त्या नराधमाला फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तीने आमच्या घरी येऊ नये. या दरम्यानचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, पीडित कुटुंबाच्या या भूमिकेमुळे समाजात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अनेक सामाजिक संघटना आणि नागरिकांनी कुटुंबाच्या भावनांना पाठिंबा दर्शवला आहे. नागरिकांकडून आरोपीस फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

सर्वानुमते सहमती मिळाली.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष असून या संघटनेच्या माध्यमातून ते महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड झाली होती. स्वर्गीय अजित पवारांच्या निधनानंतर अध्यक्षपद गेल्या तीन महिन्यापासून रिक्त होते.

### निकालापूर्वी बंगालमध्ये भाजप

हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची घटना घडली आहे. सुदैवाने, या गोळीबारात कोणतीही जीवीत हाणी झालेली नाही.

घटना सीसीटीव्हीत कैद - सध्या पश्चिम बंगालमध्ये मोठा मोठा सुरक्षा बंदोबस्त आहे. भाजप नेते कुंदन सिंह म्हणाले, आकाश चौधरी आणि अमन नावाच्या दोन हल्लेखोरांनी हा हल्ला केला. त्यांनी आपल्या घराबाहेर येऊन अंदाधुंद गोळीबार सुरू केला. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या हल्ल्यानंतर स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. दरम्यान, 'तृणमूल कॉँग्रेस ही निवडणूक हरली आहे. यामुळेच भाजप कार्यकर्त्यांना घाबरवण्यासाठी असे प्रकार केले जात आहेत,' असा आरोपही कुंदन सिंह यांनी केला.

### बारामती पोटनिवडणूक मतमोजणी

६ टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी ३० सूक्ष्म निरीक्षक, ३० मतमोजणी पर्यवेक्षक, ३० मतमोजणी सहायक तसेच इतर कर्मचारी व अधिकारी मिळून सुमारे ३०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील रावडे यांच्याकडून मतमोजणी करिता नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. मतमोजणीच्या अनुषंगाने मतमोजणी केंद्रावर आवश्यक साहित्य उपलब्ध व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. मतमोजणी केंद्रात प्रवेशाकरिता संबंधित कर्मचारी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी तसेच माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रवेशिकाही देण्यात आलेल्या आहेत. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतमोजणी स्थळी प्रवेशासाठी प्रथमच क्यूआर कोड प्रणाली लागू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना तसेच उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात आलेल्या प्रवेशिकांवर क्यूआर कोड देण्यात आला आहे. तो क्यूआर कोड स्कॅन करूनच प्रवेश दिला जाणार आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींना फेरीनिहाय निकाल तातडीने उपलब्ध करून देण्याकरिता मतमोजणी केंद्रावर स्वतंत्र बैठक व्यवस्था (माध्यम कक्ष) तयार करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रात सर्व कर्मचारी व प्रतिनिधींना मोबाइल वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ४ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोला-तिरुपती एक्सप्रेसला हिरवा झेंडा

## खा. अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नातून वीस नव्या गाड्यांना मंजुरी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*विदर्भ, मराठवाडा, तेलंगणा व आंध्र प्रदेशला जोडणाऱ्या तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेसची नियमित सेवा रविवारी ३ मे रोजी सकाळी ८ वाजता अकोला रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वरून सुरू झाली. खासदार अनुप भाऊ धोत्रे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून गाडी तिरुपतीकडे रवाना झाली.*




हिरवा झेंडा दाखवताच 'जय महालक्ष्मी, जय तिरुपती बालाजी, गोविंदा, पंतप्रधान नरेंद्र मोदी आगे बढो, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आगे बढो, खासदार अनुप धोत्रे आगे बढो, आमदार रणधीर सावरकर आगे बढो, भारत माता की जय, वंदे मातरम, जय भवानी जय शिवाजी' अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण प्लॅटफॉर्म दुमदुमून गेला.

यावेळी आमदार रणधीर सावरकर, महापौर शारदाताई खेडकर, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, महानगर अध्यक्ष जयंत म्हसने, किशोर मांगटे पाटील, माधव मानकर, विजय अग्रवाल, वसंत बाछुका, ॲड. अमोल इंगळे, गिरीश जोशी, उमेश मालू, रणजीत खेडकर, पवन महल्ले, निलेश काकड, धनंजय धबाले, मनीषा बन्सालि, डॉ. अमित कावरे, रवी भन्साली, मनीष बुंदिले, राजू धोटे, रमेश करिहार, रवी यादव, अनुश इंगळे, नारायण बोर्डे, प्रशांत अवचार, शिवलाल इंगळे, वैशाली ताई शेळके, गणेश लोड, निकिता देशमुख, क्षितिजा ठाकूर, पंडित हेमंत शर्मा, पल्लवी मोरे, चंदा ताई शर्मा, विजय फुकट, अजिंक्य राऊत, विनोद मनवानी, हरीश आलिम चंदाणी, ॲड. कल्पनाताई गोठफोडे, हरीश बेलानी, किशोर कुचके, प्रशांत जोशी, हर्षद चौधरी, ऋषिकेश देवर, गोपाल नागापुरे, प्रदीप नंदापुरे, मोहन पारधी, अभियंता विनायकराव पांडे, राजेंद्र गिरी, नीतू ताई जगताप यांच्यासह भाजपा पदाधिकारी व हजारो नागरिक उपस्थित होते.

रेल्वे विभागाकडून स्टेशन प्रबंधक संतोष कवडे, दक्षिण मध्य रेल्वेचे डीसीएम रितेश कुमार, सीसीआय कमल नयन, स्टेशन मास्टर निलेश वसुकार, परिवार निरीक्षक उजवे उपस्थित होते. गाडीचे चालक घनश्याम बालिया, सहायक चालक राहुल पुरी व गार्ड सतीश खोब्रागडे यांचे खासदार धोत्रे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

### 'गोविंदा गोविंदा'च्या गजरात रेल्वे स्थानक दुमदुमले

खासदारांनी यात्रेकरूंचे पुष्प देऊन स्वागत केले. खासदार अनुप धोत्रे म्हणाले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वात तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या गाड्या सुरू होत आहेत. माझ्या पाठपुराव्यामुळे अकोल्याला आत्तापर्यंत २० नव्या गाड्या मंजूर झाल्या आहेत. अकोला स्टेशन दक्षिण मध्य रेल्वेत समाविष्ट करणे, प्लॅटफॉर्मवर पासवर्ड सुविधा, डिजिटल डिस्प्ले बसवणे यासाठी मी महाप्रबंधकांशी संपर्क साधला आहे. लवकरच सुविधा मिळतील.' या गाडीमुळे औंढा नागनाथ, नांदेड, निजामाबाद, सिकंदराबाद मार्गे थेट तिरुपती गाठता येणार असून शेतकरी, व्यापारी व भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# २० तोळे सोने आणि रोकड लंपास

## कारंज्यात चोरट्यांचा हैदोस! मेमन कॉलनीत मध्यरात्री धाडसी डल्ला

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरात मागील काही महिन्यांपासून नव्याने विकसित होत असलेल्या कॉलनी परिसरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून आता मेमन कॉलनीत घडलेल्या मोठ्या चोरीने नागरिकांची झोप उडवली आहे. मध्यरात्रीच्या काळोखात चोरट्यांनी दाखवलेल्या धाडसामुळे 'कारंज्यात सुरक्षित कोण?' असा सवाल उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री १२ ते पहाटे ४ दरम्यान अज्ञात चोरट्यांनी शेख जमील यांच्या घरावर अचूक टायमिंग साधत हल्ला चढवला. घरातील सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने आणि अंदाजे ५० हजार रुपयांची रोकड त्यांनी लंपास केली. विशेष म्हणजे, ही चोरी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केल्याचा संशय व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. पोलीस ठाणेदार



दिनेशचंद्र शुक्ला यांच्या नेतृत्वाखाली एपीआय पवार, उपनिरीक्षक गणेश जाधव यांच्यासह विशेष पथक आरोपींच्या शोधात झडती मोहीम राबवत आहे. या तपासात मयुरेश तिवारी, उमेश बीबेकर, मोहम्मद परसुवाले, अनिस निनसूरवाले, अमित भगत आणि नितीन पाटील हे कर्मचारी सक्रिय आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले असून नागरिकांनी संताप व्यक्त करत सुरक्षेची कडक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. 'चोऱ्यांचे सत्र थांबणार कधी?' असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. दरम्यान, पोलिसांकडून आरोपी लवकरच जेरबंद होतील, असा दावा करण्यात येत असला तरी सध्या कारंज्यात 'चोर मोकाट, नागरिक दहशतीत' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# जिल्ह्यात तीन दिवसीय निवासी प्रेरणादायी शिबिराचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून समाजात नवी दिशा निर्माण करण्याच्या उद्देशाने 'परिवर्तनाची पाऊलवाट' या उपक्रमांतर्गत वाशिम जिल्ह्यात प्रथमच तीन दिवसांचे निवासी प्रेरणादायी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबिर दिनांक १७, १८ व १९ मे २०२६ रोजी श्री नाथ नंगे महाराज संस्थान, डव्हा सांस्कृतिक भवन, ता. मालेगाव, जि. वाशिम येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सध्याच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत युवकांनी स्वतःची ओळख निर्माण करून सकारात्मक दिशेने वाटचाल करणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर या शिबिरात सहभागी युवक-युवतींना प्रेरणादायी मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, विचारमंथन आणि सामाजिक जाणीव यांवर आधारित विविध उपक्रमांचा लाभ मिळणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून सहभागींच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडवणे, जीवनाला योग्य दिशा देणे, नवीन विचार व आत्मविश्वास विकसित करणे तसेच समाजात परिवर्तन घडवण्यासाठी सज्ज करणे हा मुख्य उद्देश आहे. आयुष्यात काही वेगळं करण्याची जिद्द असलेल्या आणि समाजासाठी कार्य करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकासाठी ही एक सुवर्णसंधी ठरणार आहे. शिबिरासाठी सहभाग शुल्क शिबिरार्थी यांचे क्षमते नुसार ठेवण्यात आला असून नोंदणीची अंतिम तारीख १० मे २०२६ आहे.

# पाणीटंचाई व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज

## - ३ ३ उपाययोजना कार्यान्वित; - चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा चारा सुरक्षा आराखडा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात वाढते तापमान व संभाव्य पाणीटंचाईची स्थिती लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन करत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली असून, टंचाईग्रस्त भागांवर सूक्ष्म पातळीवर लक्ष ठेवले जात आहे.

दि. ३० एप्रिल २०२६ रोजीच्या अहवालानुसार, सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी जिल्ह्यात एकूण ३१७ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या असून त्यासाठी सुमारे ३०६ लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.सध्या ३३ उपाययोजना प्रत्यक्ष राबविण्यात येत असून त्यावर १५८ लक्ष रुपये खर्च करण्यात येत आहेत.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विहीर अधिग्रहण, टँकरद्वारे पाणीपुरवठा, नळयोजना विशेष दुरुस्ती, नवीन विंधन विहिरी, विहीर खोलीकरण तसेच स्रोत बळकटीकरण अशा विविध उपाययोजनांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सध्या प्रत्यक्ष सुरू असलेल्या सर्व ३३ उपाययोजना या विहीर अधिग्रहणाशी संबंधित असून जानेवारी ते मार्च दरम्यान ७ तर एप्रिल ते जून दरम्यान २६ योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

तालुकानिहाय पाहता मानोरा तालुक्यात सर्वाधिक १० उपाययोजना राबविल्या जात असून, वाशिम व कारंजा तालुक्यात प्रत्येकी ८, तर मालेगाव तालुक्यात ७ उपाययोजना सुरू आहेत. दरम्यान, उर्वरित मंजूर उपाययोजना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याचे नियोजन प्रशासनाकडून करण्यात येणार आहे. पाणीटंचाईची झळ कमी करण्यासाठी स्थानिक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून आवश्यकतेनुसार तातडीने अतिरिक्त उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले असून, पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे सांगितले आहे. चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा चारा सुरक्षा आराखडा संभाव्य चारा टंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा स्तरावर चारा सुरक्षा आराखडे तयार करण्यात येत असून, हिरव्या चाऱ्याची व सुक्या चाऱ्याची तूट लक्षात घेऊन उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत तसेच आपत्ती निवारण निधीतून चारा बियाणे खरेदीस प्राधान्य दिले जाणार आहे. मका, ज्वारी, बाजरी यांसारख्या उच्च प्रतीच्या बियाण्यांचा वेळेत पुरवठा, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा उत्पादन, मुरघास प्रकल्प, मिनी टीएमआर आणि कडबाकुट्टी यंत्रांचे वाटप यावर भर देण्यात येणार आहे. तसेच धरण गाळपेरा क्षेत्र व नदीकाठच्या जमिनींवर चारा लागवड आणि साठवणुकीचे अचूक नियोजन करून पशुधन संरक्षण अधिक सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# 'राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके' सन्मानाने वाशिमचा मान उंचावला



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेने गुणवत्ता सिद्ध करत राष्ट्रीय पातळीवर ठसा उमटवला असून, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके प्रमाणपत्राने गौरविण्यात आलेल्या चार आरोग्य संस्थांचा महाराष्ट्र दिनी दिमाखदार सन्मान करण्यात आला.

राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदानावर झालेल्या मुख्य शासकीय समारंभात हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.राष्ट्रीय स्तरावरील कठोर मूल्यमापन प्रक्रियेत यश मिळवलेल्या ग्रामीण रुग्णालय, मालेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र, मेडशी (ता. मालेगाव), आरोग्य उपकेंद्र, कवठळ (ता. मंगरूळपीर) आणि आरोग्य उपकेंद्र, लोणी (अरब) (ता. कारंजा) या संस्थांच्या प्रमुखांचा यावेळी गौरव करण्यात आला.

# राष्ट्रीय पंचायतराज दिना निमित्त तोंडगाव येथे गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथून जवळच असलेल्या तोंडगाव येथे राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून शुक्रवार २४ एप्रिल रोजी तोंडगाव ग्रामपंचायत प्रशासनाचे वतीने गुणवंत शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवानराव गोटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून वाशीमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे, तोंडगावच्या सरपंच सौ. वंदना भगवान गोटे, बाजार समितीचे संचालक दत्तराव गोटे, समाजसेवक रामहरी मल्हारी गोटे, दाजिबा पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश शांतीराम गोटे, समाजसेवक दगडू पाटील, आश्रृजी पाटील, माजी केंद्रप्रमुख विलास गोटे, शेषराव गोटे, गोपाल दत्ता गोटे, राजु कोंघे यांचे सह आदी मान्यवर उपस्थित होते.

तोंडगाव येथील जि.प. उच्च प्राथमिक केंद्र शाळेमध्ये आयोजित' गुणांचा गौरव प्रेरणेचा उत्सव ' या अभिनव सत्कार सोहळ्याचे वाशीम तालुक्यात ज्ञानदानाचे प्रामाणिक कार्य करून ग्रामिण भागातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावून गोर गरीब विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेत आणि शिष्यवृत्ती परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करण्यासाठी तन, मन, धनाने प्रगती पथावर नेणारे गुणवंत शिक्षक मिनाताई मापारी, विनोद झनक, संतोष इढोळे, संदिप पाठक, तोंडगाव येथील जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष गोटे या गुणवंत शिक्षकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

# जिल्हा परिषदेत महाराष्ट्रदिनानिमित्त ध्वजारोहण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चोहान यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांची विशेष उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर वंदे मातरम हे गीत, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गायले गेले. यावेळी तंबाखू मुक्तीची सामूहिक शपथ घेण्यात आली. नंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अर्पित चौहान यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, शिक्षण अधिकारी संजय ससाने, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे- गायकवाड, कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, कृषी अधिकारी अभिजीत देवगिरकर, लेखा अधिकारी सुखदेव जाधव आदींची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नेहमी कार्यतत्पर असणारी बालविकास मंदिर प्राथमिक शाळा - डॉ. भाग्यश्री पोफळे

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील तहसील कार्यालया जवळ बोरगाव रोड वरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथ शाळा मालेगाव येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मु.विठ्ठल भिसडे, प्रमुख पाहुणे डॉ.भाग्यश्री पोफळे,शिवाजी गायकवाड,शेख अफरोज,एकनाथ चव्हाण, विजय कड उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन, हारअर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर मान्यवरांचे शब्दसुमनाने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.



त्यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना वार्षिक निकाला विषयी माहिती दिली तसेच शाळेच्या यशस्वी परंपरेचा थोडक्यात आढावा घेतला व विद्यार्थ्यां त्यांच्या यशस्वीतेसाठी अजून काय करता येईल याबद्दल पालकांसोबत चर्चा करण्यात आली. यानंतर शाळेमध्ये आयोजित उन्हाळी शिबिरामध्ये विविध उपक्रम व मनोरंजक खेळ घेण्यात आले. या खेळांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथी डॉ.भाग्यश्री पोफळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.यानंतर प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी विद्यार्थ्यांना गुणपत्रके वाटप करण्यात आली. व भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. वर्ग पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना गुणपत्रके वाटून निकाल जाहीर करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कांबळे व आयोजन संदीप कांबळे व केशव इंगळे यांनी केले. अशाप्रकारे यशस्वीतेसाठी शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंदांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडला.

# जिल्ह्याला अधिक प्रगत, समृद्ध आणि आदर्श बनवूया- पालकमंत्री

- महाराष्ट्र दिनाचा ६६ व्या वर्धापन दिनाचा शासकीय समारंभ उत्साहात साजरा
- पोलीस कवायत मैदान येथे पालकमंत्री यांच्याहस्ते राष्ट्रध्वजवंदन
- उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार
- शेतकऱ्यांसाठी महाबीजच्या चार महत्त्वपूर्ण उत्पादनांचे लोकार्पण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने, समन्वयाने आणि ठोस कृतीतून प्रयत्न करण्याची गरज आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा त्यात तितकाच सहभाग महत्त्वाचा आहे. शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत संतुलित प्रगती साधत, स्थानिकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. महिला सक्षमीकरण, युवकांचे कौशल्य विकास, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन यावर विशेष भर देत आपण पुढे गेलो, तर वाशिम जिल्हा केवळ प्रगतच नव्हे तर समृद्ध आणि आदर्श जिल्हा म्हणून राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण करेल असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केले.

महाराष्ट्र दिनाच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शासकीय समारंभात राष्ट्रध्वजवंदन करण्यात आले.यावेळी शुभेच्छा संदेश देताना पालकमंत्री ना.भरणे बोलत होते. यावेळी विधानपरिषद सदस्य आ. किरणराव सरनाईक,जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,अपर पोलीस अधीक्षक लता फड,उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ना.भरणे पुढे बोलतांना म्हणाले की, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ४ लाख हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून त्यामध्ये ३ लाख हेक्टरवर सोयाबीन तर ६५ हजार हेक्टरवर तुर पिक प्रस्तावित आहे.



शेतकऱ्यांकडे दीड लाख क्विंटल घरचे बियाणे उपलब्ध असून खतांचे ७८ हजार मेट्रिक टन आवंटन मंजूर आहे. युरिया व डीएपीचा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे. 'महाविस्तार एआय' ॲपद्वारे शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती दिली जात आहे. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेत ४ कोटी तर यांत्रिकीकरणासाठी १५ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. आरोग्य क्षेत्रात जिल्ह्याने राज्यात सातत्याने प्रथम क्रमांक मिळविला आहे. कॅथलॅब लवकरच सुरू होणार असून ५० खाटांचे क्रिटिकल केअर युनिट उभारले जात आहे. ग्रामीण रुग्णालय मालेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र मेडशी तसेच कवठळ व लोणी अरब या उपकेंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणन मिळाले आहे. येत्या वर्षात ५० टक्के आरोग्य संस्था प्रमाणित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अन्न व नागरी पुरवठा योजनांद्वारे ७७६ रास्तभाव दुकानांतून ५० हजार अंत्योदय लाभार्थ्यांना गहू, तांदूळ व साखर, तर ८.३५ लाख प्राधान्य कुटुंबांना धान्य वितरण सुरू आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत १ लाख ३१ हजार लाभार्थ्यांना वर्षातून तीन मोफत गॅस सिलेंडर मिळत आहेत. प्रधानमंत्री उज्वला योजनेत १ लाख कुटुंबांना लाभ मिळाला असून एपीएल योजनेत ८,५०० लाभार्थ्यांना २०२५-२६ मध्ये सुमारे १.६६ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाच्या योजनांमध्ये जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. 'पोषण ट्रॅकर' ॲपद्वारे १० निर्देशांकांवर आधारित मूल्यमापनात जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. लेक लाडकी योजनेत ७ हजार महिलांना ३५७ लाख रुपये वितरित झाले असून प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेत ५ हजार लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. शिक्षण क्षेत्रात १६ शाळांचा पी.एम.श्री. योजनेत समावेश झाला आहे. साखरा येथील स्व. अटल बिहारी वाजपेयी जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळाला आहे. महाडीबीटी पोर्टलद्वारे ५ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतून १ हजार विद्यार्थ्यांना सहाय्य देण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# ‘युद्ध संपवा, सैन्य मागे घ्या, नाकेबंदी हटवा, नुकसान भरपाई द्या’

## इराणचा अमेरिकेला नवा १४ कलमी शांतता प्रस्ताव



**नवी दिल्ली** - अमेरिका-इराणमधील युद्धा चा वणवा पुन्हा पेटणार की युद्ध संपणार? याबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे. कारण अमेरिका-इराणमधील युद्ध संपवण्याबाबत अजून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. पण दुसऱ्या फेरीत देखील युद्धाबाबत ठोस तोडगा निघत नसल्याचं दिसून येत आहे. यातच अमेरिकेने काही दिवसांपासून होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी सुरू केलेली आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे.अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करत इराणला इशारा देत असल्याने हे युद्ध पुन्हा भडकणार का? याबाबत सवाल उपस्थित केले जात आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याची माहिती समोर आली आहे.

पाकिस्तानच्या माध्यमातून इराणने हा प्रस्ताव दिला असून तात्पुरत्या युद्धविरामाऐवजी युद्ध पूर्णपणे संपवण्याची इच्छा व्यक्त केल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इराणमधील माध्यमांनी दिलं आहे.

इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याचं वृत्त इराणच्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे.

# नाशिकमध्ये मोठी गुंतवणूक होणार!

### देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ‘कुंभ उद्योग संगम’




**नाशिक** - कुंभमेळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६ मे रोजी ‘कुंभ उद्योग संगम’ आणि गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली आहे.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील उद्योग, व्यवसाया ला चालना देण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांव्दारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

नाशिक- त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यात उद्योग, व्यावसायिकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

कुंभमेळ्यात उद्योगांचे नेहमीच योगदान राहिले आहे. हरित नाशिक, स्वच्छ नाशिकसह विविध उपक्रमांना उद्योगांचे सहकार्य राहिले आहे. आगामी कुंभमेळ्यातही त्यांचे योगदान मिळविण्या साठी प्रयत्न सुरु झाले आहेत.

## संक्षिप्त

### ‘मला जाळू नका आणि दफनही करू नका’

**अमेरिका** -घराच्या बाल्कनी मध्ये मधुर आवाज निर्माण करणारे विंड चाइम, पण हे विंड चाइम कशाचे तर एका मेलेल्या व्यक्तीच्या हांडापासून बनवलेले. हे ऐकून तुम्हाला थोडं धक्काच बसला असेल, पण ज्या व्यक्तीच्या हाडांपासून हे बनले गेले, ती महिला होती आणि तिची इच्छा पूर्ण करण्यासाठीच हे तिच्या बहिणीने बनवले. ही घटना आहे अमेरिकेतील एक राज्य असलेल्या कॉलोराडोच्या राजधानीतील. डेन्व्हर असे या शहराचे नाव आहे. माणसाच्या हाडांपासून बनवलेल्या या विंड चाइमचा आवाज कुणालाही घाबरवणाराच असेल. पण ४३ वर्षीय एरिन मेरेली यांच्यासाठी तो भीतीदायक नाही. कारण ज्या मानवी हांडापासून विंड चाइम बनवण्यात आले आहे, ती त्यांच्या बहिणीचीच आहेत.

### मुलीच्या लग्नाबाबत इंदुरीकर महाराज ट्रोल

**बीड**- गेल्या तीन दशकांपासून आपल्या कीर्तनातून प्रबोधन करताना सामाजिक प्रवृत्तीवर हल्ला करणारे आणि समस्त जनतेला साधेपणाचा उपदेश करणारे तसेच प्रत्यक्षात स्वतः साठी भव्यतेचा



आविष्कार ठसक्यात दाखवत हा विरोधाभास पुन्हा एकदा समोर आल्याने ह.भ.प. निवृत्तीनाथ महाराज इंदुरीकर हे मुलीच्या आज होणाऱ्या राजेशाही थाटातील विवाह सोहळ्यावरून चांगलेच ट्रोल झाले आहेत.मुलीच्या साखरपुडा सोहळ्याला अनेक गोष्टींना छेद देत गाजावाजा करत लाखो रुपयांची उधळण महाराजांनी केली. यावरून ते ट्रोल झाले होते. याचा संताप अनावर झाल्याने संयम पाळण्याऐवजी यापेक्षाही मुलीचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात आणि राजेशाही थाटानेच करून दाखवू, अशी खूणगाठच त्यांनी बोलून दाखविली होती. इथूनच मुलीच्या राजेशाही लग्नाची बीजे पेरल्या गेली आणि महाराज कामाला लागले. आता आज होणाऱ्या लग्नाची भव्यदिव्यता, राजेशाही थाट, भरजरी वस्त्राची खरेदी, सोने नाणे यासह राज्याच्या मुख्यमंत्र्यांपासून, आमदार, खासदार, मंत्री, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती यांना वेगवेगळ्या छापलेल्या पत्रिका, तसेच बल्क संदेशाच्या माध्यमातून आमंत्रण, निमंत्रण देण्यात आली. या एकूणच घटनेने ह.भ.प. निवृत्तीनाथ इंदुरीकर महाराज चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्यांची कन्या ज्ञानेश्वरी हिच्या विवाह सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर तसेच वारकरी संप्रदायातूनही जोरदार टीका होताना दिसत आहे.

### नोटाबंदीत जप्त झालेले २ लाख अखेर परत मिळणार

**पुणे** - बिबवेवाडी येथे राहणारे सिव्हिल इंजिनिअर आणि कंत्राटदार गिरीश रमेशचंद्र मलानी यांच्यासाठी नोटाबंदीची ही गोष्ट एका ‘हॅप्पी एंडिंग’सारखी आहे. २०१६ मध्ये जप्त करण्यात आलेले त्यांचे २ लाख रुपये (५०० च्या जुन्या नोटा) आता त्यांना नवीन चलनात परत मिळणार आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.१ डिसेंबर २०१६ रोजी मलानी आपली बहीण सोनल सोनी यांच्यासोबत



माहूरच्या रेणुका देवी मंदिरात जात होते. त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या ४०० नोटा (एकूण २ लाख रुपये) होते. हे पैसे त्यांच्या व्यवसायाचे होते आणि सरकारनं दिलेल्या ३० डिसेंबरच्या मुदतीपूर्वी ते अकोल्यातील बँक खात्यात जमा करणार होते. मात्र, नांदेड जिल्ह्यातील माहूर जवळ निवडणुकीच्या तपासणी नाक्यावर पोलिसांनी त्यांची गाडी अडवली. निवडणुकीचा काळ असल्याने इतकी रोकड नेता येणार नाही, असे सांगत पोलिसांनी हे पैसे जप्त केले.

### वंदे भारत सुटली अन् ३ वर्षांची चिमुरडी एकटीच पुण्यात पोहचली

**पुणे :** सोलापूरहून मुंबईला जाणाऱ्या सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल (सीएसएमटी) वंदे भारत एक्सप्रेसमध्ये राहुल खुरमुटे हे कुटुंबियांसह प्रवास करत होते. सोलावूरहून काही अंतर पुढे गेल्यावर गाडी कुर्डुवाडी स्थानकावर थांबली.भूक लागली म्हणून तीन वर्षांच्या मुलीसाठी बिस्किटे आणण्यासाठी राहुल खुरमुटे कुर्डुवाडीच्या फलाटावर उतरले. ते बिस्किट घेऊन परत येईपर्यंत सोलापूर वंदे भारतची स्वयंचलित दारे बंद झाली होती. गाडीने वेग धरला आणि फलाट सोडले. पण, राहुल खुरमुटेंची ३ वर्षांची मुलगी एकटीच राहिली होती. सुटणाऱ्या गाडीकडे पाहण्याशिवाय राहुल यांच्यासमोर पर्याय नव्हता. राहुल यांच्या तीन वर्षांच्या चिमुरडीला घेऊन सोलापूर वंदे भारत कुर्डूवाडी स्थानकावरून सुटली. गाडीच्या सी-५ या डब्यात ३० व्या क्रमांच्या आसनावर बसलेली ही लहानगी वडील आले नाहीत म्हणून घाबरली, रडू लागली. तिच्या रडण्याचा आवाज ऐकून बरोबरच्या काही प्रवाशांनी तिची विचारपूस केली. तेव्हा तिचे वडील मागच्या स्थानकावरच राहिल्याचे प्रवाशांना समजले.

### उन्हाळ्यात महानिर्मितीचा नवीन विक्रम

**नागपूर :** राज्यातील वीज निर्मिती क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या महानिर्मिती या शासकीय कंपनीने एप्रिल २०२६ मध्ये ऐतिहासिक कामगिरी नोंदवत एका महिन्यातील सर्वाधिक वीज निर्मितीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला. या कालावधीत कंपनीने सरासरी ८,५९६ मेगावॉट (६,१८८ .४६९ दशलक्ष युनिट) वीज निर्मिती



केली. उन्हाळ्यात वाढलेल्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर ही कामगिरी ग्राहकांसाठी दिलासादायक ठरली आहे.महानिर्मितीने यापूर्वी एप्रिल २०२२ मध्ये सरासरी ८,२६२ मेगावॉट (५,९४८.५९६ दशलक्ष युनिट) निर्मितीचा विक्रम नोंदवला होता; तो यंदा मोडीत निघाला. या यशात जलविद्युत आणि सौरऊर्जेचा महत्त्वाचा वाटा आहे. एप्रिल २०२६ मध्ये जलविद्युत निर्मिती सरासरी १,०७७ मेगावॉट (७७५.७२५ दशलक्ष युनिट) इतकी झाली असून तोही एप्रिल महिन्यातील आजपर्यंतचा उच्चांक आहे. सौरऊर्जेची निर्मिती ५९ मेगावॉट (४२.४०८ दशलक्ष युनिट) इतकी नोंदवली गेली असून ती आतापर्यंतची सर्वाधिक आहे.वाढत्या तापमानामुळे विजेची मागणी वाढत असताना उत्पादनात सातत्य राखत उच्चांक गाठणे ही मोठी कामगिरी ठरली आहे. कोळसा, जल आणि सौरस्त्रोतांचा समन्वयित वापर, नियोजनबद्ध देखभाल आणि प्रभावी प्रकल्प व्यवस्थापन, यांमुळे हे यश शक्य झाल्याचे ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

# ‘मुलीच्या वडिलांचे आभार, त्या नराधमाला कायद्याने मृत्युदंडाची शिक्षा द्यायची!’-मुख्यमंत्री




**मुंबई** - राजगड पोलिसांनी एका आरोपीला बेड्या ठोकल्या असून पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. पुण्याच्या नसरापूरमध्ये एका साडेतीन वर्षीय चिमुरडीवर ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार करून खून केला. क्रूरतेचा कळस म्हणजे दगडाने ठेचलेला मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली पुरल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. यामुळे पुणे जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. संतप्त ग्रामस्थांनी पुणे-सातारा महामार्गावर शुक्रवारी रात्री आंदोलन केलं. त्यानंतर शनिवारी मोर्चा काढून बंद पुकारला.

या प्रकरणी राजगड पोलिसांनी एका आरोपीला बेड्या ठोकल्या असून पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

# ‘राहुल गांधींना महिला विषयावर बोलण्याचा अधिकारच नाही’

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची टीका



**नवी दिल्ली** -भारतात पहिल्यांदा महिलांना लोकसभेत आणि विधानसभेत संधी मिळत होती. मात्र काँग्रेस असा पक्ष आहे, ज्यांनी संख्याबळाच्या भरोशावर प्रतिगामी निर्णय घेतला, तेव्हा राहुल गांधींना महिला विषयावर आता बोलण्याचा अधिकार नाही, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली.

रविवारी नागपुरात त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले, भारत हा सामाजिक आणि आर्थिकबाबतीत महत्त्वाचा देश ठरेल, अशी १७ एप्रिलला अपेक्षा होती. महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर होणार होते. सर्वजण मदत करतील, अशी अपेक्षा होती. मात्र डीएमके, एनसीपी (शप), समाजवादी, शिवसेना उबाठा, काँग्रेस यांनी महिलाविरोधी मानसिकतेचे प्रदर्शन केले.

लोकसभेत ५४३ जागा असतील, असे १९७१ साली ठरले होते. तेव्हा लोकसंख्या ४५ कोटी होती आणि आता १४० कोटी लोकसंख्या आहे. पिपल्स रिप्रेजेंटेशन ॲक्टबरोबर प्रतारणा होईल. उत्तर आणि दक्षिण वाद संपवण्याचे प्रयत्न या विधेयकात केले होते. लोकशाहीत महिला सहभागाचा मृत्यू झाला आहे, हत्यारे विरोधी पक्ष आहेत. नेहमीच काँग्रेस आणि साथीदारांची अशी प्रवृत्ती राहिली आहे. त्यांनी सातत्याने महिला विरोधी धोरण अवलंबले, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली.

### धामणगावातील ग्रामस्थांचे पुनर्वसन

भिवापूर तालुक्यातील धामणगावात दुर्दैवी घटना घडली. प्राथमिकदृष्ट्या त्या ठिकाणी शॉर्टसर्किट झाले असल्याची माहिती आहे आणि त्यानंतर वादळी वाऱ्यामुळे आग पसरली. सुदैवाने मनुष्यहानी झाली नाही. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले आहे.

काही जनावरांचा मृत्यू झाला आहे. प्रशासनाने उत्तम मदतकार्य केले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे स्वतः लक्ष ठेऊन होते. ते स्वतः त्या ठिकाणी भेट देणार आहे. तेथील ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्यासाठी सरकार पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या विरोधात पोलिसात तक्रार

## ‘भारत ‘हिंदू राष्ट्र’ संविधान विरोधी असल्याचा आरोप



**नागपूर:** आम्हाला हिंदू राष्ट्र घोषित करायला सांगतात. आम्ही म्हणतो की, हिंदुस्थान हिंदू राष्ट्रच आहे, ते घोषित करण्याची गरज नाही, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी काही दिवसांपूर्वी नागपुरात एका कार्यक्रमात केले होते.

यानंतर आता डॉ. मोहन भागवत यांच्या विरोधात नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन मून यांनी पोलिसात लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या या वक्तव्यावर आक्षेप घेण्यात आला आहे.

**तक्रार काय आहे ?**

२९ एप्रिल रोजी एका वृत्तपत्रात ‘भारत है हिंदुराष्ट्र च आहे.

त्यामुळे भारताला हिंदूराष्ट्र म्हणून घोषित करण्याची गरज नाही’ असे वक्तव्य मोहन भागवत यांनी केल्याचे प्रकाशित झाले होते. त्याचा संदर्भ तक्रारीत देण्यात आला आहे.


तक्रारदार जनार्दन मून यांच्या मते, हे वक्तव्य भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता, समानता, सर्वधर्मसमभाव व राष्ट्रीय एकात्मता या मूलभूत तत्वांच्या विरोधात असून यामुळे समाजात धार्मिक ध्रुवीकरण व तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच भारतात वादाचे वातावरण निर्माण करून जनतेला संविधान मानू नये, असे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आवाहन करण्यात आल्याचा आरोप मून यांनी केला आहे.

**निवेदनात काय म्हटले आहे?**

तक्रारदार जनार्दन मून यांनी आपल्या निवेदनात भारतीय संविधानाची प्रस्तावना कलम १४, १५, २५ ते २८ तसेच कलम ५१ अ यांचा उल्लेख करत भारत हा धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्याचे अधोरेखित केले आहे. तसेच अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येऊ शकते, अशी चिंता व्यक्त केली आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधी, भगत सिंग, सुभाष चंद्र बोस, चंद्रशेखर आझाद, सुखदेव शिवराम राजगुरु, सावित्रीबाई फुले, ज्योतीराव फुले, शाहू महाराज आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार बी. आर. आंबेडकर यांसारख्या महा पुरुषांनी सर्व धर्म, जाती व घटकांना समान अधिकार असलेला लोकशाही भारत घडविण्यासाठी संघर्ष केला होता.

# पुढील काळात डिजिटल परीक्षा

## राज्य मंडळाचे संकेत



**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेत पुढील काळात डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे संकेत देण्यात आले.

डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करून कागदाचा वापर कमी करण्याला प्राधान्य देण्याचे सूतोवाच राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी केले, तर शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी त्याला दुजोरा दिला.

इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका छपाईसाठी १० कोटी ७२ लाख ८० हजार ३६० पृष्ठे, नमुना उत्तरपत्रिकांसाठी १९ लाख २९ हजार ३८० पृष्ठे अशी एकूण १० कोटी ९२ लाख ०९ हजार ७४० पृष्ठांवर छपाई करण्यात आली. त्यासाठी अंदाजे २२३ मेट्रिक टन कागद वापरण्यात आला. तसेच, १ कोटी ६ लाख ५६ हजार उत्तरपत्रिकांची छपाई करण्यात आली. त्यासाठी अंदाजे १७०० मेट्रिक टन कागद वापरण्यात आला.

‘परीक्षेसाठी लागणारा कागद झाडांपासून तयार होतो. त्यामुळे पर्यावरणाचा विचार करून पुढील काळात राज्य मंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे,’ असे त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी ‘सी-डॅक’ या संस्थेने तयार केलेल्या आभासी प्रयोगशाळा प्रणालीचे उदाहरण देऊन, ‘प्रात्यक्षिक परीक्षा डिजिटल पद्धतीने घेता येऊ शकतात,’ असे सांगितले.

**डिजिटल ट्रंक आता राज्यभरात?**

‘यंदा बारावीच्या परीक्षेवेळी प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. त्यात प्रायोगिक तत्त्वावर पुणे विभागातील बारामती तालुक्यात असलेल्या दहावी-बारावी परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका सुरक्षितरीत्या पोहोचविण्यासाठी डिजिटल ट्रंकचा वापर केला गेला. या प्रयोगाच्या यशस्वितेनंतर त्याचा राज्यभरात वापर करण्याच्या दृष्टीने येत्या काळात निर्णय घेण्यात येईल,’ असेही त्यांनी नमूद केले.

**नवे प्रमाणपत्र छायाचित्रासह**

राज्य मंडळाने यंदापासून गुणपत्रक आणि प्रमाणपत्र स्वतंत्र न देता एकत्रितपणे देण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचे नाव आधार कार्डाप्रमाणे नमूद केले जाणार आहे.

ही प्रमाणपत्रे १५ दिवसांत उपलब्ध होणार आहेत. या प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचे छायाचित्र, बारकोडचा वापर करण्यात आला आहे. या प्रक्रियेमुळे राज्य मंडळाला ३ कोटी रुपयांची बचत करणे शक्य झाल्याचे त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले.

# विवाहितेची आत्महत्या



**राजगुरुनगर :** मुलगा होत नसल्याच्या कारणावरून पती कडून वारंवार करण्यात येणारी मारहाण आणि सतत होत असलेल्या जाचाला कंटाळून एका विवाहितेने तिच्या लहान मुलीसह विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. संजीवनी लक्ष्मण कुमटकर (वय ३५, रा.राजगुरुनगर, ता.खेड) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत पती लक्ष्मण अश्रुबा कुमटकर (रा.राजगुरु नगर, ता.खेड, मूळ रा. राजेवाडी, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत विवाहितेला दोन मुली होत्या. तुला मुलगा होत नाही, या कारणावरून पती लक्ष्मण कुमटकर याने वारंवार शिवीगाळ, दमबाजी आणि हाताने मारहाण करून विवाहितेचे जीवन जगणे कठीण केले होते.सततच्या जाचाला कंटाळून विवाहितेने राक्षेवाडी (ता.खेड) गावातील हृदयातील विहिरीत उडी मारून तिची लहान मुली(वय ६)सहीत आत्महत्या केली. याबाबत विवाहितेचे वडील अशोक अंबादास भोसले (रा.खांडवी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर) यांनी खेड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्र्यांकडून अभिनंदन



**मुंबई :** राज्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षेत यश मिळविलेले सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी, ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी हताश न होता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतले ल्या मेहनतीला आज फळ मिळाले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांच्या पालकांचा त्याग आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन याचाही वाटा आहे.

या परीक्षेतील यशानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांमध्ये वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

पुढील उच्च शिक्षणासाठी ज्या ज्या क्षेत्रात विद्यार्थी जातील त्या क्षेत्रात महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शब्दांत भुसे यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला.

### ‘मी आज जीवंत आहे आणि उद्याही असेल’ -रोहिणी खडसे

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीशी संबंधित समाज माध्यमावरील एका सूचक पोस्टमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. ‘मेरी मौत की चर्चा करने वालों, तुम्हारी साज़िशें मेरे हौसले को और बढ़ाती हैंष्ठमैं आज भी जिंदा हूँ और कल भी रहूँगा, क्योंकि मेरी ज़िंदगी मेरे दुश्मनों की मोहताज नहीं,’ असा आक्रमक आशय असलेली पोस्ट खडसे यांनी ‘X’ वर शेअर केली आहे. रोहिणी खडसे यांच्या पोस्टमधील शब्दप्रयोग आणि त्यामागील संदर्भ लक्षात घेता, त्यांनी अप्रत्यक्षपणे राजकीय विरोधकांवर निशाणा साधल्याची चर्चा रंगू लागली आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५६ ■ सोमवार, ४ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# टिप्परांचा सुळसुळाट : महसूल-परिवहन विभाग झोपेत

## -शहरात कायद्याचा बोजवारा : अपघात झाला तर जबाबदार कोण?

### -बिनानंबर वाहनांनी नागरिकांच्या जीवाशी खेळ

**वर्धा । रवींद्र लाखे :** शहराच्या रस्त्यांवर कायद्याची उघड उघड पायमल्ली सुरू असताना महसूल विभागातील रेती नियंत्रण शाखा आणि परिवहन विभाग मात्र जणू हातावर हात ठेवून बसल्याचे संतापजनक चित्र समोर आले आहे. बिनानंबरचे रेतीने भरलेले टिप्पर दिवसाढवळ्या शहरातून धावत असताना प्रशासनाची 'डोळेझाक' नागरिकांच्या रोषाला पेटवणारी ठरत आहे.

हिमालय विश्व परिसरात नुकताच एक बिनानंबरचा टिप्पर भरधाव फिरताना दिसून आला. या टिप्परवर कोणताही नोंदणी क्रमांक नव्हता, तरीही तो शहरातील मुख्य रस्त्यांवरून निर्भयपणे वावरत होता. हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून, 'सिस्टम'मधील गंभीर त्रुटी किंवा त्याहूनही काही दर्शवतो, अशी चर्चा रंगू लागली आहे.

रेती उत्खनन आणि वाहतूक हा महसूल विभागाच्या अखत्यारीतील महत्त्वाचा विषय. प्रत्येक घनमीटर रेतीवर शासनाचा हक्क असतो. परंतु, अशा बिननंबर टिप्परांमुळे शासनाचा महसूल अक्षरशः वाऱ्यावर जातो आहे.



घाटावरून रेती कोण उचलते, किती उचलते, कोणत्या परवानगीवर शहरात आणते याची कोणतीही काटेकोर नोंद नसल्याचे चित्र आहे. रेतीचा खेळ मोकळा, खजिना रिकामा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

दुसरीकडे, परिवहन विभागाची जबाबदारी रस्त्यावर धावणाऱ्या प्रत्येक वाहनाची कायदेशीरता तपासण्याची. पण बिननंबरचे प्रचंड टिप्पर शहरातून मिरवत असतील, तर तपासणी यंत्रणा नेमकी कुठे आहे, लहान वाहनधारकांना कागदपत्रांवरून पकडणारे अधिकारी अशा मोठ्या बेकायदेशीर वाहनांसमोर मात्र गप्प का हा प्रश्न अधिक धारदार बनतो.

नागरिकांच्या मते, या अवैध साखळीमागे कुणाचा तरी 'आशीर्वाद' असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण, इतक्या मोठ्या प्रमाणावर रेतीची वाहतूक आणि तीही बिननंबर वाहनांतून हे केवळ दुर्लक्षामुळे शक्य नाही. वरून सिग्नल, खाली खेळ अशी कुजबुज आता उघडपणे ऐकू येऊ लागली आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, अशा टिप्परांमुळे रस्ते सुरक्षेला धोका वाढतो आहे. अपघात झाल्यास बिननंबर वाहनाचा माग काढणे अवघड, जबाबदारी ठरवणे कठीण मग सामान्य नागरिकांनी जीव मुठीत धरून प्रवास करायचा का असा प्रश्न उपस्थित होतो.

दरम्यान, महसूल विभाग आणि परिवहन विभागाकडून ठोस कारवाईचा अभाव हीच या 'बेकायदेशीर साम्राज्या'ची ताकद बनली आहे. कागदोपत्री नियम कडक असले, तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी ढिसाळ हीच वस्तुस्थिती वर्ध्यात दिसून येत आहे.

आता तरी प्रशासनाने झोपेतून जागे होऊन संयुक्त मोहीम राबवावी, बिननंबर टिप्पर तात्काळ जप्त करावेत, संबंधित मालकांवर कठोर गुन्हे दाखल करावेत आणि अवैध रेती वाहतुकीच्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करावा, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे.

अन्यथा, कायद्याला कोंडीत पकडणाऱ्यांवर कारवाई कधी हा प्रश्न केवळ चर्चेत न राहता रस्त्यावर उतरेल, आणि मग या संतापाच्या ज्वालांना तोंड देणे प्रशासनासाठी कठीण जाईल असा इशारा वर्धेकर देत आहेत.

प्रकरण मंत्रालयाच्या दारात

# केळझर टेकडी उत्खननावर प्रश्नचिन्ह; ७० मीटरवरील परवानगी वादात

## -खासदार अमर काळे यांची चौकशीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** केळझर परिसरातील टेकडी उत्खनन प्रकरणाने आता संतापाचा ज्वालामुखी धगधगू लागला आहे. बुटीबोरी-तुळजापूर समृद्धी महामार्गालगत केवळ ७० मीटर अंतरावर उत्खननास परवानगी देण्यात आल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर संशयाची सावली पडली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी थेट महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

महामार्गाच्या कडेला चालणारे हे उत्खनन म्हणजे प्रवाशांच्या जीवाशी खेळ असल्याचा आरोप खासदार काळे यांनी केला आहे. ५०० मीटर अंतराचा स्पष्ट नियम असताना ७० मीटरवर परवानगी कशी असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेवर बोट ठेवले आहे. हा प्रकार केवळ दुर्लक्ष नाही, तर नियमांना पायदळी तुडवण्याचा प्रकार असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

दरम्यान, टेकडी खोदकामामुळे परिसरातील गावकरी अक्षरशः धुळीच्या विळख्यात सापडले आहेत. दिवसरात्र उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे आजार वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. पाण्याचे स्रोतही दूषित होण्याचा धोका निर्माण झाला असून, पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विकासाच्या नावाखाली आमचा श्वास गुदमरतोय, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली आहे.



२०१३ च्या गौण खनिज नियमांनुसार राष्ट्रीय महामार्गापासून ५०० मीटरच्या आत उत्खननास स्पष्ट मनाई आहे. तरीही ही परवानगी दिली गेली कशी, याचे उत्तर प्रशासनाकडे नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात मोठा 'आशीर्वाद' असल्याची कुजबुजही रंगू लागली आहे.

खासदार काळे यांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित परवानगी रद्द करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत उत्खननाचे काम बंद करावे, अशी ठाम मागणी केली आहे.

आता प्रश्न एकच केळझर टेकडी वाचणार का, की प्रशासनाच्या 'मूक संमती'ने ती पूर्णपणे गिळंकृत होणार वर्ध्याच्या जनतेचे डोळे आता सरकारच्या पुढील पावलाकडे खिळले आहेत.

# हिंगणी परिसरात भरदिवसा चोरी; डिक्की फोडून ३० हजारांची रोकड लंपास

## -बसस्थानक चौकातील घटना; पोलिसांत गुन्हा दाखल

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील हिंगणी परिसरात भरदिवसा चोरीची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बसस्थानक चौकात उभ्या असलेल्या मोपेडची डिक्की फोडून अज्ञात चोरट्यांनी ३० हजार रुपयांची रोकड लंपास केली. या प्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बोरी कोकाटे येथील बाबाराव योगराज शिंगारे (वय ५१) यांनी शनिवारी बँकेतून ३० हजार रुपये काढले होते. ही रक्कम त्यांनी आपल्या एमएच ३२ बीएच ५५३७ क्रमांकाच्या मोपेडच्या डिक्कीत ठेवली. त्यानंतर ते हिंगणी येथील खडगी यांच्या हॉटेल परिसरात आले व वाहन उभे करून काही कामानिमित्त गेले.

दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी संधी साधून मोपेडची डिक्की फोडली आणि आत ठेवलेली रोकड चोरून नेली. काही वेळाने शिंगारे परत आल्यावर हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यांनी तातडीने सेलू पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध घेतला जात आहे. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# कार उलटली; एक ठार, एक जखमी

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** भरधाव वेगातील कार अनियंत्रित होऊन उलटल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना रविवारी (दि.३ ) दुपारी सुमारे ४ वाजता बोरी पाटी परिसरात घडली.

मृताचे नाव धनराज उर्फ गजा बाबाराव कांबळे (वय ३५, रा. अंजनगाव जिचकार, ता. काटोल) असे आहे. संदीप मुकुंदा राक्षे (वय ३३) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांबळे व राक्षे हे एमएच-३१-०४८८ क्रमांकाच्या कारने नागपूर मार्गे कन्नमवारग्राम येथे लग्नसमारंभासाठी जात होते. बोरी पाटी जवळ आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्यालगतच्या नालीत जाऊन उलटली.

अपघातात कांबळे यांचा जागीच मृत्यू झाला. जखमी राक्षे यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

# उन्हाचा कहर; लग्नसराईत वऱ्हाडींची अक्षरशः 'लाही लाही'

**सेलू जनमाध्यम :** आकाशातून जणू अग्निवर्षावच होत असल्याचा भास निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा सातत्याने चढत असून सेलू शहर आणि परिसरात उन्हाने अक्षरशः कहर माजवला आहे. कधी ढगांची लपंडाव, तर कधी अंगाची काहिली करणारे कडक ऊन या ऊन-सावल्यांच्या खेळात नागरिकांचा जीव अक्षरशः हैराण झाला आहे.



या रणरणत्या उन्हात लग्नसराईची धामधूम सुरू असून वऱ्हाडी मंडळींची मात्र मोठी परवड होत आहे. डोक्यावर तळपणारा सूर्य आणि अंगातून ओघळणारा घाम यामुळे विवाह सोहळ्यांचा आनंद जणू उकाड्याच्या छायेत हरवताना दिसत आहे. एका दिवसात अनेक लग्ने ठरल्याने वधू-वर पक्षावर व्यवस्थेचा प्रचंड ताण पडत आहे. त्यातच पाणीटंचाईने डोके वर काढल्याने काही ठिकाणी चक्क विकत पाणी आणून लग्नकार्य पार पाडण्याची वेळ आली आहे. बाजारपेठाही लग्नसराईने फुलल्या असल्या, तरी खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्यांची दमछाक होत आहे. अंगावर कोसळणाऱ्या उन्हात कपडे, दागिने, संसारोपयोगी वस्तू खरेदी करताना नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडत आहे. दरम्यान, 'सई बाई गं बाई'च्या गजरात आणि ढोल-ताशांच्या दणदणाटात मिरवणुका रंगत असल्या, तरी उकाड्याने सगळ्यांचीच परीक्षा घेतली आहे. मंगल कार्यालये, लॉन्स येथे कुलर-एसीची मागणी प्रचंड वाढली असून उष्णतेपासून बचाव करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

एकूणच, आनंदाचा सोहळा असलेली लग्नसराई यंदा उन्हाच्या तडाख्यात होरपळत असून, लग्न की उकाडा असा प्रश्न वऱ्हाडींच्या मनात उमटू लागला आहे.

# 'कोअर'त वाघाची डरकाळी; 'बफर'मध्ये बिबट्याचा किलिंग थरार

## -बोर व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग अनुभवाने पर्यटक मंत्रमुग्ध

**सेलू जनमाध्यम :** बोर व्याघ्र प्रकल्पात आयोजित 'निसर्ग अनुभव' उपक्रमात यंदा पर्यटकांना जंगलातील थरारक क्षणांचा जवळून अनुभव घेता आला. कोअर क्षेत्रातील भुलाई डोह परिसरात वाघाची डरकाळी ऐकू आली, तर बफर क्षेत्रातील राखीव वनात बिबट्याने तृणभक्षी प्राण्यावर केलेल्या शिकारप्रसंगाने उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. बुध्द पौर्णिमेच्या निमित्ताने १ मे रोजी हा उपक्रम राबविण्यात आला.



या उपक्रमासाठी एकूण १३० नागरिकांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी ७४ जणांची निवड करून त्यांना कोअर व बफर क्षेत्रातील ४४ मचाणींवर बसविण्यात आले. सूर्यास्तानंतर जंगलात काळोख दाटू लागला आणि त्याचवेळी वन्यजीवांची हालचाल वाढली. पूर्ण चंद्राच्या प्रकाशात पाणवठ्या जवळील परिसर अधिक स्पष्ट दिसत होता.

रात्रीच्या शांततेत टिटवीचे किरकिरणारे आवाज, मोरांचा केकारव, हरिणांची चाहूल यामुळे वातावरण रोमांचकारी बनले. काही पर्यटकांना अस्वल, बिबट, सांबर, हरिण, मोर आदी वन्यप्राण्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. कोअर क्षेत्रात वाघाची डरकाळी ऐकू आल्याने जंगल दणाणून गेले, तर बफर क्षेत्रात बिबट्याने केलेल्या 'किलिंग'चा प्रसंग काहींनी अनुभवला.

### ४४ मचाणींवरून निसर्ग अनुभव

बोर व्याघ्र प्रकल्पाच्या विविध भागांतून या उपक्रमात सहभाग घेण्यात आला. बोरधरण क्षेत्रात २४, न्यू बोरमध्ये १७, हिंगणी क्षेत्रात १२, बांगडापूर क्षेत्रात १६, तर कवडस भागात ५ पर्यटकांनी सहभाग घेतला. सर्वांनी रात्रभर मचाणींवर राहून निसर्ग निरीक्षण केले. मात्र कोअर क्षेत्रात यंदा एकही महिला पर्यटक सहभागी नसल्याचे निदर्शनास आले.

### पर्यटकांच्या प्रतिक्रिया

डॉ. अमोल चाफले यांनी सांगितले की, निसर्ग अनुभवात सहभागी होण्याची इच्छा पूर्ण झाली. शहरातील गोंगाटाऐवजी पक्षी व प्राण्यांचे आवाज ऐकण्याचा अनुभव वेगळाच होता. पर्यावरण संवर्धनाची जाणीव अधिक ठळक झाली. दिनेश हिरुडमर (नागपूर) म्हणाले, मुलासह सहभागी झालो. मोर, सांबर, रानडुक्कर, अस्वलाचे दर्शन झाले. तरुणांना जंगलाचे महत्त्व कळावे, यासाठी हा अनुभव उपयुक्त आहे. विवेक देशमुख (वर्धा) यांनी सांगितले, अनेक दिवसांपासूनची इच्छा पूर्ण झाली. सांबर, नीलगाय व अस्वलाचे दर्शन झाल्याने हा अनुभव अविस्मरणीय ठरला.

# पेंढरी घाटात भीषण अपघात; ट्रक दरीत कोसळला, चालक गंभीर जखमी

**सेलू जनमाध्यम :** हिंगणी नजिकच्या पेंढरी घाट परिसरात रविवारी सकाळी भीषण अपघात घडला. धोकादायक वळणावरून जात असताना मालवाहू ट्रक चालकाचा ताबा सुटल्याने ट्रक थेट खोल दरीत कोसळला. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

राम साकेत (वय ३७) असे जखमी चालकाचे नाव आहे. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दरीत अडकलेल्या चालकाला बाहेर काढून तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.



दरम्यान, रुग्णमित्र प्रज्वल लटारे यांनी स्वतःच्या रुग्णवाहिकेतून जखमीस त्वरित उपचारासाठी हलवले. अपघातात ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

हिंगणा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा सुरू केला असून, अपघाताचे कारण शोधले जात आहे. घाटातील धोकादायक वळणांमुळे अशा घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांनी सुरक्षिततेच्या उपाययोजनांची मागणी केली आहे.

# ११ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार; महिनाभर दडपलेले प्रकरण उघड

## -वडनेरमध्ये संताप; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**वडनेर जनमाध्यम :** गावातील ११ वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. सुमारे महिनाभरापूर्वी घडलेली ही घटना दडपून ठेवण्यात आल्याचा आरोप होत असून, पीडितेच्या आईने तक्रार दाखल केल्यानंतर प्रकरण प्रकाशात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी पाचवीत शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी ती घरी एकटी असताना आरोपीने तिला आमिष दाखवून आपल्या जवळ बोलावले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी नरेश हिरबाजी दिवे (वय अंदाजे ५०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटना घडूनही ती जवळपास महिनाभर दडपून ठेवण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित प्रकरण का लपविण्यात आले, याबाबत चर्चा सुरू आहे. अखेर पीडितेच्या आईने धैर्य दाखवत पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर कारवाईला सुरुवात झाली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# अंगणात खेळताना बालकास सर्पदंश; सेवाग्राम येथे उपचार सुरू

## -पारोधी येथील घटना

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील पारोधी येथे अंगणात खेळत असलेल्या नऊ वर्षीय बालकास सर्पदंश झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तेजस उपेंद्र मेंढे असे सर्पदंश झालेल्या बालकाचे नाव असून, त्याच्यावर सध्या सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तेजस हा आपल्या घराच्या अंगणात खेळत होता. त्यावेळी त्याची आईने त्याला जेवणासाठी हाक दिली. जेवणापूर्वी हात धुण्यासाठी तो घराजवळ ठेवलेल्या पाण्याच्या ड्रमजवळ गेला. याच वेळी अचानक त्याच्या पायाला सापाने दंश केला. सुरुवातीला बालकाला वेदना जाणवल्यानंतर कुटुंबीयांच्या लक्षात ही बाब आली.

घटनेची माहिती मिळताच कुटुंबियांनी तातडीने बालकाला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारासाठी सेवाग्राम येथे हलविण्यात आले. डॉक्टरांकडून त्याच्यावर आवश्यक उपचार सुरू असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पावसाळ्याच्या तोंडावर सापांचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# द्वारकाबाई बोबडे यांचे निधन

**वर्धा :** येथील केळकरवाडी परिसरातील रहिवासी तसेच नागपूरचे वरिष्ठ पत्रकार चंद्रशेखर बोबडे यांच्या मातोश्री द्वारकाबाई वासुदेवराव बोबडे (वय ९०) यांचे रविवारी दुपारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन विवाहित मुली व नातवंडांसह मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. द्वारकाबाई बोबडे यांच्यावर आज सोमवारी सकाळी १० वाजता केळकरवाडी येथून अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



# पुलगाव डंपिंग ग्राउंडला भीषण आग; अग्निशमन दलाच्या प्रयत्नांनी नियंत्रण

**पुलगाव जनमाध्यम :** विदर्भ फॉस्फेट्स फर्टिलायझर कारखान्याजवळील नगरपालिकेच्या डंपिंग ग्राउंडला शनिवारी रात्री साडेसातच्या सुमारास भीषण आग लागली. आग वेगाने पसरत गेल्याने परिसरात धुराचे मोठे लोट पसरले. नगरपालिकेच्या अग्निशमन दलासह सीएडी कॅम्प आणि पुलगाव एम्युनिशन डेपोच्या अग्निशमन पथकाने घटनास्थळी धाव घेत पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले.



शहरातील कचरा येथे साठविला जात असून, कचऱ्याचे वेळेत व्यवस्थापन न झाल्याने मोठा साठा तयार झाला होता. उन्हाळ्यातील उष्णतेमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त होत आहे. ठेकेदाराकडून आवश्यक उपाययोजना करण्यात त्रुटी राहिल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

घटनास्थळी नगरसेवकांनी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. दरम्यान, नगरपालिकेच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत असून, कचरा व्यवस्थापनाबाबत सुधारणा करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

इस्त्रायल, अमेरिका-इराण तणाव किंवा संभाव्य युद्ध ही केवळ या तीन दोन देशांपुरती मर्यादित बाब नसून तिचे पडसाद संपूर्ण जगभर उमटत. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजार, चलनवाढ, व्यापार आणि स्थलांतर या सर्वच घटकांवर त्याचा थेट परिणाम होतो आहे. अविकसित नसलेल्या, पण पूर्णपणे विकसित न झालेल्या भारतासारख्या विकसनशील देशासाठी तर अशा संघर्षांचे परिणाम अधिक तीव्र असतात. सध्याच्या जागतिक परिस्थितीकडे पाहता या संभाव्य युद्धाचे अनेक गंभीर परिणाम पुढे येऊ शकतात. तेलाच्या बाबतीत भारताचे रशिया, इराण वेळ पडल्यास अमेरिकेवरही अवलंबित्व असल्याने युद्धाच्या पार्श्वभूमीवर आपल्या देशाची अवस्था 'गरीब विचारे, कुणीही हाका' अशी झाली आहे. आपले राष्ट्र सार्वभौम असले, तरी आपण तेल कोणाकडून विकत घ्यायचे, याबाबत अमेरिकेचा गेल्या काही महिन्यांपासून दबाव वाढतच चालला आहे. रशियाकडून खरेदी केलेल्या तेलाची किंमत आपल्याला अमेरिकेकडून 'टॅरिफ'च्या माध्यमातून मोजावी लागली आहे. आज आखातामध्ये युद्ध सुरू असले, तरी भारताला मात्र या युद्धाची फार मोठी किंमत मोजावी लागते आहे. गल्लोगल्ली वडापाव, भजीपाव विकणाऱ्या हातगाड्यांवरील विक्रेत्यांपासून ते थेट आखाती देशात हापूस आंब्यांची निर्यात करणाऱ्या आंबा उत्पादकांपर्यंत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फळ बाजारातील व्यापाऱ्यांच्या अर्थकारणावरही या युद्धाचा थेट प्रभाव पडला आहे. इंधनाच्या किमतींवर होणारा परिणाम हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. इराण हा तेल उत्पादन करणाऱ्या प्रमुख देशांपैकी एक आहे. मध्यपूर्वेत युद्ध पेटल्यास तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम होतो. समुद्री मार्ग, विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी, ही जागतिक वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. तिथे अडथळे निर्माण झाले तर कच्च्या तेलाचे भाव झपाट्याने वाढतात. भारत हा तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्यामुळे पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅसच्या किमती वाढतात. परिणामी वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होतो. आज पेट्रोल, डिझेल व गॅसच्या किमती सरकारमुळे आटोक्यात असल्या, तरी या किमतीचा स्फोट कधीही होऊ शकतो अशी परिस्थिती

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# महागाईच्या दिशेने...

आहे. इंधन महागाईमुळे सर्व वस्तूंच्या किमती वाढतात. अन्नधान्य, भाजीपाला, दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे दर वाढल्याने महागाईचा आगडोंब उसळतो. मध्यमवर्गीय आणि गरीब वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसतो. गॅस टंचाई निर्माण होण्याचीही शक्यता असते. घरगुती गॅस सिलिंडर महाग झाल्यास सामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडते. तसे तर आताही गणित कोलमडलेच आहे, पण युद्ध सुरु झाल्यापासून गॅस मिळविण्यासाठी गॅस एजन्सीच्या कार्यालयाचे उंबरठे झिजविण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली आहे. युद्धाचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे मजुरांचे स्थलांतर. आखाती देशांमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय कामगार कार्यरत आहेत. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास या कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. अनेकदा अशा मजुरांना स्वतःच्या राज्यात परतण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे, भारतात बेरोजगारी वाढण्याचा धोका निर्माण होतो आहे. विशेषतः केरळ, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांमध्ये याचे मोठे परिणाम दिसू शकतात. परदेशातून घराघरांत येणारा परकीय चलनाचा ओघ कमी झाल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेलाही धक्का बसतो. परदेशातून मजूर भारतात आले, पण महाराष्ट्रात गॅस टंचाईचा फटका बसू लागल्यावर उत्तर प्रदेश, बिहार, उडिसा भागातील मजुरांनी आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणावर पलायन केले. युद्ध संपल्यावरच हा टक्का महाराष्ट्रात परतण्याची शक्यता आहे. या संघर्षाचे जागतिक युद्धात रूपांतर होण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. कारण अमेरिका आणि इराण यांच्यामागे वेगवेगळे आंतरराष्ट्रीय गट उभे राहू शकतात. रशिया, चीन यांसारखे देश अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष सहभागी झाले, तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. अशा वेळी तिसऱ्या महायुद्धाची भीती व्यक्त केली जाते. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेची परस्परावलंबित्वाची रचना पाहता सर्व देश मोठ्या युद्धापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात, हेही तितकेच खरे आहे. चलन बाजारावरही या संघर्षाचा परिणाम होतो. अनिश्चितता वाढली, की गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. त्यामुळे डॉलर मजबूत होतो आणि भारतीय रुपया कमकुवत होण्याची शक्यता वाढते. रुपयाचे अवमूल्यन झाल्यास आयात महाग होते, ज्यामुळे महागाई आणखी वाढते. विदेशी गुंतवणूक कमी होऊ शकते आणि शेअर बाजारात अस्थिरता निर्माण होते. या सर्वांमध्ये एक महत्त्वाचा; पण कमी चर्चिला जाणारा मुद्दा म्हणजे शेती आणि निर्यात. आखाती देश हे भारताच्या कृषी उत्पादनांसाठी मोठे बाजार आहेत. विशेषतः कोकणातील हापूस आंबा हा आखाती देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. युद्धामुळे व्यापार मार्गांमध्ये अडथळे निर्माण झाले. निर्यात थांबल्याने कोकणातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच हवामान बदल, उत्पादन खर्च वाढ आणि बाजारातील अनिश्चितता यांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा आणखी एक मोठा धक्का आहे. एकूणच पाहता, अमेरिका-इराण युद्धाचा प्रभाव बहुआयामी आहे. इंधन दरवाढ, महागाई, गॅस टंचाई, मजुरांचे स्थलांतर, रुपयाचे अवमूल्यन आणि शेती क्षेत्रातील नुकसान या सर्व गोष्टी भारतासमोर गंभीर आव्हाने उभी करतात. त्यामुळे भारताने ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरण, स्थानिक उत्पादन वाढवणे, परदेशातील कामगारांसाठी सुरक्षा धोरणे आणि निर्यात बाजारांचे विस्तार यावर भर देणे अत्यावश्यक आहे. जगभरातील तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक तोडगा काढणे हीच काळाची गरज आहे. कारण युद्धाचे परिणाम केवळ रणांगणापुरते मर्यादित राहत नाहीत, ते प्रत्येक सामान्य नागरिकाच्या आयुष्यावर खोलवर परिणाम करतात. आताचे युद्धजन्य परिस्थिती उद्या संपुष्टात येईलही, पण वाढलेली महागाई कधी कमी होणार नाही.

# अमिरातीच्या 'एक्झिट'चा अन्वयार्थ

संयुक्त अरब अमिराती (यूएई) या देशाने ओपेक आणि ओपेक प्लस या बलाढ्य तेल संघटनांमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असून जागतिक ऊर्जा बाजारासाठी हा एक मोठा धक्का आहे. कारण, आमिराती हा ओपेकचा तिसरा सर्वात मोठा तेल उत्पादक देश आहे. गेल्या काही काळापासून यूएई आणि सौदी अरेबिया यांच्यात उत्पादनाच्या मर्यादेवरून मतभेद वाढत होते. यूएईकडे तेल उत्पादनाची क्षमता अधिक असूनही ओपेकच्या नियमांमुळे त्यांना मर्यादित उत्पादन करावे लागत होते. यामुळे त्यांच्या आर्थिक महत्त्वाकांक्षेला खीळ बसत होती.

व्हिएन्ना येथील 'ओपेक' मुख्यालयाच्या भिंतीवर गेल्या सहा दशकांपासून कोरलेल्या एकजुटीला अखेर तडे गेले आहेत. याचे कारण, आखाती देशांमधील एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रभावशाली खेळाडू असलेल्या संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) 'ओपेक' आणि 'ओपेक प्लस' या तेल उत्पादक देशांच्या संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक बाजारपेठेच्या दृष्टीने ही अत्यंत मोठी घडामोड मानली जात आहे. या निर्णयामुळे तेल उत्पादक देशांच्या संघटनेतील अंतर्गत तणाव आणि बदलती भूराजकीय समीकरणे समोर आली आहेत. आमिरातीचे ऊर्जामंत्री सुहेल अल मझरौई यांनी या निर्णयाचे कारण देताना हा दीर्घकालीन धोरणात्मक बदलांचा भाग असल्याचे म्हटले आहे. आजवरच्या सहकार्याबद्दल ओपेकचे आभार मानतानाच आता आम्ही स्वतःच्या धोरणानुसार ऊर्जा सुरक्षा आणि पुरवठ्यावर लक्ष केंद्रित करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. इराणसोबतच्या युद्धाच्या सावटाखाली जेव्हा जगाला ऊर्जेची प्रचंड टंचाई जाणवत आहे, अशा संवेदनशील वळणावर यूएईने घेतलेली ही 'एक्झिट' जागतिक तेल बाजारातील नव्या अनिश्चिततेची नांदी मानली जात आहे.

'ओपेक' म्हणजे 'ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज'. याची स्थापना १९६० मध्ये बगदाद परिषदेत झाली. इराण, इराक, कुवेत, सौदी अरेबिया आणि व्हेनेझुएला या पाच देशांनी एकत्र येऊन पाश्चिमात्य तेल कंपन्यांच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी ही संघटना उभारली. १९६७ मध्ये अबुधाबी या संघटनेत सामील झाले आणि १९७१ मध्ये यूएईच्या स्थापनेनंतर हे सदस्यत्व कायम राहिले. जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा आणि किंमत नियंत्रित करणे हा या संघटनेचा मुख्य गाभा आहे. २०१६ मध्ये रशिया आणि इतर १० बिगर ओपेक देशांनी या गटासोबत सहकार्य सुरू केले, तेव्हा 'ओपेक प्लस' अस्तित्वात आली. यामुळे जागतिक तेल पुरवठ्यातील या गटाचा वाटा ४१ टक्क्यांपर्यंत पोहोचला. जागतिक अर्थव्यवस्थेची नाडी या संघटनेच्या हातात राहिली आहे. त्यांनी उत्पादनात केलेली थोडीही कपात जागतिक बाजारात इंधनाचे दर गगनाला भिडवू शकते. 'ओपेक'मधून बाहेर पडण्याचा ऐतिहासिक निर्णय घेताना यूएईने 'राष्ट्रीय हित' असे कारण दिले असले, तरी या निर्णयामागे अनेक गुंतागुंतीचे घटक आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. गेल्या काही वर्षांमध्ये आमिरातीने आपल्या तेल पायाभूत सुविधांमध्ये १५० अब्ज डॉलर्सची प्रचंड मोठी गुंतवणूक केली आहे. आजघडीला या देशाची तेल उत्पादन क्षमता दररोज ४८ लाख बॅरेलच्या वर आहे आणि २०२७ पर्यंत ती ५० लाखांपर्यंत नेण्याचे त्यांचे लक्ष्य आहे; मात्र ओपेकच्या 'कोटा' पद्धतीमुळे त्यांना या क्षमतेचा पूर्ण वापर करता येत नाही. स्वतःच्या अर्थव्यवस्थेला 'पोस्ट ऑईल' युगासाठी म्हणजेच तेलावलंबित्वापलीकडच्या विकासासाठी तयार करताना

**ओपेकच्या बंधनातून मुक्त झाल्यावर यूएई आता दररोज सुमारे ४ दशलक्ष बॅरेल तेलाचे उत्पादन आपल्या गरजेनुसार वाढवू शकतो. यामुळे कच्चे तेल प्रतिबॅरेल ९५ ते १०० डॉलर्सच्या दरम्यान खाली येऊ शकते, ज्यामुळे भारतासारख्या आयातदार देशांना तात्पुरता दिलासा मिळू शकतो.**




अमिरातीला जास्तीत जास्त तेल विकून भांडवल उभे करायचे आहे. यासाठी हे मोठे पाऊल आमिरातीने उचलल्याचे दिसत आहे.

दुसरे म्हणजे, इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी (स्ट्रेट ऑफ होर्मुझ) प्रभावीपणे बंद झाल्यामुळे जागतिक तेलपुरवठा विस्कळीत झाला आहे. अशा स्थितीत ओपेकचा संस्थापक सदस्य असणाऱ्या इराणसोबत एकाच संघटनेत राहणे यूएईला धोरणात्मक दृष्ट्या अवघड जात होते. त्यामुळेच ओपेकला सोडचिठ्ठी देत अमिरातीने आता अमेरिकेसोबतचे तेलसंबंध अधिक घट्ट करण्यावर भर देण्याचे ठरवले आहे. सौदी अरेबियाकडे जगातील सर्वात मोठे तेल साठे आणि उत्पादन क्षमता असल्याने १९६० मध्ये 'ओपेक'ची स्थापना झाल्यापासून संघटनेच्या प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयावर रियाधचा मोठा प्रभाव राहिला आहे. जागतिक बाजारपेठेत जेव्हा जेव्हा तेलाचे दर कोसळतात, तेव्हा सौदी अरेबिया स्वतःच्या उत्पादनात मोठी कपात करून किमती स्थिर ठेवण्याची भूमिका पार पाडतो. याला अर्थशास्त्रात 'स्विंग प्रोड्युसर' असे म्हटले जाते. १९७३ च्या तेल संकटकाळात सौदी अरेबियाने आपल्या प्रभावाचा वापर राजकीय शस्त्र म्हणून केला होता. पाश्चिमात्य देशांना धडा शिकवण्यासाठी तेलपुरवठा रोखून त्यांनी जागतिक अर्थव्यवस्थेची चक्रे फिरवली होती. त्यानंतरच्या काळातही, मग ते १९८० मधील तेलाचे युद्ध असो किंवा २०१४ मधील अमेरिकन शेल गॅसशी असलेली स्पर्धा, सौदी अरेबियाने नेहमीच बाजारपेठेतील आपला वाटा टिकवून ठेवण्यासाठी ओपेकच्या धोरणांना दिशा दिली आहे. संघटनेतील इतर छोटे देश अनेकदा उत्पादनाचा कोटा पाळत नाहीत तेव्हा सौदी अरेबिया कठोर भूमिका घेऊन सर्वांना शिस्त लावण्याचे काम करतो. सौदी अरेबियाचा हा प्रभाव केवळ ओपेकपुरता मर्यादित नसून तो 'ओपेक प्लस'मध्येही दिसून येतो. २०१६ मध्ये रशियाला या गटात सामील करून घेण्यामागे सौदीचे मुत्सद्दी राजकारण होते, ज्यामुळे जागतिक तेल उत्पादनावर या गटाची पकड अधिक घट्ट झाली. 'व्हिजन २०३०' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत तेलावरचे अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत असतानाही सौदी अरेबिया जागतिक ऊर्जेच्या राजकारणात स्वतःचे केंद्रस्थान टिकवून ठेवण्यासाठी ओपेकचा एक प्रभावी व्यासपीठ म्हणून वापर करत आहे. यूएईला हे मान्य नाही. कारण, याचा आर्थिक फटका त्यांना सहन करावा लागतो. गेल्या काही वर्षांत सौदी अरेबियाशी यूएईचे संबंध ताणले गेले आहेत. येमेनमधील युद्धाबाबतचे वेगळे दृष्टिकोन आणि प्रादेशिक वर्चस्वाची स्पर्धा यामुळे दोन्ही देशांमधील दरी रुंदावली आहे. सौदीने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांची प्रादेशिक कार्यालये दुबईहून रियाधला हलवण्याचे फर्मान सोडले आहे. यामुळेही आमिराती नाराज आहे. यूएईने 'अब्राहम अ?कोर्डस'द्वारे इस्त्रायलशी संबंध सुधारले आहेत. त्यांना आता केवळ सौदीच्या सावलीत न राहता स्वतःचे स्वतंत्र जागतिक अस्तित्व निर्माण करायचे आहे. त्याचा परिणाम म्हणून ताज्या निर्णयाकडे पाहावे लागेल.

कारणे काहीही असली तरी 'ओपेक'मधील तिसऱ्या क्रमांकाचा तेलपुरवठादार असणारा हा देश संघटनेतून बाहेर पडल्याने ओपेकची बाजारपेठेवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता १५ टक्क्यांनी कमी झाली आहे. येत्या काळात तेल उत्पादक देशांमध्ये स्पर्धा वाढून इंधनाचे दर कमी होऊ शकतात, असा अंदाज वर्तवला जात आहे; मात्र इराण युद्धाच्या सावटाखाली असलेल्या जागतिक बाजारात ही स्थिरता किती काळ टिकेल, हा प्रश्नच आहे. तथापि, यूएईचे हे पाऊल जुन्या जागतिक ऊर्जा व्यवस्थेच्या अंताची सुरुवात असू शकते. यापूर्वी कतारने २०१९ मध्ये ओपेकमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. कतार हा प्रामुख्याने नैसर्गिक वायू (एलएनजी) उत्पादनात जगातील आघाडीचा देश आहे. तेल उत्पादनापेक्षा वायू उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि सौदी अरेबियाशी असलेल्या राजकीय तणावामुळे त्यांनी हा निर्णय घेतला होता. त्यानंतर अंगोलाने डिसेंबर २०२३ मध्ये या संघटनेतून बाहेर पडण्याची घोषणा केली. ओपेकने अंगोलाच्या तेल उत्पादन मर्यादेत केलेली कपात न मान्य झाल्याने त्यांनी हे पाऊल उचलले. या दोहोनंतर आता यूएईने घेतलेला हा पवित्रा इतर देशांनाही अशाच प्रकारच्या निर्णयासाठी प्रवृत्त करू शकतो. यामुळे भविष्यकाळात 'ओपेक' आणि 'ओपेक प्लस'चे अस्तित्व राहणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे; पण यामुळे ऊर्जा बाजारपेठ अधिक स्पर्धात्मक आणि बहुध्रुवीय होईल, यात शंका नाही. पश्चिम आशियातील प्रादेशिक युतींमध्येही यामुळे मोठी दरी निर्माण झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. सौदी आणि यूएई यांच्यातील शीतयुद्ध येणाऱ्या काळात कोणते रंग दाखवते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

सध्या इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्याने तेलपुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप ११० डॉलरच्या वर गेल्या आहेत. यूएईने ओपेक सोडल्याची बातमी धडकल्यानंतर किमतीत थोडी घट झाली असली, तरी युद्ध सुरू आहे, तोपर्यंत दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे; मात्र नंतरच्या काळात यूएई जेव्हा ओपेकच्या बंधनाशिवाय तेल उत्पादन सुरू करेल, तेव्हा बाजारात तेलाचा महापूर येईल. मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्यामुळे किमतीत मोठी घसरण होऊ शकते. हे ग्राहकांसाठी चांगले असले, तरी यामुळे बाजारात कमालीची अस्थिरता (व्होलॅटॅलिटी) निर्माण होण्याची शक्यता आहे. ओपेकचे काम बाजारातील चढ-उतार नियंत्रित करणे होते, आता ती यंत्रणाच दुबळी झाल्याने तेलाचे दर कोणत्याही दिशेला भरकटू शकतात. यूएईच्या या निर्णयामागे अमेरिकेचा काही डाव नाही ना, हेही तपासून पाहणे गरजेचे आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नेहमीच ओपेकवर टीका केली आहे. हे कार्टेल जगाला लुटत आहे, असा आरोप त्यांनी वारंवार केला होता. अमिराती हा अमेरिकेचा अत्यंत जवळचा मित्र देश आहे. यूएईने ओपेकमधून बाहेर पडणे म्हणजे अमेरिकेच्या 'कमी किमतीतील तेल' या अजेंड्याला पाठिंबा देणारे आहे. इराणच्या हल्ल्यांपासून संरक्षण देण्यात त्यांचे अरब शेजारी कमी पडले आहेत, अशी आमिरातीची धारणा झाली आहे. त्यामुळे त्यांनी आता सौदीच्या छत्राखाली राहण्यापेक्षा अमेरिकेशी थेट संधान बांधून आपला आर्थिक मार्ग चोखाळणे पसंत केले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

अमिरातीने घेतलेली ही जोखीम यशस्वी ठरते की त्यांना पुन्हा ओपेकच्या आश्रयाला जावे लागते, हे काळच ठरवेल; पण तोपर्यंत जागतिक ऊर्जा बाजारातील घुसळण वाढणार आहे, हे निश्चित!

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

## निवडक संवेदनशीलता' व 'सोयीचे राजकारण'

एखाद्या घटनेकडे माणुसकीच्या नजरेतून पाहण्याऐवजी, जर पीडितेची जात किंवा आरोपीची पार्श्वभूमी पाहून प्रतिक्रिया दिली जात असेल, तर ती सामाजिक न्यायाची थट्टा ठरते. 'अमुक एका जातीची पीडिता असेल तरच आम्ही बोलणार' ही भूमिका समाजाला अधिक दुभंगते. पुण्याजवळील नरसिंगपूर येथील कोवळ्या मुलीवर एका नराधमाने बलात्कार करून तिचा खून केला आहे.पण यावर प्रकाश आंबडेकर, असीम सरोदे, विश्वंभर चौधरी तसेच डावे पक्ष व विचारवंत चुप्पी साधून आहे. सदर घटना हृदयद्रावक आणि संतापजनक आहे. अशा वेळी गुन्हेगाराला जात नसते आणि पीडितेच्या जातीवरून तिचे दुःख कमी-जास्त ठरत नाही. आज जर एखादी घटना त्यांच्या 'नॅरेटिव्ह'मध्ये बसत नसेल, तर त्यावर मौन पाळणे त्यांना सोयीचे वाटते. यालाच 'बौद्धिक दांभिकपणा' असेही संबोधले जाते.खर तर कोणत्याही लहान मुलीवर झालेला अत्याचार ही संपूर्ण समाजासाठी शरमेची बाब असते. तिथे जात, धर्म किंवा राजकीय विचार बाजूला ठेवून गुन्हेगाराला कठोर शिक्षा व्हावी, हीच प्रमुख मागणी असायला हवी. जेव्हा प्रतिष्ठित व्यक्ती अशा घटनांवर गप्प बसतात, तेव्हा त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे अटळ आहे. यालाच मराठीत चपखल शब्दात सांगायचे तर 'धोरणी मौन' किंवा 'वैचारिक पक्षपातीपणा' म्हणता येईल.

**अविनाश देशपांडे**

## राज्यातील बेपत्ता महिलांचा प्रश्न चिंताजनक

गेल्या दोन वर्षांत राज्यातील एक लाख सतरा हजार तीनशे सत्तर महिला बेपत्ता झाल्याची नोंद राज्य पोलिसांकडे होती. त्यापैकी ३१ हजार १४१ महिलांचा अद्यापही काहीच थांगपत्ता नसल्याची धक्कादायक माहिती अलीकडेच विधानसभेत देण्यात आली होती. गृह मंत्रालयाचा कारभार पाहणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आलेल्या लेखी उत्तरात ही माहिती सभागृहाला देण्यात आली. बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये २३ हजार ४२९ अल्पवयीन मुली असून त्यापैकी चार हजारांच्या वर मुलींचा अद्यापही काहीच सुगावा लागलेला नाही. या आकडेवरुन राज्यातील महिला गायब होण्याचा प्रश्न किती गंभीर आहे याची कल्पना येते. याबाबतचा प्रश्न मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड यांच्यासह बत्तीस सदस्यांनी उपस्थित केला होता. त्यानुसार मागील दोन वर्षांतील तपशिलवार माहिती गृह खात्याने सभागृहापुढे मांडली होती.

राज्यात आणि देशात मुली आणि महिला बेपत्ता होण्यामागच्या कारणांचा तातडीने शोध घेण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरु असलेले मुली आणि स्त्रियांच्या शोषणाचे वाढते प्रकार, मानवी तस्करी करणाऱ्या टोळ्या तसेच मानवी अवयवांच्या खरेदी-विक्रीतून होणारी कोट्यवधी रुपयांची उलाढाल अशा काही कारणांमुळे महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे काय, अशी शंका निर्माण होते. या प्रकाराकडे राज्य आणि केंद्र सरकारने अधिकाधिक गंभीर होण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

## आयोगाची गरज आहे का?

राज्यात २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य गाठण्यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. येत्या वीस वर्षांत राज्यात ३०० कोटी झाडे लावणार आहेत. आयोग एका वर्षात संपूर्ण राज्यात फक्त १५ कोटी वृक्ष लावणार आहे.

एका वर्षात १५ कोटी वृक्ष लावण्यास आयोगाची काय गरज आहे? वन खाते असताना वेगळे आयोग केल्यास त्यांच्यात समन्वय न राहिल्यास वृक्षरोपण मोहीम फसली जाईल. आयोगाची स्थापना करत असाल तर संपूर्ण राज्यात वर्षाला शंभर कोटी वृक्ष लावून त्याचे संगोपन केले पाहिजे. सगळ्या तालुक्यातून वृक्षरोपण व त्यांचे संगोपण मोहीम राबवली पाहिजे. वृक्षांमुळे पावसाचे प्रमाण योग्य राहण्यास मदत होते. जंगलांचा नाश झाल्यास दुष्काळ, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती वाढतात.

येत्या काळात वृक्षरोपण केले नाही तर पुढच्या पिढीला जगणे कठीण होईल. 'एक झाड लावा, जीवन वाचवा' हा संदेश लक्षात घेऊन प्रत्येकाने वृक्षरोपण करणे आवश्यक आहे.

पर्यावरणाचे रक्षण आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जीवन निर्माण करण्यासाठी वृक्षरोपण हा सर्वोत्तम उपाय आहे.

**विवेक तवटे,**

जनमाध्यम संवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रीया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

## अफवांचा फटका कलिंगडाला

मुंबईतील पायधुनी परिसरातील दोकाडिया कुटुंबाच्या मृत्यू प्रकरणामुळे कलिंगडाबाबत गैरसमज पसरल्याचे दिसून येत आहे. संबंधित कुटुंबाने मध्यरात्री मटण बिर्याणी खाल्ल्यानंतर कलिंगडही खाल्ले होते. त्यानंतर त्यांच्या मृत्यूची घटना घडली. मात्र, या घटनेत कलिंगडामुळे विषबाधा झाली असा निष्कर्ष तत्काळ काढण्यात आला आणि त्यामुळे कलिंगड फळ विनाकारण बदनाम झाले. प्रत्यक्षात, मटण बिर्याणीसाठी वापरलेल्या मांसाची गुणवत्ता, प्राण्यांचे आरोग्य, अन्न साठवण आणि स्वच्छता या सर्व बाबींची तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्न व औषध प्रशासन तसेच पोलिस यंत्रणा या घटनेचा सखोल तपास करत आहेत. तरीही तपास पूर्ण होण्यापूर्वीच कलिंगडाला दोष देण्यात आल्याने बाजारात त्याच्या विक्रीवर परिणाम झाला आहे. याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे, कारण उन्हाळ्यात कलिंगड हे महत्त्वाचे उत्पन्न देणारे पीक आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी लवकरात लवकर सत्य स्पष्ट करून कलिंगडाबाबतचा गैरसमज दूर करणे गरजेचे आहे.

**संजय साळगांवकर, कुर्ला**

## अपना भिडू बच्चू कडू...

ओमप्रकाश बाबाराव उर्फ बच्चू कडू हे महाराष्ट्रातील शेतकरी आणि आक्रमक राजकारणी असून ते प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. बच्चू कडू हे अमरावती जिल्ह्याच्या अचलपूर विधानसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडून आलेले अपक्ष आमदार होते युवकांचे संघटन करून शेतकरी, दिव्यांग आणि स्थानिकांचे अनेक प्रश्न त्यांनी आक्रमकपणे समोर आणले आहेत.

आपल्या अभिनव आंदोलनाबद्दल बच्चू कडू महाराष्ट्रात विशेष प्रसिद्ध आहेत. २०१९ मध्ये स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारमध्ये कडू यांनी शिवसेनेच्या कोट्यातून जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, कामगार या खात्यांचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले होते नुकताच ते हमी भावातील सुधारणा, लाडक्या बहिणींमधल्या विधवा बहिणींचा मुद्दा, दिव्यांगाच्या मंत्रालयाचं बळकटीकरण हे सगळे मुद्दे मान्य झाल्यामुळे शिंदे शिवसेनेत प्रवेश केला असून त्यांना विधान परिषदेत आमदार होण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा आवाज घुमणारं आहे प्रहार संघटना कार्यरत रहाणारं असून त्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत कडुंच्या राजकीय प्रवासाला ठाकरे शिवसेनेतून सुरुवात झाली होती मात्र काही कारणाने तीला अलविदा करुन ते अपक्ष लढत होते महाराष्ट्रामध्ये ते 'बच्चूभाऊ' या नावाने लोकप्रिय असून 'अपना भिडू बच्चू कडू' ही त्यांच्या समर्थकांची आवडती घोषणा निश्चितच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना बळ देईल !

**राजू जाधव,**
मांगूर जि.बेळगांव

## बिहारच्या राजकारणातील टर्निंग पॉईंट

नुकतेच बिहारच्या राजकारणात झालेला नेतृत्वबदल हा दीर्घकालीन राजकीय समीकरणांना नवी कलाटणी देणारा ठरतो. नितीशकुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. बिहारच्या सत्तेवर भाजपने पहिल्यांदाच आपला त्यात ठसा उमटवला आहे. गेली अनेक वर्षे किंगमेकर किंवा सहयोगी पक्षाच्या भूमिकेत राहिलेल्या भाजपने आता किंग होण्याचा निर्णय प्रत्यक्षात आणला, असे या सत्तांतराकडे पाहता येईल. सम्राट चौधरी यांची निवड ही केवळ सन्घटनात्मक किंवा वैयक्तिक क्षमतेचा सन्मान नाही, तर ती एक स्पष्ट राजकीय रणनीती आहे. ओबीसी समाजातील कोयरी समुदायातून येणाऱ्या सम्राट चौधरी यांच्या माध्यमातून भाजपने बिहारमधील जातीय समीकरणांना थेट स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्याच्या राजकारणात जातीय घटक नेहमीच निर्णायक ठरलेले आहेत. त्यामुळे पुढील काळात भाजप सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग अधिक प्रभावीपणे राबवणार, याचे संकेत या निवडीतून स्पष्ट होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अजंतीत चिमुरडीचा बळी..!

## ७५ वर्षांनंतरही पारधी समाज वंचित : जबाबदार कोण?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली, विकासाच्या गप्पा रंगत असताना नेर तालुक्यातील अजंती येथील पारधी बेड्यावर आजही अन्न, वस्त्र, निवारा आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष सुरू आहे. या भीषण वास्तवाची किंमत एका निरागस बालिकेला जीव गमावून चुकवावी लागली, ही बाब प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या संवेदनशीलतेवर थेट प्रश्नचिन्ह उभी करते.

गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करत "पारधी समाज माणूस नाही का?" असा जाहीर सवाल उपस्थित केला आहे.



गावात तीव्र पाणीटंचाई असून पारधी कुटुंबांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. एवढेच नव्हे, तर जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यास मज्जाव, मुलांना शाळेत भेदभाव, आणि कुठलीही चोरी झाली की सरळ या समाजावर संशय अशा सामाजिक बहिष्काराच्या छायेत त्यांचे जीवन सुरू आहे. या गंभीर परिस्थितीकडे प्रशासनाने सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत गेडाम यांनी पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यावरही टीका केली आहे. "एका निष्पाप मुलीचा जीव गेल्यावरच प्रशासन जागे होते, तर अशी व्यवस्था कशासाठी?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, प्रशासनाने या मृत्यूबाबत उष्माघाताचे कारण नाकारत सायंकाळी मृत्यू झाल्याने तो उष्माघात नसल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. पोस्टमॉर्टेमही न झाल्याने मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र, अशा प्रकारचे स्पष्टीकरण देत मूलभूत प्रश्नांकडून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. गेल्या दहा वर्षांपासून गुरुदेव युवा संघ या बेड्यावरील प्रश्न मांडत असतानाही ठोस उपाययोजना झाल्या नाहीत. घरकुल, शबरी योजना व इतर शासकीय लाभ आजही कागदावरच असल्याचा आरोप आहे. एका चिमुरडीचा बळी गेल्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का, की अजून किती जीव गेल्यावर व्यवस्था हालचाल करणार? अजंतीतील ही घटना केवळ एक अपघात नसून, व्यवस्थेच्या उदासीनतेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. पारधी समाजाला न्याय आणि मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी आता निर्णायक पावले उचलली जाण्याची गरज असल्याची चर्चा नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# बाभूळगाव तालुक्यात बारावी निकालात दोन विद्यालयांची शतप्रतिशत कामगिरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत बाभूळगाव तालुक्यातील दोन विद्यालयांनी शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याचा मान उंचावला आहे.

कोटंबा येथील तथागत सायन्स ज्युनिअर कॉलेज तसेच बाभूळगाव येथील ख्वाजा गरीब नवाज उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स या दोन्ही विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षक व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.या खालोखाल आर्ट्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, चिमणा बागापुर यांनी ९९.५६ टक्के निकाल नोंदवला. तसेच मातोश्री नानीबाई घारफळकर विद्यालय, बाभूळगाव (९७.२५%), शिवशक्ती आर्ट्स अँड कॉमर्स ज्युनिअर कॉलेज, बाभूळगाव (९६.७३%), शिवाजी ज्युनिअर कॉलेज, घारफळ (९६.५५%) आणि तथागत ज्युनिअर कॉलेज, कोटंबा (९५.५२%) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले आहे. याशिवाय मदनेश्वर आश्रम शाळा, मादणी (९३.१०%), शिक्षण विकास मंडळ ज्युनिअर कॉलेज, दाभा (९१.६६%), एस. व्ही. एम. हायर सेकंडरी, दाभा (९१.३०%) आणि प्रताप आर्ट्स अँड कॉमर्स ज्युनिअर कॉलेज, बाभूळगाव (९१.१७%) यांनी समाधानकारक निकाल नोंदवला. दरम्यान, संत तुकाराम महाराज ज्युनिअर कॉलेज, राणी अमरावती यांचा निकाल ७५.७५ टक्के लागून तालुक्यात सर्वात कमी ठरला. निकालानंतर विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येत असून, यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# शासकीय कामात अडथळा केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्तता

## पुसद जिल्हा न्यायालयाचा महत्वपुर्ण निकाल!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - येथील वि.जिल्हा न्यायाधिश क्रमांक ३ श्रीमती शाह मॅडम यांनी त्याचे न्यायालयीत प्रलंबीत सत्र घटला क. १३१/२०१९ शासन विरूध्द-प्रकाश उर्फ आशिष चव्हाण या प्रकरणातील आरोपीस पुराव्याअंती दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजीचे आदेशान्वये भां.द.वी. चे कलम ३५३, ३२३, ५०६ चे गुन्हयाचे आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी नामे- मुकेश रामस्वार्थ प्रसाद (ऑपरेटर सब स्टेशन एम.एस.ई.बी. काळी दौ.) यांनी पोलीस स्टेशन पुसद ग्रामीण येथे दिनांक ०४ जुन २०१६ रोजी तक्रार दिली होती की, दिनांक ०४ जुन २०१६ रोजी ते एम.एस.ई.बी. चे सब स्टेशन काळी दौ. येथे ऑपरेटर म्हणुन कार्यरत असतांना रात्री ९.०० वाजताचे सुमारास आरोपी आशीष उर्फ प्रकाश बळीराम चव्हाण याने सब स्टेशनच्या आवारात येवून लाईट का बंद केली असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण करून त्याचे शासकीय कामात अडथळा केल्या बाबतची तक्रार दिली होती त्यावरून पोलीस स्टेशन पुसद ग्रामीण येथे गुन्हा क. १५७/२०१६ नुसार दाखल करून प्रकरणाचा तपास होवून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात सरकारी पक्षाचे वतीने एकुण ०५ साक्षदार तपासण्यात आले पुराव्याअंती आरोपीचे वकील अ‍ॅड. जहीर एस. खान यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरून न्यायालयाने आरोपीची सदर गुन्हयातून निर्दोष मुक्तता केली आहे. सदर प्रकरणात आरोपीचे वतीने अ‍ॅड. जहीर एस. खान यांनी प्रभावीपणे बाजु मांडली व त्याना अ‍ॅड. वाय. एच. मिर्झा यांनी सहकार्य केले आहे.

## राळेगाव तालुक्यातून विज्ञान शाखेत स्मॉल वाँडर वडकीची उतुंग भरारी

राळेगाव - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून राळेगाव तालुक्यातील न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय राळेगाव 78.50 टक्के, कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव 82.08 टक्के, गाडगे महाराज कनिष्ठ महाविद्यालय अंतरगाव62.32 टक्के उच्च माध्यमिक वला विज्ञान आश्रमशाळा सावरखेड 66.37, गुरूदेव उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय वरध,30.38 टक्के यशवंत ज्यूनियर कॉलेज खैरी,84.61 टक्के, परमपूज्य डॉ.आर एम उच्च माध्यमिक कला व विज्ञान आश्रमशाळा खैरगाव 44.70मार्कंडेय ज्यूनियर कॉलेज बरडगाव 97.05, राळेगाव, श्री लखाजी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयीन झाडगाव 61.90टक्के, महात्मा ज्योतिबा फुले ज्यूनियर कॉलेज वाढोणाबाजार 71.42टक्के , डॉ विराणी सायन्स कॉलेज राळेगाव 100टक्के,स्व. खुशालराव मानकर कला व विज्ञान महाविद्यालय सावरखेड 64.06टक्के , लोक उच्च माध्यमिक वाणिज्य महाविद्यालय खैरी 85.71टक्के, इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय राळेगाव 91.42टक्के कुसुमताई वादाफळे कनिष्ठ महाविद्यालय वाटखेड 65.51टक्के अशा प्रकारे निकाल नुकताच जाहीर झाला असून विज्ञान शाखेतून राळेगाव तालुक्यातून स्माल वडंर वडकीची विद्यार्थीनी कुमारी तन्वी मोहन बोरकर ही विद्यार्थिनी 86.17टक्के घेऊन तालुक्यातून प्रथम आली.

# वेचक

## ग्रामपंचायत टेंभीचा अभिनव उपक्रम : ग्रामस्थांचा सन्मान



महागाव : ग्रामपंचायत टेंभीच्या वतीने ग्रामविकास आणि ग्रामसमृद्धीला चालना देण्यासाठी एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आर्थिक वर्षाच्या १ एप्रिल रोजी ज्या ग्रामस्थांनी स्वखुशीने गृहकर व पाणी कर भरून आपले कर्तव्य पार पाडले, अशा कर्तव्यदक्ष नागरिकांचा सन्मान करण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. या उपक्रमामागील उद्देश म्हणजे ग्रामस्थांमध्ये गावाप्रती स्वाभिमान, जबाबदारीची जाणीव आणि लोकसहभाग वाढवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत दरवर्षी सर्वप्रथम कर भरणाऱ्या ग्रामस्थांना ध्वजारोहणाचा मान देण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कार्यालय येथे ध्वजारोहण श्री. पंजाबराव सुकळकर यांच्या हस्ते, उच्च प्राथमिक मराठी शाळा येथे ध्वजारोहण सौ. नलिनी सुनील गोरे यांच्या हस्ते, पशुवैद्यकीय दवाखाना येथे ध्वजारोहण सेवानिवृत्त बसचालक श्री. संभाजी तामसकर यांच्या हस्ते पार पडले. टेंभी ग्रामस्थांचा सन्मान करण्याचा हा अभिमानास्पद क्षण ग्रामपंचायत सरपंच, सदस्य आणि प्रशासनाला लाभला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी वेरूळकर साहेब, सरपंच श्री. अमोल चिकने, ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दारव्हा एसडीपीओ पथकाची दिग्रसमध्ये धडक कारवाई



दिग्रस - दिग्रस-आर्णी मार्गावर अवैध गांजा विक्री करणाऱ्यांवर दारव्हा एसडीपीओ पथकाने शनिवारी दि. २ मे सायंकाळी जोरदार कारवाई करत एका आरोपीला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेख जावेद शेख मूनाफ (वय - ४५) वर्ष रा. दिग्रस हा दिग्रस-आर्णी रस्त्यालगत संशयास्पद हालचाली करत पिशवीसह उभा असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानुसार दारव्हा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ सापळा रचून त्याची झडती घेतली. झडतीदरम्यान आरोपीकडून ३.१५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत सुमारे ७ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. पथकाने आरोपीला ताब्यात घेत पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या कारवाईवेळी दारव्हा पथकासह दिग्रस पोलीस आणि नायब तहसीलदार संदीप सोनकुसरे हेही घटनास्थळी उपस्थित होते.

# "शासकीय आश्रम शाळा, वडगाव शिंदे येथे २१ दिवसीय उन्हाळी शिबिराचे उद्घाटन उत्साहात"

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - शासकीय आश्रम शाळा (इंग्रजी माध्यम), वडगाव शिंदे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने २१ दिवसांच्या उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, हे शिबिर दि.१ मे २०२६ ते २१ मे २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. शिबिराचे उद्घाटन आज दि. १ मे रोजी माननीय प्रकल्प अधिकारी श्री. अमोल मेतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक व सर्जनशील क्षमतांचा विकास साधण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. शिबिराची सुरुवात दररोज सकाळी ६.०० वाजता योगा व मेडिटेशनद्वारे होणार असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यवृद्धीसोबत मानसिक एकाग्रता वाढीस मदत होणार आहे. दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पुढील विषयांवर व्याख्याने व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येणार आहेत. स्पोकन इंग्लिश व बेसिक इंग्लिश ग्रामर, डिजिटल लिटरसी, इंट्रोडक्शन टू AI, सायबर सिक्युरिटी अवेअरनेस, कुकिंग विदाऊट फायर, मेहंदी आर्ट, क्ले आर्ट, व्यक्तिमत्व विकास, पर्सनल हायजीन, तसेच संगीत कला इत्यादी. तसेच, विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती व मनोरंजनासाठी दररोज संध्याकाळी स्विमिंग पूलमध्ये पोहण्याचा आनंद घेण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिरासाठी विद्यार्थ्यांची निवड प्रकल्प अंतर्गत असणाऱ्या प्रत्येक शाळेतून करण्यात आली असून, प्रत्येक शाळेतून १० विद्यार्थी (५ मुले व ५ मुली) अशी निवड करण्यात आलेली आहे. यासोबतच, दिवसाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या प्रेरणेसाठी दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत एक मोटिवेशनल चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना शासकीय कामकाजाची प्रत्यक्ष ओळख व्हावी या उद्देशाने पुसद तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांना पंचायत समिती, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, आदिवासी प्रकल्प कार्यालय इत्यादी ठिकाणी क्षेत्रभेटीचे नियोजनही करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन त्यांना आधुनिक कौशल्यांसोबतच प्रशासकीय कार्यपद्धतीचीही माहिती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# देशाची आर्थिक सत्ता मूठभर लोकांच्या हाती केंद्रीत : न्यायमूर्ती भूषण गवई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - देशाची राज्यघटना ही कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा मोठी असून ती सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानतेचा पाया आहे. मात्र, सध्याच्या काळात देशाची आर्थिक सत्ता ही मूठभर लोकांच्या हाती एकवटत चालली असल्याची खंत माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी व्यक्त केली. ते स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा (बाबुजी) यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यात बोलत होते. हा कार्यक्रम जवाहरलाल दर्डा लॉ कॉलेज येथे शनिवारी सायंकाळी संपन्न झाला.

गवई म्हणाले की, बाबुजींनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देतानाच स्वातंत्र्यानंतरही शिक्षण, उद्योग आणि समाजविकासासाठी मोठे योगदान दिले. यवतमाळसारख्या मागास जिल्ह्यात त्यांनी उद्योग उभारले, शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि संविधानाला अपेक्षित समानतेसाठी कार्य केले. स्वतः सरन्यायाधीश पदावर असताना शेवटच्या घटकाला न्याय मिळावा, या तत्त्वावर काम केल्याचेही त्यांनी सांगितले. झुडपी जंगल प्रकरणात पर्यावरण आणि शेतकरी यांच्यात समतोल साधणारे निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय दर्डा होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये अनिल एस. किलोर, वृषाली व्ही. जोशी,पालकमंत्री संजय राठोड,आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. विजय दर्डा यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत बाबुजींच्या प्रेरणेने कार्य सुरू असल्याचे सांगितले.

यावेळी विधी क्षेत्रातील ज्येष्ठ वकील आणि माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान अचानक आलेल्या वादळामुळे काही वेळ व्यत्यय आला मात्र आयोजकांनी तत्काळ पर्यायी व्यवस्था करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## गाईला 'राष्ट्रमाता' घोषित करण्याची मागणी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

झरीजामणी - देशाच्या संस्कृतीत गाईला असलेले अनन्यसाधारण महत्त्व तसेच तिचे आध्यात्मिक व आर्थिक योगदान लक्षात घेता गाईला 'राष्ट्रमाता' म्हणून घोषित करण्यात यावे, अशी मागणी झरी जामणी येथे करण्यात आली. या मागणीसाठी सोमवारी (दि. २७) 'गो सन्मान अभियान' मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या व्यापक स्वाक्षरी मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हजारो गोभक्तांच्या स्वाक्षऱ्यांसह तयार केलेले निवेदन झरी जामणी येथील तहसीलदारांना सादर करण्यात आले.

## श्रीमती गंगाबाई नाईक माध्यमिक शाळा धनसळ येथे उन्हाळी शिबीर संपन्न



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - ग्रामीण भागातील श्रीमती गंगाबाई नाईक माध्यमिक शाळा धनसळ येथे मुख्याध्यापक गोपाल चव्हाण यांच्या संकल्पनेतून उन्हाळी शिबीर आयोजीत केले होते या मध्ये एक तास बेसिक गणित, इंग्लिश, मराठी ग्रामर तर एक तास इतर उपक्रम जसे गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आणि इतर उपक्रम घेण्यात आले विद्यार्थ्यांना २२ पासून सुट्टी असतांना सुद्धा २३ मार्च ते ३० मार्च पर्यंत या शिबीरानिमित्त विद्यार्थ्यांनी शाळा केली.

शाळा मुख्याध्यापक यांचा या शिबीरा मागील हा उद्देश होता की विद्यार्थ्यांना हसत खेळत शिक्षण आणि सुप्तगुणांना वाव देणे तस पाहिलं तर शालेय कामकाज सोडून इतर उपक्रम घेणे याचा बऱ्याच कर्मचाऱ्यांना कंटाळा वाटतं असतांना मुख्याध्यापक यांनी पुढाकार घेतला तर अशक्य कामही शक्य होत हेच या उपक्रमातून दिसत. शिबीराच्या समारोपिय कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यशवंत देशमुख सर उपस्थित होते.

# स्व. मोहनलालजी पुरोहित महाविद्यालयाच्या निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम

## बारावी विज्ञान शाखेचा ९८.५७टक्के तर कला शाखेचा ९०.३२टक्के निकाल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - 'स्व. मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, महागाव' या महाविद्यालयाने आपल्या नावाचा लौकिक सार्थ ठरवत यंदाही उच्चांकी निकालाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेच्या निकालात महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून, महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६.०३ टक्के लागला आहे.

महागाव येथील स्व.मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान महाविद्यालयाने बारावी च्या दोन्ही शाखांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९८.५७ टक्के तर कला शाखेचा निकाल ९०.३२ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. विज्ञान शाखेत तुषार प्रदिप पवार याने ८७.१७% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकावला.श्रेयस सचिन मुटकुळे- ८१.००% द्वितीय ,सुमेध नारायण जाधव ७९.३३% तृतीय क्रमांक मिळविला तर सोहम गणेश खंदारे - ७९.१७%,युवराज संजय वानखेडे - ७८.३३%कु. विद्या पंकज पवार - ७७.८३% या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले.

कला शाखेत मंगल पंडित राठोड हिने ६७.१७% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला तर कु. सोनाली बलदेव जाधव - ६५.१७% द्वितीय सत्यमेय विजय चव्हाण - ६२.८३% तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रितेशभाऊ पुरोहित, प्राचार्य दिपक लक्ष्मण संगेवार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले हे यश चिकाटी आणि मेहनतीचे फळ असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

या यशात प्रा. मारोती गोरे, प्रा. गजानन स्वामी, प्रा. अनुपम पवार, प्रा. वर्षा देशपांडे, प्रा. अंबिका मुनेश्वर तसेच कनिष्ठ लिपिक अजय पवार, अमितकुमार चव्हाण आणि शितल जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संपूर्ण महागाव तालुक्यातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ग्रेन मार्केट परिसरात अवैध विषारी दारूचा सुळसुळाट!

## लिंबू शरबत दुकाने घेत आहेत शेतकऱ्यांचा बळी, लिंबू शरबत च्या नावाखाली अवैध दारूची सर्रास भरदिवसा खुलेआम विक्री

**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - आर्णी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात मुख्य मार्गालगत भर बाजार पेठेत अवैध दारूची सर्रास विक्री होत असून, मुख्य रोडलगत सहजच, दारू मिळत असल्याने, ग्रेन मार्केट मधून धान्य विकून पैसे घरी घेऊन जाणारा शेतकरी याचा सहजच बळी ठरत असल्याचे दिसून येत आहे. सदर अवैध दारू विक्रेते अश्या शेतकऱ्यांना टार्गेट करत आहेत व दिवसाढवळ्या लूटमार करत असल्याचे परिसरात बोलल्या जात आहेत. त्यामुळे आर्णी पोलीसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

दुसरीकडे जिल्हा पोलिस अधीक्षक नवयुवकांना नशामुक्तीचे धडे देत असतांना, आर्णी शहरात मात्र खुलेआम बाजार पेठेच्या मुख्यमार्गावर अवैध विषारी दारूचे लोट वाहत असल्याने, जिल्हा पोलीस अधीक्षकांची चांगलीच अप्रतिष्ठा होत आहे. लिंबू शरबत च्या नावाखाली अवैध विषारी दारू विक्रेत्यांच्या टपऱ्या कायमस्वरूपी उध्वस्त करून कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना आर्णी तालुका अध्यक्ष याच्या माध्यमातून केली आहे.आर्णी तालुक्यातून अनेक शेतकरी, कठीण परिश्रमातून पिकविलेले आपले धान्य विक्री करण्यासाठी आर्णी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये आणतात. धान्य विकून वर्षभर केलेल्या कष्टाचा पैसा घेऊन आपल्या कुटुंबात घरी जाण्यासाठी निघतात, नेमके हेच हेरून शेतकऱ्याच्या पैशावर नजर व पाळत ठेवत, मार्केटच्या गेट जवळ बसलेली मानव रुपी गिधाड, भोळ्या भाबड्या शेतकऱ्याला हेरतात व त्याला दारू पाजून त्यांच्या पाळलेल्या बोक्यांच्या माध्यमातून लूटमार करत असल्याची खळबळ जनक माहिती, ग्रेन




मार्केट परिसरातील चर्चे मधून बाहेर येत आहे. या प्रकरणी आर्णी पोलिस ठाण्यात दारूचे गुन्हे सुद्धा दाखल आहेत, यामध्ये सर्वाधिक ग्याश्या दारूवाला व त्याचा मुलगा हे ग्रेन मार्केट सभोवताल प्रचंड चर्चेत आहेत. सदर अवैध दारू विक्रेते, समाजाची दिशाभूल करण्यासाठी लिंबू शरबत चे फलक लावून अवैध दारू विक्री करत असल्याचे कोणत्याही क्षणी सहजच दिसून येते.कारण पहाटे सहा वाजता कोणीतरी लिंबू शरबत पिणार आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो, सदर अवैध दारू विक्रेते आपली दुकाने पहाटे पासूनच थाटून बसतात, यामुळे सकाळ पासूनच दारुडे दारूच्या नशेत झिंगतात,व दारुड्यांचा अनेक घरात व रस्त्यावर या ना त्या कारणावरून सकाळ पासूनच भांडणास सुरवात होते. त्यामुळे आर्णी तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे दिसून येत आहे.

### " नवयुवक दारूच्या विळख्यात "

आर्णी शहराच्या मुख्य मार्गालगत सहज दारू उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांची व नवयुवक शेतकरी पुत्रांची दारूच्या व्यसनात दिवसागणिक प्रचंड संख्येत वाढ होत आहे. कोवळ्या वयात दारू चे व्यसन जडल्याने व स्वस्त तसेच नकली विषारी दारू पिल्याने अनेक युवक कमी वयातच दगावत असल्याचे वास्तव चित्र दिसून येत आहे. त्यामुळे अनेक मुली कमी वयात विधवा होत आहेत, व त्यांच्या चिमुकल्यांच्या डोक्यावरील बापाची सावली हिरावत आहेत.या गंभीर बाबीकडे जिल्हाधिकाऱ्यांनी व पोलिस अधीक्षकांनी लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

### "आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेची मागणी"

अश्या अवैध विषारी दारू विक्रेत्यांवर पोलिस अधीक्षकांनी धाड टाकून, दारूच्या बाटल्या सह त्यांची आर्णी व्यापार पेठेतून वरात काढावी व गंभीर गुन्हे दाखल करावे, जेणेकरून कोणीही अश्या प्रकारे गुन्हे करणार नाही.तसेच समाजाला लागलेली कीड वेळीच मोडून काढून,अश्या गंभीर प्रकारच्या गुन्ह्यांना कायमस्वरूपी उध्वस्त करावे. याशिवाय आज पर्यंत आर्णी तालुक्यात सदर विषारी दारू पिऊन किती शेतकऱ्यांचा मृत्यु झाला व आणखीन किती शेतकरी या वाटेवर आहेत, याची सखोल चौकशी करून, यासाठी सदर अवैध दारू विक्रेत्यांना दोषी ठरवून त्यांचेवर कडक व गंभीर गुन्हे दाखल करून, कठोर शासन करावे अशी मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या आर्णी तालुक्यातून करण्यात येत आहे.

# ग्रामीण पत्रकारितेतील कार्याची दखल!

## दिपक पवार यांना 'आदर्श पत्रकार' राज्यस्तरीय पुरस्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव : राळेगाव तालुक्यातील ग्रामीण पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणारे 'दै. देशोन्नती'चे पत्रकार दिपक पंढरीनाथ पवार (रा. रिधोरा) यांना 'सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशन, पुणे'च्या वतीने राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकार 2026' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व काव्य संमेलनात हा गौरव प्रदान करण्यात आला.

ग्रामीण भागातील प्रश्नांना वाचा फोडत सातत्यपूर्ण, धाडसी व समाजाभिमुख पत्रकारिता केल्याबद्दल पवार यांच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. या पुरस्कारांतर्गत मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोककवी व राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी सिताराम नरके उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दिपक पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून उमेश चव्हाण (रुग्ण हक्क परिषद अध्यक्ष), अक्षय दिलीप सरवदे (पोलीस उपनिरीक्षक, पुणे), प्रियंका प्रवीण बारसे (नगरसेविका), प्रमोद वाघ (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिघी), मनोज लक्ष्मण साळवे (उद्योजक), अतुल गुंजाळ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत डी. चव्हाण, डॉ. ओंकार डी. चव्हाण, अ‍ॅड. जयश्री बी. सोनवणे (सचिव) यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. समाजसेवा व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे अ‍ॅड. जयश्री सोनवणे यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

**अमरावती/का.प्र.**
राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे.सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे

औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा




लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती.

राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे. या घटकांसाठी संबंधित १२,९८९ ग्राहकांना २०२ कोटी रुपयांचा टीओडी लाभ झाला आहे.राज्यातील सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय उर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे. वीज ग्राहकांनी अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून टीओडी सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## सुधीर अरबट यांचा सेवानिवृत समारंभ

**अचलपूर/वार्ताहर**



अचलपूर पंचायत समितीचे गटविकास सुधीर अरबट यांनी ३३ वर्ष ८ महिन्याचा प्रदीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी अचलपूर पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून चार वर्षे अतिशय प्रामाणिकपणे सेवा बजावली. त्यामुळे राज्य शासन स्तरावर विविध पुरस्काराने सुद्धा अचलपूर पंचायत समिती ने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बाबत सन्मानित करण्यात आले.

अचलपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर अरबट यांचा जन्म सामान्य कुटुंबात अंजनगाव सुर्जी येथे झाला.त्यानंतर पंचायत समिती मध्ये सलग ३३ वर्षाच्या कार्यकाळात १५ वर्ष कनिष्ठ सहाय्यक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली.सोबतच ६ वर्ष वरिष्ठ सहाय्यक,दीड वर्ष विस्तार अधिकारी, ७ वर्ष सहायक गट विकास अधिकारी आणि ३ वर्ष ११ महिने गट विकास अधिकारी म्हणून अभ्यासू,कर्तव्यदक्ष ,संवेदनशील अधिकारी म्हणून सर्वांना परिचित असलेले सुधीर अरबट यांनी जबाबदारी पार पाडली.या कार्यकाळात वर्ष २०२३- २४ मध्ये उत्कृष्ट पंचायत समिती म्हणून अचलपूर पंचायत समिती ची निवड झाली होती.राज्याचे तत्कालीन राज्यपाल,राज्याचे विद्यमान ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत अचलपूर पंचायत समिती चे गटविकास अधिकारी सुधीर अरबट यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## प्रमोद पोकळे संगीतरत्न अण्णाजी माहुलकर स्मृती पुरस्काराचे मानकरी



**अमरावती/क्रा.प्र.**
श्रीगुरुदेव सेवा मंडळ, नागपूर यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार तसेच कला, साहित्य, सेवा, कृषी आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत विशेष योगदान देऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान म्हणून नुकतेच पुरस्कार प्रदान करण्यात आले. यांत संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल बडनेरा येथील प्रयोगशील संगीतकार तथा दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे यांना संगीतरत्न अण्णाजी माहुलकर स्मृती पुरस्कार देऊन एका जाहीर समारंभात आ.प्रवीण दटके व आ.ॲड.अभिजीत वंजारी यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ११७ व्या ग्रामजयंतीनिमित्त श्रीगुरुदेव सेवाश्रम, नागपूर येथे सुसंपन्न झालेल्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून आ.ॲड. अभिजीत वंजारी, आ.प्रवीण दटके,ॲड. अशोक यावले, दिलीप सुरकार, पुरोगामी विचारवंत देविदास घोडेस्वार, नगरसेविका कांचन चव्हाण,संगीता जावळे, रामदास टेकाडे, राजेश कुंभलकर, विठ्ठल पुनसे, राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ, नागपूरचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते आयोजित समारंभात विविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले.कार्यक्रमास माजी सैनिक देविदास लाखे, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक किशोर सोलव, नगरसेवक मनोज साबळे, ज्ञानेश्वर रक्षक, रुपराव वाघ, सुरेंद्र बुराडे, बंडोपंत बोढेकर, सियाराम चावके, आनंद माथने,रामराव चोपडे, विजय जामगडे, राजेंद्र हजारे, अनिल पडोळे, डॉ. बाळासाहेब पदवाड, प्रभा ठवकर यांचेसह महिला-पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन उत्साहात

### ‘ब्रँड एस.जी.बी.ए.यु.’ घडविण्याचा संकल्प - कुलगुरू

**अमरावती/क्रा.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये १ मे रोजी, २०२६ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या मंगल प्रसंगी विद्यापीठाच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेत, येणाऱ्या काळात ‘ब्रँड एस.जी.बी.ए.यु.’ जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केला. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व राजेश पिदडी उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठाने २५ कोटी रुपयांचा ‘सेंटर ऑफ एक्सलन्स इन ए.आय. मशीन लर्निंग’ चा प्रस्ताव सादर केला असून, सर्व विद्याशाखांमध्ये ‘इंट्रोडक्शन टू ए.आय.’ विषय अनिवार्य करणारे हे अग्रगण्य विद्यापीठ ठरले आहे. कॅम्पसमध्ये १०



जी.बी.पी.एस. इंटरनेट कनेक्टिव्हिटीसह ‘नेक्स्ट जनरेशन’ केंद्र उभारले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डेटा सायन्स, रिटेल मॅनेजमेंट यांसारखे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि ‘इंटर्नशिप पोर्टल’ सुरु करण्यात आले आहे. विद्यापीठाने केवळ नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे तरुण घडविण्यावर भर दिला आहे. ‘स्टार्टअप इंडिया’ अंतर्गत ७ स्टार्टअप्सना ५२ लाखांचा निधी वाटप करण्यात आला. ३९ व्या आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात यश मिळविण्यासोबतच, सॉफ्टबॉलमध्ये महिला व पुरुष दोन्ही संघांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. क्रीडा व सांस्कृतिक स्तरावर विद्यापीठाचे खेळाडू व कलाकारांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात भर टाकली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रशंसनीय कामगिरी केली. आर्चरीमध्ये यशदीप भोगे याने आशियाई सुवर्णपदक जिंकून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला. ‘पीएम-उषा’ योजनेतून ४० कोटींच्या निधीद्वारे नूतनीकरण आणि चिखलदरा येथे ‘ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर’ ची उभारणी केली जात आहे. ‘कौशल्य हेच भविष्यातील चलन आहे’, असे नमूद करत विद्यापीठ सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करताना विकसित भारतासाठी ‘संशोधन आणि समाज’ यांची सांगड घालण्याचे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले. ध्वजारोहण कार्यक्रमाकरीता प्रांगणात विद्यापीठातील सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. संचालन क्रीडा व शारीरिक मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.

### भारतीय महाविद्यालयाला उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार देऊन सन्मानित

**अमरावती-** भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय अमरावतीचा उत्कृष्ट वार्षिकांक स्पर्धात ‘भारती’ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती तर्फे उत्कृष्ट वार्षिकांक म्हणून यंदाही सन्मानित करण्यात आले.हा प्रतिष्ठेचा पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी भारतीय विद्या मंदिराच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांच्यासह संपादकीय मंडळाचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## प्रेरणादायी खेळाडूंना सर्वतोपरी मदत करणार जिल्हाधिकारी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**
स्थानिक एकलव्य क्रीडा अकादमी मध्ये युवा विकास केंद्र संचालित एकलव्य गुरुकुल स्कूल, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती, तालुका क्रीडा संकुल समिती नांदगाव खंडेश्वर, युवा विकास बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे समारोप १ मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्य अतिथी तथा बक्षीस वितरक म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी एकलव्य अकादमीच्या कार्याची कौतुक करत खेळाडूंच्या प्रगतीसाठी प्रशासनाच्या वतीने सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ दिलीप काळे प्रमुख उपस्थिती म्हणून गणेश जाधव अश्विनी जाधव,चंद्रशेखर मुरादे, प्राप्ती मारोटकर नांदगाव खंडेश्वर यांची



उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिरामध्ये नेटबॉल, डॉजबॉल, सॉफ्टबॉल, धनुर्विद्या, योगा, रब्बी, ॲथलेटिक्स, अशा विविध खेळाचे स्पर्धात्मक उद्देशाने तज्ञ मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनात १० दिवस प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ४५० विद्यार्थी सहभागी झाले होते. लेझीम नृत्य व हिंद के बहादूर ॲक्शन सॉंग ने, महाराष्ट्र दिनी मानवंदना देण्यात आली शिबिरातील विद्यार्थ्यांनी मान्यवरांसमोर वेगवेगळ्या खेळांचे प्रदर्शन सादर केले. आंतरराष्ट्रीय खेळाडू व उत्कृष्ट शिबिरार्थी राष्ट्रीय शालेय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंचे जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते सन्मान करण्यात आला. प्रा. नितीन टाले, ह. भ. प. उमेश महाराज जाधव, हभप नारायणराव वैष्णव, ह भ प चंद्रशेखर वैद्य, प्रा. गजानन काकडे, चंद्रशेखर मुरादे ( शास्त्रज्ञ) पुरस्कारामध्ये प्री प्रायमरी गटातून नीलिमा देवघरे, प्राथमिक गटामधून गुंजा नेवारे, माध्यमिक गटातून वैशाली भगत, यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र व रोख राशी देऊन विशेष सन्मान बहाल करण्यात आला. नांदगाव नगरपंचायत च्या वतीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे गावाच्या वतीने ग्रामगीता व शाल देऊन प्रकाश मारोटकर व नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी सन्मान केला.या दहा दिवस शिबिरामध्ये प्रशिक्षक म्हणून आनंद शिंदे, आदित्य सावरकर, प्रथमेश बर्वे, सिद्धांत अग्रवाल, अथर्व कापडे, रत्नदीप आठवले, हितेन डोंगरे, आनंद इनवाते, रोहित सालोडकर, यांनी वेगवेगळ्या खेळाचे मार्गदर्शन केले या शिबिराचे आयोजन. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी एकलव्य क्रीडा अकादमीचे पदाधिकारी विशाल ढवळे, अनुप काकडे, धनुर्विद्या कोच अमर जाधव, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू साक्षी तोटे, गौरव चांदणे, पवन जाधव, प्रतीक पोकळे, ऋषिकेश चांदुरकर, गुरुमुळे, श्रेया खंडार, व एकलव्य गुरुकुल स्कूलचे शिक्षक शिक्षिका यांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिराचा मुख्य उद्देश सदानंद जाधव यांनी सांगितले कार्यक्रमाचो सूत्रसंचालन व आभार विलास मारोटकर यांनी केले.

## जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सदैव कटीबद्ध - आ.प्रवीण तायडे

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या एक मे रोजी अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरासह तालुक्यात भारतीय जनता पक्ष शहर व ग्रामीण तर्फे विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये प्रामुख्याने अचलपूर शहरातील प्रसिद्ध श्री सैतूत बाग हनुमान मंदिर येथे महाआरती व गौ मातेचे पूजन आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते



करण्यात आले आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सलून व्यावसायिकांना विविध साहित्याचे वितरण करण्यात आले. त्यासोबत अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णांना जेवणाचे वितरण करण्यात आले. त्यानंतर बोरगाव पेठ येथे जिल्हा परिषद शाळेतील एकूण ७४ विद्यार्थ्यांना पुस्तक आणि बॅग चे वितरण आ. प्रवीण तायडे यांच्या वाढदिवसाच्या औचित्यावर करण्यात आले. सोबतच नायगाव बोर्डी येथे श्री संत गजानन महाराज वृद्धाश्रम येथे वृद्धांना आणि विसावा वृद्धाश्रम येथील वृद्धांना जेवणाचे सुद्धा वितरण करण्यात आले.यावेळी आ.प्रवीण तायडे यांचे भव्य दिव्य सत्कार श्री सैतूत हनुमान मंदिर येथे झाले. यावेळी आ.प्रवीण तायडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सामान्य माणसाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी नेहमी कटीबद्ध आहे.जनतेने व कार्यकर्त्यांनी नेहमी दिलेली साथ आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकासासाठी मी नेहमी प्रयत्नरत राहणार असल्याची ग्वाही आ.तायडे यांनी दिली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा महामंत्री सुधीर रसे,उपाध्यक्ष विशाल काकड, अभिजित तायडे,शहराध्यक्ष कुंदन यादव ,तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे, प्रफुल बर्वे, अतुल वाठ ,नगरसेवक अभय माथणे, सुनील चौधरी, रुपेश ढेपे,राजू डवरे, रुपेश ढेपे ,मयंक शर्मा, अक्षय जनावरे, महेश कडू, सचिन कडू,नगरसेवक अक्षय पखाले,जय कृष्णा तायडे, आशिश कडू,अंकुश सीलस्कर,प्रवीण शेषेकर, निशीकांत तायडे, कौस्तुभ मुंदे, आकाश श्रीवास्तव,कपिल साबू,अक्षय पाठक ,सतीश शर्मा, मिथिलेश आवनकर आदी उपस्थितीत होते.

## संक्षिप्त

### पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदी निवड झाल्याबद्दल संदिप मेश्राम यांचा सत्कार



**अमरावती -** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (श्झ्एण) मार्फत घेण्यात आलेल्या विभागीय पोलीस उपनिरीक्षक (झ्एघ) परीक्षेची अंतिम निवड यादी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये अमरावती येथील सुरक्षा कॉलनी तपोवन गेटच्या आत वास्तव्यास असलेले व सध्या राजापेठ पोलीस स्टेशन अमरावती येथे पोलीस शिपाई पदावर कार्यरत असलेले संदिप प्रभुजी मेश्राम यांची पोलीस उपनिरीक्षक (झ्एघ) पदी निवड झालेली आली. संदिप मेश्राम हे अत्यंत हलाकीच्या परिस्थीत नोकरी करुन जिद्द, चिकाटी व परिश्रमाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले आहे. पुस्तका सोबत काढलेली रात्र आणि ग्राउंडवर गाळलेला घाम कधी वाया जात नाही हे त्यांच्या निवडीने सिद्द करुन दाखविले. त्यांच्या निवडीमुळे युवा पिढीना प्रोत्याहन व प्रेरणा मिळेल हे निश्चित त्याच्या निवडीमुळे मेश्राम कुटंबियांसह संपूर्ण परिसरात विशेषत: युवा वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमेश्वर मार्गदर्शन केंद्राचे संचालक शिवाजी डोंगरे तसेच युवा मित्र मंडळीनी त्यांचे पुष्पगुच्छ पुष्पहार घालुन स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच परिसरातील मान्यवरांनीही त्याच्या निवासस्थानी भेट देऊन त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### आज पासून बालसंस्कार शिबीर



**नांदगाव खंडेश्वर -** येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ज्ञानोबा तुकाराम बहुउद्देशीय सेवा समिती अकोला द्वारा संचलित व नांदगाव हायस्कूल नांदगाव खंडेश्वर यांच्या संयुक्त विद्यमानाने ५ ते २० मे २०२६ पर्यंत भारतीय संस्कृतीचे रक्षण करणे हेतू व आजचा बालक उद्याचा तरुण निर्व्यसनी, सदाचारी, सुदृढ बनावा या दृष्टिकोनातून भव्य बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरामध्ये हरिपाठ, काकडा,पावल्या, मृदुंग,गायन,आई-वडिलांचे महत्त्व, व्यक्तिमत्व विकास, थोरांची चरित्र, गोरक्षणाचे महत्त्व आधी करून विषय शिकवल्या जातील. तरी सर्व पालकांनी आपल्या मुलांना या शिबिरामध्ये पाठवावे असे आवाहन बाल संस्कार शिबीर नियोजन समितीने व शिबिर संचालक उमेश महाराज जाधव यांनी केले आहे. या शिबिरामध्ये सुरज महाराज पोहोकार ,भूषण महाराज गिरी,कार्तिक महाराज चवात,विशाल महाराज मालगे, गोपालभाऊ काकडे आदीकरून मंडळी उद्बोधन करतील.

### भांबोरा येथे ग्राम जयंती उत्साहात



**कुऱ्हा -** नजीकच्या भांबोरा येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांची जयंती अर्थात ग्राम जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.अध्यक्षस्थानी ग्रामसेवाधिकारी हभप मोरेश्वरराव काळमेघ तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक प्रा. प्रशांत टांगले,श्री संत शंकर महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय पिंपळखुटाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.नरेश इंगळे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करजगावचे मुख्याध्यापक अविनाश गंजिवाले उपस्थित होते. विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून तारा वानखडे,बबन पोलाड उपस्थित होते.यावेळी तारा वानखडे आणि बबन पोल्हाड यांचा मान्यवरांचे शुभ हस्ते पुष्पगुछ व श्रीसंत शंकर महाराज लिखित ‘ज्ञानामृत’ ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रा. प्रशांत टांगले यांनी गुरुदेवभक्त कसा असावा याविषयी, मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले यांनी राष्ट्रसंतांची शैक्षणिक संकल्पना आणि प्रा.डॉ.नरेश इंगळे यांनी विश्वबंधुत्व विषयी विचार मांडले. समारोपीय मनोगतात मोरेश्वर काळमेघ यांनी राष्ट्रसंतांची ग्रामगिता कशी उपयुक्त आहे यावर भाष्य केले.प्रदीप गोरे यांनी कार्यक्रमाची भूमिका विषद केली. ग्रामजयंती निमित्त सकाळी ग्रामसफाई, रामधून,श्री ची पालखी, भजन, कीर्तन आदी कार्यक्रम संपन्न झालेत. हभप मोरेश्वरराव काळमेघ यांचे काल्याचे कीर्तन,राष्टवंदना आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रास्तविक सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रदीप गोरे यांनी केलेत. कार्यक्रम यशस्वीतेरिरता प्रदीप गोरे, बबनराव पोलाड, गजानन वानखडे, बाळासाहेब गोरे,मनोज खंडार,अमोल भुंबर, किशोर काळमेघ प्रवीण पोलाड,रुपेश काळमेघ,चैतन्य पोलाड,श्रीकांत गोरे,रामा वानखडे,प्रथमेश भुंबर,आदर्श खंडार,चेतन पोलाड,अलका काळमेघ,तारा वानखडे,माया पोलाड इत्यादीनी परिश्रम घेतले कार्यक्रमात सर्व गावकरी व गुरुदेव प्रेमी सहभागी झाले होते.

### वाचनालयात राष्ट्रसंतांची जयंती साजरी

**तिवसा -**श्री स्वामी विवेकानंद बहू. सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती ही ग्रामजयंती म्हणून दरवर्षी साजरी केली जाते.ग्रामजयंती निमित्त वाचनालयामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण अनिल थुल, विरोधी पक्ष नेता न. पं. कार्यालय तिवसा यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेले अंकुश देशमुख,भूषण मुंदाणे,संदीप दहाट, राजेश्वर चौधरी,राजाभाऊ देशमुख,कृणाल गौरखेडे, प्रशांत डगवार, हृषीकेश गंधे, यश देशमुख,गणेश तरंगे,विशाल गडलिंग,राहुल धडांगे व इतर वाचक वर्ग यांनी सुद्धा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले व ग्रामजयंती साजरी करण्यात आली.

# मानवतेला काळीमा फासणारी घटना

महाराष्ट्र दिनाचा सूर्य मावळण्याआधीच दोन अल्पवयीनांवर झालेल्या भीषण अत्याचार आणि खुनांच्या घटनांमुळे पुणे जिल्हा हादरला. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका ६५ वर्षीय नराधम व्यक्तीने आपल्या नातीच्या वयाच्या अवघ्या ४ वर्षीय चिमुरडीवर बलात्कार करून तिचा निर्घुण खून केला. चाकण जवळील महाळुंगे येथे एका १६ वर्षाच्या परप्रांतीयाने अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून केला. महाराष्ट्र दिनीच घडलेल्या या दोन भीषण घटनांनी केवळ पुणे जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे.

नसरापूर आणि चाकण मधील घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्याच आहे. या घटनांनी तळपायाची आग मस्तकात गेली असून संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. नसरापूर मधील नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी यासाठी लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करू लागली आहे. शनिवारी रात्री नसरापूर आणि परिसरातील संतप्त नागरिकांनी पुणे बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर ठिय्या आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर संतप्त नागरिकांनी आंदोलन मागे घेतले असले तरी नागरिकांचा रोष कमी झालेला नाही. नसरापूर मधील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिलीच घृणास्पद घटना नाही. मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. दोन वर्षापूर्वी बदलापूर येथील शाळेत ४ वर्षाच्या चिमुरडीवर शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने बलात्कार करून खून केला या घटनेनंतरही संपूर्ण महाराष्ट्रात असा उद्रेक पाहायला



मिळाला होता. त्याआधीही महाराष्ट्रात अशा अनेक घृणास्पद घटना घडल्या की ज्याने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे. अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत. अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते. अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नयेत यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. नसरापूर प्रकरणात आरोपी असलेल्या नराधमाने याआधीही अशा घृणास्पद घटना केल्याची बाब समोर आली आहे. पॉक्सो कायद्याअंतर्गत त्याला तुरुंगाची वारी करावी लागलेली आहे. पॉक्सो कायद्या सारख्या गंभीर गुन्ह्यात अटक झालेल्या नराधमास अशा प्रकारे मोकळे सोडले तर तो पुन्हा असा प्रकार करू शकतो हे माहित असूनही त्याला तुरुंगाच्या बाहेर का सोडण्यात आले ? असा प्रश्न पडतो. पॉक्सो प्रकरणात तुरुंगाची वारी भोगूनही हा नराधम पुन्हा तेच कृत्य करतो आणि एका चिमुरडीचा जीव घेतो याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा धाक उरला नाही. कायद्याचा धाक नसल्यानेच हे नराधम असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य करण्यास मागे पुढे पाहत नाही. कायद्याचा धाक नसल्यानेच दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशाप्रकारचे नराधमी कृत्य करण्याची हिंमत या नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही, पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळीमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना शोभनीय नाही. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आज कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलिस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार, उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती. आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलिस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात. तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचारांच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

**श्याम ठाणेदार**
९९२२५४६२९५

# भाट परंपरा आणि आडनाव

प्रत्येक जातीनिहाय आडनाव आहेत.काही जातीमध्ये ठराविक असे आडनाव आहेत त्यामुळे जात ओळखल्या जाते.आडनावाने मनुष्याची एक ओळख होते.आपल्या प्रथम किंवा शुभ नावानंतर आडनाव लावले जाते.आपण ज्या कुटुंबातील आहे त्या कुटुंबाचे आडनाव जन्मत: मिळते.आडनावाची परंपरा कशी अवगत झाली आणि आपली आडनाव कशाप्रकारे ठेवण्यात आले हे भाटच सांगू शकतात.भाट संस्कृती हि राजेशाही पासून अस्तित्वात आहे पूर्वी राजाच्या दरबारी भाट असायचे. राजाची स्तुती करून लिहायचे.त्याला बखर सुद्धा म्हणता येईल. पेशवे काळात अशा बखरी पहावयास मिळतात.काही भाट हे जातीनिहाय असायचे आणि हल्ली सुद्धा आहेत. आजही नवीन मुलं आपल्या कुटुंबात जन्माला आल्यानंतर भाट आपल्या घरी येऊन त्याची नोंद आपल्या कुटुंबातील वंशावळी मध्ये करते.आणि आपल्या कुटुंबातील पूर्वजांची स्तुती करतो.त्यांनी केलेली स्तुती खरी की खोटी हे आपणास माहीत नसते.

पूर्वी आडनावे त्यांनीच ठेवलेली आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.एखाद्याने दान किंवा मोबदला देताना कमी दिले किंवा दिलेच नाही तर त्यांचे आडनाव अत्यंत कमी दर्जाचे ठेवायचे उदा.डुकरे.आजही भाट जातीनिहाय असून ज्या जातीचे भाट त्याच जातींतील कुटुंबाकडे जाऊन आपल्या जवळ असलेल्या दस्तऐवजावरून वंशावळीची माहिती देतात.आडनावे पाहता प्राणी,फळे,भाजी इत्यादींवर आहेत.काही आडनावे भाजी निहाय आहेत.एखाद्याने शेतात भाजी लावली तर भाजीवरून आडनाव भाजीपाले, कांदे,लसणापूरे, पाले,काकडे, कारले इत्यादी.एखाद्या कडे पाळीव प्राणी असेल तर किंवा जगली प्राणी निहाय आडनावे कुत्रा - कुतरमारे (कुत्राला मारले असेल,नसेल),बैल मारला असल्यास बैलमारे एवढेच नव्हेतर वाघ मारल्यास वाघमारे,गायातोंडे, कोल्हे,लांडगे, बोकडे, म्हशीवरून म्हस्के,म्हैसे,अत्सोले इत्यादी.पदार्थाच्या चवी वरून कडू,गोडबोले, गोडे, आंबटे,आमटेकर,साखरे, गुळरांधे,गुळवे, खारे इत्यादी.वेळेनुसार आडनाव दुपारे शस्त्रावरून आडनावे भत्ले, कटकतलवारे टोपले,घमेले इत्यादी.गावावरून आडनावे जयपूरकर, नाशिककर,नागपूरकर, वर्धेकर, भंडारकर,अकोलकर, रामटेके, वाशिमकर, वसमतकर, धनजकर, नेरकर,हैदराबादकर, चिखलीकर, संगमनेरकर, नेरकर, पाषाणकर, हिंगोलीकर, अडगावकर, भत्तकुलकर, दर्यापूरकर इत्यादी.फळांवरून आडनावे आंबा-आंबेकर, केळी - केळझरे, पेरू - पेरे, जांभ - जांभेकर, जांभुळ - जांभूळकर इत्यादी.धातूवरून आडनावे सोने- सोनारे,चांदी - चांदेकर,तांबे - तांबेकर,लोखंड - लोहारे, लोखंडे,पितळ- पितळे,तारेकर ,रत्नपारखी इत्यादी. रंगावरून आडनावे - काळे,गोरे, निळे,हिरवे,शेंद्रे इत्यादी.



**डॉ. संजय साळीवकर,**
अम-
९४२३४२४८५१

# पाण्याने अनेक गोष्टी हिरावून घेतल्या पण आईचं प्रेम नाही..

आईचे प्रेम निस्वार्थ आणि अतूट असते, ज्याला मृत्यूही हरवू शकत नाही. मध्यप्रदेशमधील बरगी धरण अपघातासारख्या अनेक हृदयद्रावक घटनांतून हे सिद्ध झाले आहे की, शेवटच्या श्वासापर्यंत आई आपल्या मुलाला वाचवण्याचा आणि मिठीत घेण्याचा प्रयत्न करते.हा व्हिडिओ मृत्यूवरही मात करणाऱ्या आईच्यानिस्वार्थ प्रेमाचा पुरावा देतो.

जबलपूरच्या बर्गी धरणावर (१ मे, २०२६) झालेल्या क्रूझ शिप अपघातादरम्यान जेव्हा प्रत्येकजण जीव वाचवण्यासाठी पळत होता, तेव्हा एका आईने करुणेचे असे उदाहरण घालून दिले की ते पाहून प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू आले. मरीना मेस्सीने, स्वतःच्या जीवाला धोका असूनही, आपल्या ४ वर्षांच्या मुलाला, त्रिशानला, शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या छातीशी कवटाळून धरले आणि त्या दोघांचाही एकत्र मृत्यू झाला.दिल्लीहून भेटायला आलेल्या मरीना मेस्सी आणि तिचा ४ वर्षांचा मुलगा त्रिशान यांचे मृतदेह जेव्हा सापडले, तेव्हा ते एकमेकांना घट्ट बिलगलेले होते. आईने आपल्या मुलाला इतक्या घट्ट छातीशी धरले होते की मृत्यूनंतरही त्यांच्या शरीराला कोणताही धक्का लागला नाही.आईने स्वतः लाईफ जॅकेट घातले होते आणि बुडत असताना, तिने आपल्या मुलाला बुडण्यापासून वाचवण्यासाठी त्या जॅकेटमध्ये गुंडाळले.हे दृश्य पाहून बचाव पथक, पोलीस आणि तिथे उपस्थित असलेले मंत्री राकेश सिंह यांनाही आपले अश्रू आवरता आले नाहीत. प्रत्यक्षदर्शींच्या मते, आईने आपल्या लाडक्या मुलाला वाचवण्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष केला.

आईच्या मृत्यूनंतरही तिची माया मुलांच्या स्मृतीतून आणि संस्कारातून जिवंत राहते.मृत्यू केवळ शरीर वेगळे करू शकतो, पण आई आणि मुलांमधील भावनिक नाते तोडणे अशक्य असते.आई गेल्यावरही तिचे शब्द आणि शिकवण मुलांच्या आयुष्यात त्यांना मार्ग दाखवत राहतात, या कठीण काळात धीर देतात.आईचे प्रेम हे जगातील सर्वात शक्तिशाली प्रेम आहे, जे मरणापलीकडेही टिकून राहते.पाण्याने अनेक गोष्टी हिरावून घेतल्याष्ठ पण आईचं प्रेम नाही.ही ओळ आईच्या निस्वार्थ आणि अमर प्रेमाचे खूप सुंदर वर्णन करते. आयुष्यातील कठीण प्रसंगात, नैसर्गिक आपत्तींमध्ये (उदा. महापूर) भौतिक गोष्टी नष्ट होऊ शकतात, पण आईचे प्रेम कधीही नाहीसे होत नाही.याचा प्रत्यय बरगी धरणाच्या खोल पाण्याच्या प्रवाहात बुडालेल्या जहाजाच्या प्रसंगी आला.वादळामुळे पर्यटकांची क्रूझ बोट उलटून झालेल्या अपघातात एका मातेचा मृत्यू झाला, परंतु मृत्यूसमयी देखील तिने आपल्या लहान बाळाला छातीशी घट्ट कवटाळून धरले होते.

मध्य प्रदेशातील जबलपूरच्या बर्गी धरण परिसरात घडलेल्या दुःखद घटनेने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे.जोरदार वारे आणि प्रतिकूल हवामानात झालेल्या या अपघातात अनेकांचा बळी गेला असून, अनेक कुटुंबे शोकाकुल झाली आहेत.मदत आणि बचाव कार्यादरम्यान समोर आलेली काही दृश्ये माणुसकी आणि प्रेमाची खोली दर्शवतात.एक आई शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या लहान मुलाशी जोडलेली होती.हे दृश्य प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्शून जाईल.बचाव पथकातील सदस्यांनी सांगितले की, पाण्यात बुडतानाही आईची आपल्या बाळावरील पकड सैल झाली नव्हती. तिने बाळाला शेवटच्या क्षणापर्यंत सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला होता.हे दृश्य पाहून बचाव पथकातील अधिकारी आणि उपस्थितांचे डोळे पाणावले. आईचे प्रेम हे मृत्यूच्या पलीकडे असते, याची प्रचिती या घटनेने पुन्हा एकदा दिली आहे.



आई ही मायेची सावली आणि निःस्वार्थ प्रेमाचा महासागर असते, जिची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. ती कुटुंबासाठी कष्ट सोसते, मुलांच्या सुखात आनंदी राहते आणि कठीण प्रसंगात पाठीशी उभी राहते.आई म्हणजे त्याग, ममता आणि आधार, जिच्या विना घर अपूर्ण वाटते.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,**
९५६१५९४३०६

# .....गेले घ्यायचे राहुनी!

वेंबनाड सरोवरात हंस मुक्तपणे विहार करत होते. दिल्लीच्या प्रदूषण विळख्यातून बाहेर पडून ते केरळच्या प्रसन्न वातावरणात दाखल झाले होते. त्यामुळे त्यांना चैत्राची पहाट अती सुखकर वाटत होती. सगळा थवा आनंदात पुढे चालला होता. एक जोडी मात्र उदास बसली होती. तेव्हा कप्तान हंस त्यांना म्हणाला, 'तुम्ही दिल्लीहून निघाल्यापासून कष्टी वाटता. काही बोलत नाही. तुम्हाला खुलवण्याचा प्रयत्न करून, सगळे थकले. काय बात आहे?'

हे ऐकून हंसी म्हणाली, 'आम्हाला 'पंचवटी'ची आठवण बेचैन करतेय.'

अनुभवी हंसाने विचारले 'मग तुम्ही नाशिक परिसरातच वास्तव्य का नाही केले? त्यावर हसत हसत हंस उत्तरला,'अहो, आम्ही दिल्लीतील ७, लोककल्याण मार्ग येथील पंतप्रधानांच्या 'पंचवटी' निवासस्थानातून आलो आहोत.'

हे ऐकताच थवाप्रमुखाने वेगळा आवाज काढून सर्वांना एकत्र बोलावले. 'अरे सगळे इकडे या. आपल्या तळ्यात आले आहेत, 'राजहंस दोन!' ऐकू तर ते काय सांगताहेत.' आणि त्या हंस दाम्पत्याला म्हणाला, 'आपण सांगा, आपल्या दु:खाचे नेमके कारण काय ?'

तेव्हा हंसी म्हणाली, 'आम्ही निघताना तिथे सारखे एक गीत ऐकू येत होतेष्ठ गेले द्यायचे राहुनी तुझे नक्षत्रांचे देणे'

ते ऐकून एक वृद्ध म्हणाला, 'होय, आशाबाईंचे स्वर '

'नाही हो, त्या जाण्याआधीच, किमान पंधरवड्यापासून ते ऐकू येत होते.' हंस खेदाने म्हणाला. 'म्हणजे ..? असं कसं?' बरेच हंस एकदम म्हणाले. 'आपल्या जातीला, नीरक्षीरविवेक समजतो. ही देणच पुढची पिढी विसरत चाललीय. आता तर मोठेसुद्धा या तरण्यांचं, 'तरुणाई – तरुणाई' असले नको तेवढे कौतुक करताहेत.' हंसी म्हणाली.

ते ऐकताच तिचा जोडीदार म्हणाला, 'हे पहा, असे नाही, त्रागा न करता शांतपणे सांग. नाही तर मीच सांगतो. ऐका, पंतप्रधानांनी २०२३ साली दुबईमध्ये घोषणा केली होती. पाच वर्षानंतर २०२८ च्या नोव्हेंबरमधील जागतिक हवामान परिषदेचे आयोजन भारत करणार. त्याला ब्राझील, रशिया, चीन आणि इतर 'ब्रिक्स' राष्ट्रांनी जोरदार पाठिंबा दिला. ही घटना काही अचानक व अपघात नव्हती. त्याआधी त्यावर चिंतन-मनन, अभ्यास-संशोधन सुरू होते. जगातील सर्व राष्ट्रांना एकत्र आणून जागतिक हवामान परिषदेचे आयोजन कसे करावे, याची जय्यत तयारी सुरू होती. आणि अगदी अचानक परिषदेतून माघार घ्यावी लागली. तेव्हापासून 'पंचवटी'तील सूरच बदलून गेले.'

हे कानी पडल्यावर तरुण हंस कान टवकारून ऐकू लागले.

'जगाला बदलाच्या दिशेने नेणारी अद्वितीय परिषद घडवून आणण्याचे महास्वप्न होते ते !' थकलेल्या स्वरात हंस म्हणाला. तेव्हा कर्णधार हंसाने कुतूहलाने विचारले, 'नियोजनाची तयारी कशी होती? त्या चर्चेत कोण सहभागी होते? आणि कोणत्या योजना होत्या?'

हंसी हळुवार आवाजात म्हणाली, 'आपल्या जातीला 'त' वरून ताकभात ओळखता येतो ना? कोणत्याही व्यक्तीची देहबोली आणि मुद्रेवरून तिच्या अंतर्मनाचा ठाव घेता येतो. ही साधना करू तेवढी ती क्षमता वाढत जाते. आपल्यातील अनुभवी वयस्कांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपकरणांची गरज लागत नाही. समजले? आम्हाला 'पंचवटी'तील नूर पाहूनच आगामी परिषदेचा आवाका समजू लागला होता.' 'आयोजन स्थळ?' सगळे एकसाथ ओरडले. उत्साहाने दिल्लीस्थित हंस सांगू लागला, '२००२ मध्ये, दिल्लीत झालेल्या हवामान परिषदेस १६७ राष्ट्रांचे १,५०० प्रतिनिधी जमले होते. २०२८ साली या कोचीमध्येच किमान लाखभर प्रतिनिधींची भव्य आणि दिव्य जागतिक परिषद भरली असती. त्यावरून उत्तर- दक्षिण असा भेद नाही आणि नसावा, हे देशाच्या लक्षात यावे. 'कोची बिएनाले'च्या अनुभवाचा उपयोग व्हावा. संपूर्ण जगातील धुरीणांना केरळच्या नयनरम्य देवभूमीचे दर्शन घडवावे. नेते-अधिकारी- शास्त्रज्ञ- विद्वान-कलावंत, उद्योजक आणि समाजसेवी संस्था यांच्यात उत्तम वादसंवाद व्हावा. शेतकरी, महिला, बालक व आदिवासी अशा सर्व स्तरांविषयी मंथन व्हावे. जगभरातील निसर्ग पुन्हा सदाहरित व्हावा. यासाठीच ही 'समग्र शाश्वततेसाठी सर्व काही.. ' परिषद असणार होती.'

**२०२८ च्या नोव्हेंबरमधील जागतिक हवामान परिषदेचे आयोजन भारत करणार, अशी घोषणा पंतप्रधानांनी २०२३ साली दुबईमध्ये केली होती. जगाला बदलाच्या दिशेने नेणारी अद्वितीय परिषद घडवून आणण्यांचे ते महास्वप्न होते. मग अशा बहुगुणी परिषदेच्या यजमानपदाचा त्याग का करण्यात आला?**

'अहो, ठळक बातमी समजली. आता विस्ताराने सांगाल? म्हणजे त्या यादीत कोण होते?' 'कोण नव्हते? असे विचार. मनुष्य-निसर्ग, दोघांची प्रकृती एकमेकांवर अवलंबून आहे, या सूत्राने पृथ्वीच्या कल्याणासाठी झटणारे सगळे येणार होते. सर डेव्हिड अटेनबरो, प्रो. ग्लेन अल्ब्रेख्त, अल गोर, नाओमी क्लायन, सर निकोलस स्टर्न, प्रो.पार्थ दासगुप्ता, डॉ. पवन सुखदेव आदी अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या सर्व ज्ञानशाखांतील विद्वान आणि पंडित यांना खास दूत पाठवून निमंत्रणे दिली जाणार होती. पण त्याआधी देशाचा कायापालट घडवायचा होता.'

सगळे हंस पाण्यात स्तब्ध झाले. ज्येष्ठ हंस म्हणाला, 'अरे वा! ही वाटचाल, कशी झाली असती?' दिल्लीहून आलेली हंसी धडाधडा सांगत गेली, 'हे पाहा, परिषदेचे सूत्रधार पर्यावरणीय अर्थवेत्ते प्रो. पार्थ दासगुप्ता आणि डॉ. पवन सुखदेव असणार होते. त्यामुळे आधी देशातील 'विकास' पालटून जाणार होता. अर्थशास्त्रातील 'ब्लाइंड स्पॉट' झालेल्या निसर्गाला पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणायचे होते. मालमत्तेचे मोजमाप करताना नैसर्गिक मालमत्तेचाही विचार करून 'समावेशक संपत्ती' (इन्क्लुझिव्ह वेल्थ) ही काळानुरूप संकल्पना अमलात येणार होती. 'विकास की पर्यावरण'च्या जुन्यापुराण्या सापळ्यासाठी तात्कालिक व निवडक आर्थिक फायदे दाखवून प्रकल्प मार्गी लावले जातात. परंतु, त्यांना मंजुरी देताना त्या ताळेबंदात संभाव्य आपत्तींच्या हानीचेही मापन होणार होते. एकूण राष्ट्रीय उत्पादनांचे मापन (जीडीपी) करताना नैसर्गिक साधनांचा विचार आला असता. प्रत्येक गोष्टीप्रमाणे निसर्गाचीदेखील 'किंमत (प्राइस)' ठरवणाऱ्या लोकांना 'निसर्गाचे मूल्य (व्हॅल्यू)' समजावून सांगायचे होते. लोकांना निसर्गाच्या अदृश्य अर्थशास्त्राची स्पष्टपणे जाणीव करून द्यायची होती. निसर्गापासून संपूर्ण जगाला एका वर्षात होणारा ऑक्सिजन पुरवठा, वृक्षांकडून होणारे कर्ब वायूंचे शोषण, मिळणारा थंडावा, पावसाचे पाणी मुरवून पुराचा धोका कमी करणे, लाकूड, औषधे आणि संशोधन या सर्व लाभांचे मूल्य सहा लाख कोटी डॉलर्सहून अधिक आहे. अशी माहिती देशाच्या कानाकोपऱ्यात पसरवायची होती. याचे जनजागरण आणि त्याच वेळी कडक अंमल होणार होता.'

प्रत्येकाला आपापली जबाबदारी पार पाडावी लागणार होती. सर्व नागरिकांना 'माझी कार्बन क्रिया' या ॲपचा वापर बंधनकारक झाला असता. सर्व व्यक्ती व संस्था यांना त्यांचे वार्षिक कार्बन विवरण (कार्बन रीटर्न्स) दाखल करणे अनिवार्य झाले असते. वर्षभरात एक टनपेक्षा अधिक कर्ब उत्सर्जन करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना 'कार्बन कर' लागू झाला असता. अतिश्रीमंतांना उत्पन्नाच्या ५० टक्के 'सुपर रिच'कर द्यावा लागला असता. हा निधी 'क्लायमेट रेझीलियंट सिटीज अँड ॲग्रिकल्चर'कडे सुपूर्द केला असता. 'विवेकी शहर रचना'कार ॲलिसन ब्रुक्स कृती आराखडा सादर करताना म्हणाल्या होत्या. 'विवेकी शहर म्हणजे एक सजीव, कलात्मक आणि मानवी अनुभव देणारे ठिकाण आहे. इमारत व शहररचना करताना मानसशास्त्रीय मर्मदृष्टीचा (इनसाइट्स) अवलंब करणे, ही आजची गरज आहे. हे लक्षात घेऊन मन प्रसन्न करणारे अभिकल्प कसे असू शकतात? याविषयीच्या आकलनात वाढ होईल. त्यातून उत्तम अभिकल्प व कारागिरी (डिझाइन) यांना न्याय मिळेल. एकंदरच अभिकल्पांची गुणवत्ता वाढीस लागेल.' 'शहरे ही मोटारींसाठी नसून माणसांसाठी आहेत', या त्यांच्या घोषवाक्यामुळे देश समूळ बदलून जाणार होता.

मुंबई व दिल्लीमध्ये दररोज सुमारे ११ हजार टन कचरा निर्माण होत असे. ते प्रमाण दोन हजार टनांवर येणार होते. कचऱ्याचे काटेकोर वर्गीकरण, ओल्या कचऱ्यापासून खत आणि वीजनिर्मिती आणि सुक्या कचऱ्याचा पुनर्वापर होणार होता. दिल्लीमधील वार्षिक कार्बन उत्सर्जन सुमारे चार कोटी टनांवरून ५० लाख टनांवर आणायचे होते. जलवाहिन्यांमधून होणाऱ्या पाणीगळतीचे प्रमाण ५० टक्क्यांवरून ५ टक्के करायचे होते. देशातील अनेक शहरे भूमिभरण (लँडफिल) मुक्ततेकडे आणि कार्बन उत्सर्जनमुक्तकडे वाटचाल करणार होती. मोटारींना प्राधान्य देताना शहरांमधील हिरवळीच्या जागा आणि पाणथळ ठिकाणे सर्रास गायब झाली होती. आता हिरवी आणि निळी क्षेत्रे पुन्हा दिमाखात उभी करायची होती. या पराकाष्ठेतून वास्तू व शहरे हरित करण्याची स्पर्धा सुरू झाली असती. सर्जनशील कल्पनांना बहर येऊन नवनवीन व्यवसाय आणि सेवा निर्माण झाल्या असत्या.' केरळमधील जलाशयांवर प्रेम करणारा लहानगा हंस म्हणाला, 'मग ठिकठिकाणी पाण्यातून वाहतूक करून आपली वाट लागणार असेच ना?' त्याची समजूत काढण्यासाठी कप्तान हंस बोलू लागला, 'अरे त्याची सुरुवात तर कोचीतून झाली. 'स्वच्छ हवेसाठी शाश्वत वाहतुकी'ची यशस्विता इथेच तर प्रथम दिसली. जलवाहतूक करणारी देशातील पहिली 'वॉटर मेट्रो' केली. वातानुकूलित, आधुनिक सुविधांनी सज्ज इलेक्ट्रिक हायब्रिड बोटी आल्या. बेट आणि किनारी भागांसारख्या दुर्लक्षित भागांची शहराशी जोडणी करणाऱ्या जलमार्गांचा पुनर्वापर हा कोचीच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान आहे. त्यामुळे आपल्या पक्ष्यांना किंवा माशांना काय त्रास झाला? काही ठिकाणी थोडेसे स्थलांतर करावे लागले, एवढेच. कोचीमधील आंतरराष्ट्रीय विमानतळ हे पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर (रिन्युएबल एनर्जी) चालवले जाते. विमानतळावर पोहोचण्यासाठी सातत्याने ई-बस आणि मेट्रो चालवल्या जातात. कोचीमध्ये सायकल चालवणाऱ्यांसाठी सर्व सार्वजनिक वाहनांमध्ये खास सुविधा केली आहे. मेट्रो आणि वॉटर मेट्रोपर्यंत सहज पोहोचण्यासाठी पदपथ केले आहेत. ई-रिक्षांची संख्या वाढवली आहे. हे पाहूनच तर इथे हवामान परिषदेचा विचार झाला असेल. जगातील लोकांना आपल्याकडील काय दाखवायचे? याचा, असा खोलवर विचार करावा लागतो.'

त्यावर तिचा जोडीदार म्हणाला, 'खरोखरीच या निर्णयामागील नेमका तर्क समजत नाही. त्यामुळे तऱ्हेतऱ्हेची मीमांसा ऐकायला मिळते. कोणी छातीठोक सांगतात- याचे खरे कारण जीएसटी! आपली नाही, ती जागतिक पातळीवरील 'ग्लोबल स्टॉक टेक' आहे. ते सर्व देशांचे कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबत प्रगतिपुस्तक आहे. दर पाच वर्षांनी ग्लोबल स्टॉक टेक घेतला जातो. तो २०२८ साली घेतला जाईल, तेव्हा आपले कर्ब उत्सर्जन तीन अब्ज टनांवरून साडेतीन अब्ज टन झाले असेल. चिमुकली बेटे आणि गरीब देश आपल्याकडून कर्ब उत्सर्जन घटवण्याबाबत वचनबद्धतेची मागणी करू शकतील. काही जणांनी त्याचा संबंध अमेरिकेशी लावला. ट्रम्पशासित अमेरिकेने हवामान परिषदांपासून फारकत घेतली. चीन फार काही दखल देत नसल्याने हवामान परिषदा 'अर्थ'शून्य झाल्या. तेव्हा परिषद घेऊन ट्रम्प यांची नाराजी नको. कोणी शोध लावला की, हवामान परिषदांमधून सहमती होत नाही. तो केवळ उपचार झालाय.

**अतुल देऊळगावकर**
पर्यावरण अभ्यासक

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सबब

अकोला
जिल्हा विशेष

# गाळलेल्या विहिरींचे लाभार्थी अनुदानापासून वंचित

## सावरगावात प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव परिसरात अतिवृष्टीमुळे गाळलेल्या विहिरींच्या लाभार्थ्यांना अद्यापही शासकीय अनुदान मिळाले नसल्याचा प्रकार समोर आला आहे. जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या या भागातील शेतकरी प्रशासनाच्या दिरंगाईमुळे संतप्त झाले असून तातडीने मदत देण्याची मागणी करत आहेत.

मुसळधार पावसामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी गाळाने पूर्णतः भरून निष्प्रभ झाल्या आहेत. परिणामी पाण्याचा मुख्य स्त्रोत बंद पडल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाकडून अशा नुकसानीसाठी अनुदानाची तरतूद असतानाही प्रत्यक्षात लाभार्थ्यांना मदत मिळालेली नाही, अशी तक्रार शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.



### प्रशासनाच्या दिरंगाईमुळे लाभार्थ्यांची येरझार

सावरगाव परिसरातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेले अनुदान अद्यापही मिळाले नसल्याने लाभार्थ्यांना संबंधित कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागत आहेत. यामुळे प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघडकीस आला आहे.

याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्वरित अनुदान मंजूर करून देण्याची मागणी जोर धरत आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ मदत करावी, अशी अपेक्षा बाधित शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

> 'अतिवृष्टीमुळे विहिरीचे मोठे नुकसान झाले. पंचनामेही करण्यात आले; मात्र गाळ उपशासाठी अद्याप अनुदान मिळाले नाही. त्वरित मदत मिळावी.'
>
> **रोहिदास आडे,** लाभार्थी, सावरगाव

## ...थोडक्यात...

### दोन सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी तडीपार; माना पोलिसांची कारवाई

**अकोला :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी माना पोलीसांनी दोन सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करत त्यांना सहा महिन्यांसाठी अकोला, वाशिम आणि अमरावती जिल्ह्यांतून तडीपार केले आहे. माना पोलीस स्टेशन हद्दीतील जमीर अहमद मुमताज अहमद (रा. माना, ता. मुर्तिजापूर) हा गौवंश तस्करी व चोरी प्रकरणांत सक्रिय असल्याची नोंद आहे. तसेच उमेश सुरेश गोंडाणे (रा. माना, ता. मुर्तिजापूर) याच्यावर शरीराविरुद्ध गुन्हे आणि अवैध दारू विक्रीचे प्रकार नोंद आहेत. या दोघांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१)(अ) अंतर्गत कारवाई करण्यात आली.

उपविभागीय दंडाधिकारी, मुर्तिजापूर यांच्या आदेशानुसार या दोन्ही आरोपींना अकोला, वाशिम आणि अमरावती या तीन जिल्ह्यांतून सहा महिन्यांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा व माना पोलीस स्टेशनच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. दरम्यान, आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी सराईत गुन्हेगारांविरुद्ध एमपीडीए, तडीपार आणि इतर कायद्यांतर्गत कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.

### आ. साजिद खान पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त स्त्री रुग्णालयात फळ वाटप

#### शहर महिला काँग्रेसचा सामाजिक उपक्रम



**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा स्त्री रुग्णालयात फळ व खाऊ वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन अकोला शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा कशीश खान यांनी केले होते. यावेळी रुग्णालयातील महिलांना तसेच लहान मुलांना फळे व खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला नगरसेविका सुवर्णा रेखा जाधव, ताबींदा अहमद अली, इंगळे, रेखा डोंगरे, वर्षा चंद्रशेखर, मंजू चावरे, ज्योती डोंगरे, रंजना चावरे, निसरीन वाघ, सुल्ताना बी परवीन, संगीता सवद यांच्यासह महिला काँग्रेसच्या अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कशीश खान यांनी सांगितले की, समाजातील गरजू घटकांपर्यंत पोहोचून त्यांना मदत करणे हीच आमची प्राथमिकता असून अशा सामाजिक उपक्रमांद्वारे आनंद वाटण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### एचएससी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



**अकोला :** स्थानिक कृषी नगर येथे घरी जाऊन कामगारांचा पाल्यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये एच एस सी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रथमेश सुरेश भगत ७८ टक्के, बुद्धभूषण अमोल तायडे ६८टक्के, रोशन सुगतानंद तायडे ५१टक्के, स्वप्निल किसन गवई ४४टक्के यांचा गुणगौरव गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थी नेते शैलेश बोदडे डॉ. शुभम पाटील हागे यांनी मार्गदर्शन केले. श्रीकृष्ण पहूरकर, अमोल तायडे, सुगतानंद प्रज्ञानंद तायडे यांनी विद्यार्थ्यांचा सन्मान व गुण गौरव केला. सत्कार करतेवेळी परिसरातील युवा व नागरिक उपस्थित होते.

### आठव्या वर्षी ही ज्ञानसेतू ने केली नीट परीक्षार्थींची विविध शैक्षणिक सेवा

**अकोला :** कोणताही नीट परीक्षेचा विद्यार्थी शैक्षणिक साहित्य व संसाधना अभावी परीक्षेस वंचित राहू नये यासाठी नीट विद्यार्थ्यांच्या पालकांनी साकार केलेल्या ज्ञानसेतू च्या वतीने या आठव्या वर्षीही नीट परीक्षार्थींना विविध शैक्षणिक सेवा पुरवून आपले सामाजिक दायित्व जोपासले. गत आठ वर्षांपूर्वी नीटची परीक्षा देणाऱ्या पालकांनी परीक्षेस जाणाऱ्या आपल्या पाल्यांच्या अडीअडचणी व घरी राहिलेले अथवा विसरलेल्या शैक्षणिक कागदांमुळे होणारी ससेहोलपट लक्षात घेता नीट परीक्षा केंद्र परिसरात ज्ञान सेतू मदत केंद्र उभारून नीटच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना विविध माध्यमातून मोफत सेवा उपक्रम प्रारंभ केला होता.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद

**अकोला :** पोद्दार इंटरनॅशनल स्कूल मध्ये वर्ष २०२६-२७ साठी नवनिर्वाचित विद्यार्थ्यांचा विद्यार्थी परिषद सोहळा थाटात संपन्न झाला. या उपक्रमासाठी शाळेत विविध पदांसाठी ज्या विद्यार्थ्यांनी आपले नाव नोंदविले होते. त्यासाठी शाळेत वर्ग ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांनी गुप्त मतदान प्रक्रियेत मतदान केले. शालेय जीवनापासूनच प्रत्येक विद्यार्थ्याला विविध उपक्रम, स्पर्धा व अशाच अनेक गोष्टीचे नियोजन करण्यास व त्यांना शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अधिकृतपणे विविध पदांचा कार्यभार सांभाळण्या साठी निवडण्यात आलेले विद्यार्थी व त्यासाठी आयोजित करण्यात आलेला समारंभ म्हणजेच 'विद्यार्थी परिषद सोहळा' होय.

# पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प; महिलांचा संताप अनावर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पंचायत समिती अंतर्गत मळसूर येथे गेल्या पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प झाल्याने ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिलांचे हाल होत असून, उष्णतेच्या तीव्र लाटेत रोजंदारीची कामे आटोपूनही पाण्यासाठी भर उन्हात भटकंती करावी लागत आहे.

या समस्येकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत संतप्त महिलांनी रविवारी (३ मे) थेट ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढत ठिय्या आंदोलन केले. मळसूर येथील बहुतांश कुटुंबे शेतीमजुरीवर उदरनिर्वाह करतात. दिवसाभराच्या कष्टानंतरही पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

- मळसूर ग्रामपंचायत कार्यालयावर ठिय्या आंदोलन
- प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह



ग्रामपंचायतीकडे वारंवार मागणी करूनही पाणीपुरवठा सुरळीत करण्यात कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांकडून अरेरावी व उद्धट वागणूक दिली जात असल्याची तक्रारही महिलांनी केली.

दरम्यान, मे महिन्यातील वाढत्या उकाड्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तात्काळ उपाययोजना करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

> 'गेल्या पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प आहे. भर उन्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागते. पाणी सोडण्याची विनंती केल्यास कर्मचाऱ्यांकडून उद्धट वागणूक दिली जाते. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात आले. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.'
>
> **मनकर्णाबाई संतोष चौके,** सदस्य, ग्रामपंचायत मळसूर
>
> ............
>
> 'मे महिन्यात उष्णतेमुळे विहिरीतील पाण्याची पातळी घटली आहे. तरीही पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा सुरू आहे.'
>
> **पंढरी गडदे,** प्रशासक, मळसूर

## श्री शिवाजी विद्यालयाच्या बारावी निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारे संचालित श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, अकोटचा मार्च २०२६ मधील एचएससी परीक्षेचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यालयाने यंदाही आपल्या यशस्वी परंपरेला साजेसा निकाल नोंदविला आहे.

विज्ञान शाखेतील १९५ विद्यार्थ्यांपैकी १९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाखेचा निकाल ९८.९७टक्के लागला आहे. कु. महावीश अंजूम मो. जावेद हिने ९२.१७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. कु. त्रिशा रवींद्र चांदणे हिने ९१.६७टक्के गुण मिळवत द्वितीय स्थान मिळविले, तर कु. प्राजक्ता राहुल धांडे हिने ५१९ गुण (८६.५० टक्के) घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त केला. विशेष म्हणजे, कु. त्रिशा चांदणे हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

कला शाखेतही विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली. कु. यशस्वी अनिल थोरात हिने ६०० पैकी ४९५ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. अफसिया बी नाझीम बेग हिने ४६५ गुणांसह द्वितीय, तर कु. गौरी दिनेश कोल्हे हिने ४३६ गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

विद्यालयाच्या विज्ञान व कला शाखेतील एकूण २५४ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत, तर ७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विज्ञान शाखेचा निकाल ९८.९७ टक्के, कला शाखेचा ७६.२७ टक्के, तर एकूण शाळेचा निकाल ९३.७० टक्के लागला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर व केशव मेतकर, कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य, शाळा समिती, शाळा तपासणी अधिकारी उद्धव विखे, प्राचार्य विलास गावंडे, उपमुख्याध्यापिका वर्षा सिरसाट, पर्यवेक्षिका अंजली सपकाळ, कनिष्ठ महाविद्यालय प्रभारी कपिल धर्माळे, शिक्षक प्रतिनिधी गणेश इंगोले, शिक्षकेतर प्रतिनिधी माधुरी गावंडे तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## 'त्रिशरणाची मंगलवाणी' ने दुमदुमले महानगर

■ प्रतिनिधी | अकोला ■

संस्कार भारती अकोला शाखा व तीक्ष्णगत मल्टीपर्पज सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी गर्दीने तुडुंब भरलेल्या स्थानीक प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात बुद्ध पौर्णिमा संगीतमय उत्सवास अकोलेकर नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पावन बुद्ध पौर्णिमा पर्वावर आयोजित या संगीतमय उत्सवात महिला, पुरुष गायकांनी एकापेक्षा एक सुंदर व संगीतमय बुद्ध व भीमगिते गाऊन भक्तिभाव निर्माण केला. तिक्ष्णगत सोसायटीचे अध्यक्ष डॉ सुगत वाघमारे व संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर यांनी साकारलेल्या व प्रा. प्रकाश बोरकर यांनी नियोजन केलेल्या व प्रा स्वप्निल बोरकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या संगीतमय उत्सवाचा प्रारंभ संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर, सुमंत देशपांडे, डॉ गजानन नारे, प्रकाश मालगावे, प्रा प्रकाश बोरकर, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, संस्कार भारतीचे महानगर अध्यक्ष डॉ आर बी हेडा, तीक्ष्णगत सोसायटीचे विष्णुदास मंडोकार, निनाद कुळकर्णी, किसन जयस्वाल आदीच्या उपस्थितीत करण्यात आला.

# महाबीजचा सुवर्णमहोत्सवी वर्धापन दिन उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

### शेतकरी हितासाठीच्या ५० वर्षांच्या कार्याचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीत विविध उपक्रमांचे आयोजन



शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) या संस्थेचा ५० वा सुवर्णमहोत्सवी वर्धापन दिन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे २०२६ रोजी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील डॉ. के. आर. ठाकरे सभागृहात अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात साजरा करण्यात आला.

या ऐतिहासिक सोहळ्यास अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी, संचालक वल्लभराव देशमुख व डॉ. रणजित सपकाळ, अकोला महानगरपालिकेचे आयुक्त सुनील लहाने तसेच 'देशोन्नती'चे संपादक प्रकाश पोहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचे महाबीजचे रोप, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गरकल, उपजिल्हाधिकारी तथा महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले.

यानंतर महाबीजच्या गेल्या ५० वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा सादर करण्यात आला. संस्थेने शेतकरी हितासाठी राबविलेल्या विविध योजना, उच्च दर्जाचे बियाणे उत्पादन, संशोधन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रसंगी महाबीजच्या नव्या उत्पादनांचे तसेच 'महाबीज वार्ता'च्या मुखपृष्ठाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच उत्कृष्ट बीज उत्पादक शेतकरी, उत्कृष्ट विक्रेते, संशोधित वाणांचे यशस्वी उत्पादन घेणारे शेतकरी, अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून महाबीजने गेल्या पाच दशकांत शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याचे प्रतिपादन केले. आमदार रणधीर सावरकर यांनी महाबीजच्या ५० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत संस्थेने राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविल्याचे सांगितले. दर्जेदार बियाणे, विश्वासार्ह उत्पादने आणि शाश्वत शेतीसाठी महाबीजची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच नैसर्गिक व सेंद्रिय शेती, संशोधनाधारित वाण आणि शेतकऱ्यांना थेट लाभ देणाऱ्या धोरणांवर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी महाबीजच्या योगदानामुळे शेती उत्पादन वाढीस मोठा हातभार लागल्याचे सांगितले. कृषी विद्यापीठ व महाबीज यांच्यातील समन्वयामुळे संशोधनातून विकसित वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**Change In Name**

I have Changed My Name Form
**A HAMEEDA KAREEM**
-TO-
**SHAIKH HAMEED SHAIKH KAREEM**
My residential Address in, Near Shoaib Weldding work shop, Firdos colony, Akola 444001.

**Change In Name**

I have changed my name from
**Jaishri Narayan Bavane**
-TO-
**Jayshree Sanjay Sonawne**
Passport Number -P1250530 My residential address is Care of Sonawne orthopaedic and trauma centre ,Near Krishna Mandir, Ramnagar Akola 444001

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६५६/२०२६ — प्रोसेस नं.५५५१/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : २३/०४/२०२६

**अर्जदार :** १. शैलेश राजाराम बागडे रा. न्यु खेतान नगर, प्राजक्ता शाळेच्या मागे, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. २. श्रीमती योगिता विलास बागडे ३. सनी विलास बागडे ४. अविनाश विलास बागडे २ ते ४ रा. तळोकार हॉस्पिटल जवळ, गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. राजाराम शिवराम बागडे २. निर्मला राजाराम बागडे ३. विलास राजाराम बागडे
**पत्ता :-** रा. तळोकार हॉस्पिटल जवळ, गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १ राजाराम शिवराम बागडे यांचे दि. ०५/०७/२००८ रोजी, मयत क. २ निर्मला राजाराम बागडे यांचे दि. १७/१०/२०२० रोजी व तसेच मयत क. ३ विलास राजाराम बागडे यांचे दि. २६/१०/२०२० रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६७१/२०२६ — प्रोसेस नं.५५५०/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : २३/०४/२०२६

**अर्जदार :** १. नर्मदा यशवंत पजाई रा. व्दारा रविंद्र पजाई, गौरक्षण रोड, गजानन महाराज मंदिर जवळ, सहकार नगर, अकोला ता. जि. अकोला. २. राजेंद्र यशवंत पजाई रा. मु. पो. विवरा, आझाद चौक पातूर, ता. पातूर, जि. अकोला. ३. रविंद्र यशवंत पजाई रा. फ्लॅट नं. ई ४०२, राधिका रिजेंट जवळ, इलेक्ट्रॉनिक सिटी, बेंगरूळ कर्नाटक. ४. विजय यशवंत पजाई रा. वाटिका १, गुरूकुल कॉलनी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : यशवंत दत्तुजी पजाई
**पत्ता :-** रा. व्दारा रविंद्र पजाई, गौरक्षण रोड, गजानन महाराज मंदिर जवळ, सहकार नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत यशवंत दत्तुजी पजाई यांचे दि. ११/०१/२०२६ रोजी सहकार नगर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६८०/२०२६ — प्रोसेस नं.५६७४/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : २७/०४/२०२६

**अर्जदार :** १. सचिन गजानन घरडे २. निखील गजानन घरडे ३. नेहा गजानन घरडे ४. गजानन गणपत घरडे क्र. १ ते ४ रा. महात्मा फुले नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संगिता गजानन घरडे
**पत्ता :-** रा. महात्मा फुले नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संगिता गजानन घरडे यांचे दि. १२/०१/२०२५ रोजी सरकारी दवाखाना (मेडीकल कॉलेज) नागपूर, ता. जि. नागपूर. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १४९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वरली जुगार प्रकरणात एक जण ताब्यात

## - चौघांविरुद्ध गुन्हा दाखल - गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान वरली जुगारावर कारवाई करत एका आरोपीला ताब्यात घेतले असून इतर तिघे आरोपी फरार आहेत. या प्रकरणी एकूण चौघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक बडनेरा परिसरात गस्त घालत असताना बडनेरा आठवडी बाजारातील 'सोनू मोबाईल' दुकानाच्या मागील बाजूस सार्वजनिक ठिकाणी वरली जुगार खेळ सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार छापा टाकण्यात आला असता रत्नदीप मिलिंद दाभाडे (वय ३८, रा. बेलोरा, अमरावती) हा जुगाराच्या चिठ्ठ्यांसह हार-जीतचा खेळ खेळताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून रोख रक्कम ४,३२० रुपये व एक पेन (अंदाजे किंमत १० रुपये) असा एकूण ४,३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईदरम्यान मिलिंद झंजाळ, शेख शब्बीर शेख बशीर आणि करीम लाला वरीर (सर्व रा. नवी वस्ती, बडनेरा) हे आरोपी फरार झाले. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा तसेच भा.न्या.सं. कलम ४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# अमरावतीसह अनेक ठिकाणी वादळी पाऊस



**अमरावती/प्रतिनिधीः-** वरूड व शे.घाट शहरासह तालुक्यातील काही गावांमध्ये शनिवारी दिवसभराच्या अती तापमानानंतर साडेपाच वाजताच्या सुमारास अचानक वादळाने कहर केला. दुकानाचे फलक, रस्त्यावरील फेरीवाल्यांचे साहित्य, काही ठिकाणी टिनाचे पत्रे उडाले तर काही ठिकाणी झाडांची पडझड झाली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे हवेची गती वाढल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

या वादळामुळे विद्युत वाहिन्या तुटल्याने शहरातील वीज पुरवठा खंडित झाला. शे.घामध्ये सुद्धा वादळी वाऱ्यासह हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या. अमरावती शहरात सात वाजता दरम्यान वादळी पाऊस आला. पावसामुळे हवेत थंडावा पसरला होता. त्यामुळे नागरिकांनी तात्पुरत्या स्वरूपात का होईना थंड हवेचा आनंद घेता आला.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

## -गर्भवती झाल्यानंतर बळजबरीने गर्भपात

### -दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेवर लग्नाचे आमिष दाखवून दीर्घकाळ लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच गर्भवती झाल्यानंतर जबरदस्तीने गर्भपात केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह एका महिला सहआरोपीविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

३१ वर्षीय पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना २०२३ पासून सुरू झाली. त्या काळात पीडिता आरोपीच्या भावाच्या घरी भाड्याने राहत होती. त्यावेळी मुख्य आरोपी सतीश रमेशपंत गुल्हाने याने तिच्याशी जवळीक वाढवत लग्नाचे खोटे आश्वासन दिले आणि वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. पीडितेने विरोध करण्याचा किंवा हा प्रकार उघड करण्याचा प्रयत्न केल्यास आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी देत गप्प बसवले.



नंतर पीडिता अमरावती शहरात राहायला गेल्यानंतरही आरोपीने तिचा पाठलाग सुरूच ठेवला. तेथेही तिच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यात आले, ज्यामुळे ती गर्भवती झाली. ही बाब लक्षात आल्यानंतर आरोपी सतीश गुल्हाने आणि महिला सहआरोपीने पीडितेवर दबाव टाकत जबरदस्तीने गर्भपात घडवून आणल्याचा आरोप आहे. या प्रकरणाची प्राथमिक तक्रार राजापेठ पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. मात्र, घटना नांदगाव खंडेश्वर हद्दीत घडल्याने प्रकरण तेथे वर्ग करण्यात आले. नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी सतीश गुल्हाने व एका महिला आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अंतर्गत जनगणना पर्यवेक्षकाचे प्रशिक्षण

## -शहरात डिजिटल जनगणनेची तयारी सुरू

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** आगामी जनगणना २०२७ च्या अनुषंगाने अंजनगाव सुर्जी नगरपरिषद क्षेत्रातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून पर्यवेक्षकाचे तीन दिवसीय प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न झाले आहे.



जनगणना ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असून संकलन करताना अचूकता, तसेच पारदर्शकता आणि वेळेचे भान राखण्याचे निर्देश मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनावेळी दिले.

पहिल्या टप्प्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण मुख्याधिकारी विजय लोहकरे तसेच ट्रेनर म्हणून गजानन चक्रनारायण क्षितीज खैरे यांनी दिले आहे .जनगणनेच्या घर यादी बाबतचा कार्यक्रम १६ मे पासून ते १४ जुन पर्यंत कालमर्यादा असल्याची सूचना शिक्षक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण वेळी देण्यात आल्या आहेत. तर १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांसाठी स्वगणनेचा टप्पा राबविण्यास सुरुवात झाली असून नागरिकांनी व्यवस्थित माहिती डिजिटल भरावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्रशिक्षणाबाबत माहिती देताना मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी सांगितले की १ मे ते १५ मे दरम्यान जनगणनेची रुपरेषा निश्चित केले आहे. १६ मे ते १४ जून या कालावधीत जनगणना कर्मचारी घरोघरी भेट देऊन घरांची व इमारतींची नोंदनी करतील. या काळात नागरिकांनी अचूक व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.

देशाच्या विकासासाठी आणि भविष्यातील नियोजनासाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. पायाभूत सुविधा, विविध योजना आणि विकास कामे यासाठी ही माहिती आधारभूत ठरत असल्याने नागरिकांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा असेही आवाहन नगरपरिषद जनगणना विभागाच्या प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कामगार दिनानिमित्त बांधकाम कामगार संघटनेकडून रुग्णांना फळ वाटप

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** स्थानिक बांधकाम कामगार मजूर संघटना यांच्याकडून सामाजिक उपक्रम दरवर्षी राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून कामगाराच्या मुलाचा सत्कार घेणे तसेच बांधकाम कामगारांना योजनाचा फायदा मिळावा यासाठी संघटना काम करते. यावर्षी कामगार दिना निमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटपाचे आयोजन केले गेले होते. त्यानुसार श्री कृपा हॉस्पिटल तसेच ढोले हॉस्पिटलमध्ये सुद्धा फळ वाटप करण्यात आले.




यावेळी संघटनेचे अध्यक्ष जगदीश धोटे, उपाध्यक्ष शैलेंद्र रामटेके, सचिव मनोज गवई, कोषाध्यक्ष गजानन बुल्ले, सहसचिव सुनील कावलकर, तसेच संजू भाऊ सोनकुसरे, रमेश फुलझले, प्रमोद भेंडे, रवी वंजारी, सोनू शेख, अनिल गायकवाड, अजय गायकवाड, रोशन गडलिंग, रंजीत मेश्राम इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यातून यशश्री राजा अव्वल

## -सिद्धांत बत्रा व श्रीदा जोग प्रथम

**अमरावती/प्रतिनिधीः-** इयत्ता बारावीच्या निकालात अमरावती जिल्ह्याने नेहमीची परंपरा कायम ठेवली आहे. जिल्ह्यातून विज्ञान शाखेची ब्रीजलाल बियाणी महाविद्यालयाची विद्यार्थीनी यशश्री संतोष राजा ही ९७.३३ टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे. जिल्ह्यातून वाणिज्य शाखेतून केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचा विद्यार्थी सिद्धांत राकेश बत्रा ९६.१७ टक्के गुणांसह प्रथम आला आहे. कला शाखेतून विदर्भ ज्ञान विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रीदा शैलेश जोग ही ९५.८३ टक्के गुण घेऊन जिल्हात प्रथम आली आहे. या तिन्ही गुणवंत विद्यार्थांचे पालकांकडून भरभरून कौतुक झाले. तसेच त्यांच्या नातेवाईकांचा, वर्ग मित्रांचा, शिक्षकांचा शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. श्रीदा जोग हीने कला शाखेतून गणित विषय घेतला होता. तिने राज्यस्तरीय स्कॅश व गोल्फ मध्ये सहभाग घेतला आहे.



जिल्ह्याचा इयत्ता बारावीचा जिल्ह्याचा एकूण निकाल ८८.२६ टक्के लागला असून ९६.२४ टक्क्यांसह नांदगाव खंडेश्वर तालुका जिल्ह्यात अव्वल स्थानावर आहे. भातकुली तालुका तळाशी आहे. विभागात अमरावती जिल्हा पाचव्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत जिल्ह्याचा निकाला २.७९ टक्क्याने घसरला आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण यंदाही अधिक आहे. जिल्ह्यातल्या १४ तालुक्यातून ३४ हजार १४८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ३० हजार १४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये १४ हजार ७०८ मुले तर १५ हजार ४३३ मुली आहे. अनुक्रमे ८४.३७ व ९२.३१ अशी त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी आहे.

# अपघातात दोन तरुणांचा मृत्यू मित्राच्या लग्नाला जाताना काळाचा घाला

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** मित्राच्या लग्नाला जात असताना दोन तरुणांवर काळाने झडप घातली. भीषण अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याची हृदयविदारक घटना ३० एप्रिल रोजी घडली. या घटनेमुळे अंजनगाव सुर्जी परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रोशन नांदूरकर (वय २९) आणि शुभम पांडुरंग वंजाळे (वय २८, रा. झाडीपुरा सुर्जी) हे दोघे मित्राच्या लग्नासाठी जालना येथे जात होते. दरम्यान, मेहकर ते सिंदखेडराजा दरम्यानच्या हायवेवर त्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला.

या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला होता. जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला.

दोघेही अंजनगाव सुर्जी येथील रहिवासी असून, त्यांच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, मृतांपैकी एक तरुण इंजिनिअर होता, तर दुसऱ्याचे केवळ वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते. आनंदाच्या क्षणी निघालेल्या या प्रवासाचा शेवट दुःखद ठरल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मित्राच्या लग्नाला जाणे जीवावर बेतले, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत असून, या घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे.

# तक्षशिला महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९०.७५ टक्के!

## -शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या घरी जाऊन केले अभिनंदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या बारावीच्या (HSC) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित अमरावती येथील तक्षशिला महाविद्यालयाने यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९०.७५ टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.



महाविद्यालयाने सर्वच शाखांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यात प्रामुख्याने विज्ञान शाखेने बाजी मारली आहे. विज्ञान शाखा ९४.७३ टक्के , वाणिज्य शाखा ९०.९० टक्के,आणि MCVC विभाग ८८.८८ टक्के तर कला शाखेचा ८५.०० टक्के निकाल लागला आहे. विविध शाखांमधून अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. वाणिज्य शाखेत नाविन्य उमाळे (८०.८३टक्के) याने प्रथम क्रमांक पटकावला, तर वैभवी सूर्यवंशी (७०.८३टक्के) हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

कला शाखेत सानिया मांजरे (६८.५०टक्के) हिने प्रथम, तर आल्फिया चौधरी (६७टक्के) हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. MCVC विभागात साहिल मसराम याने ६४.३३ टक्के गुणांसह यश मिळवले. विज्ञान शाखेत रीमल मोनावाले हिने ६०.५० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले आणि उपप्राचार्य प्रितेश पाटील यांच्यासह सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या घरी जाऊन अभिनंदन केले आहे. या यशात डॉ. रुपेश बेलसरे, डॉ. आनंद देशमुख, महेंद्र भगत, प्रा. सचिन कुमरे, प्रा. निरूपमा भोरे आणि प्रा.मोनाली पाटील,प्रा. निलेश गणगणे, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. समीर चौधरी, प्रा. ममता कळमकर, प्रा.ज्योती नवलकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.





विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष कीर्तीताई राजेश अर्जुन, सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# ४६ अंश तापमानातही प्रवासी रखरखत्या उन्हात तात्कळत

# नांदगाव खंडेश्वर च्या बसस्थानकाचा प्रश्न अद्यापही अधांतरी

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** शहराला तालुक्याचा दर्जा मिळून अंदाजे चाळीस वर्षाच्या जवळपास कालावधी होत आहे. या कालावधीत तालुक्यातील नागरिकांनी अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांना आमदार-खासदार बनविण्यासाठी आपली भूमिका निभावली असता काही पदावरून गेले काही पदावर आहे. तरीसुद्धा नांदगाव खंडेश्वर येथे तालुक्याच्या ठिकाणी बस स्थानक व्हावे या नागरिकांच्या मागणीकडे एकाही लोकप्रतिनिधींनी लक्ष दिले नाही. आजही नांदगावला बस स्थानक नसल्याची समस्या कायम आहे तेव्हा लोकप्रतिनिधींच्या नागरिकांप्रति भावना फक्त मतदानापुरत्याच मर्यादित असतात काय हा प्रश्न आता नागरिकांमध्ये निर्माण होत आहे.




सूर्याकडून एक प्रकारे अग्निवर्षा होत असून तापमान ४६ अंशाच्या वर पोहोचले. शरीराची तडपत्या उन्हाने लाही लाही होत असून सुद्धा येथे बस स्थानक नसल्यामुळे नाईलाजास्थ सामान्य प्रवाशांना रस्त्याच्या कडेला रखरखत्या उन्हात तासान तास उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते. यामध्ये महिला लहान मुले वृद्ध प्रवासी यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून हा तालुका लोकप्रतिनिधीच्या उदासीनतेला बळी तर पडला नाही ना अशी शंका निर्माण होत आहे. नगरपंचायत चा दर्जा असलेल्या नांदगाव तालुक्याच्या ठिकाणी बस स्थानक नाही ही एक स्थानिक राजकारण्यांची निष्क्रियता असून शोकांतिकाच म्हणावी लागेल. कारण आमदार-खासदार या लोकप्रतिनिधीकडून येथील बस स्थानकाचा प्रश्न त्यांना सोडवून घेता आला नाही. यामध्ये स्थानिक राजकारणी लोकांची उदासीनता कारणीभूत असल्याचे दिसून येते. ऊन वारा पावसाचा मार सहन करीत येथे सामान्य प्रवाशांना तासंन तास बसची प्रतीक्षा करावी लागते. सुविधा नसलेल्या प्रवासी निवाऱ्या समोरील झाडाच्या सावलीचा उन्हात प्रवाशांना सहारा घ्यावा लागतो तर दुसऱ्या बाजूने हॉटेल किंवा पान टपरीच्या आडोशाला भर उन्हात किंवा पावसात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते. प्रवाशांचे होत असलेले हाल हा सर्व प्रकार स्वतःला नेते व विकास वीर म्हणून घेणाऱ्या स्थानिक राजकारण्यांना दिसत नाही काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासकीय यंत्रणा असो किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यांना आश्वासनाच्या पलीकडे सामान्य नागरिकांच्या समस्या कधीच दिसल्या नाही.

काही महिन्यापूर्वी विद्यमान आमदार यांच्याकडे येथील बस स्थानकाची समस्या स्थानिक भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली असता त्यावर आमदार यांनी सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे समजते परंतु त्याला एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यावरही परिस्थिती जैसे थे असल्याने या प्रकरणात पाणी कुठे मुरले आणि बस स्थानकाचा प्रश्न का रेगाळला हा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेला जात आहे. विद्यमान आमदार यांना संपूर्ण तालुक्यातील समस्यांची जाण आहे त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात नांदगाव येथे सुसज्ज सोयीने बस स्थानक व्हावे अशी नागरिकांची मागणी जोर धरत आहे.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१७/२०२६
**सुनिता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Sunita Shankarrao Dhamankar, Age 60 Yrs. Occu.: Household R/o Morshi Road, Flat No.103, Mukta Fort Apartment, Shivaji Nagar,Amt.
2. Saurabh Shankarrao Dhamankar Age 36 Yrs. Occu.: Agriculturist R/o Ramdara Arvi Road, Talegaon Shyamjipant Tq.Ashti, Dist.Wardha

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शंकर यशवंतराव धामनकर** हे **दिनांक २८.११.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **सुनिता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८४५/२०२५
**शैलेष व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Shailesh Krishnarao Dongre, Age 46 Yrs. Occu.: Service R/oYashoda Nagar No.2, Near Asara Mata Mandir, Amravati.
2. Anju Prakash Ganvir, Age 50 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Near Maharashtra Tantra Shikshan Vidyalaya, Kishor Nagar,Amravati
3. Nilima Bhashkar Patil, Age 52 Yrs. Occu.: Service R/o Harsharaj Colony V.M.V. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कृष्णराव सुखाजी डोंगरे व कमला कृष्णराव डोंगरे** हे **अनुकमे दिनांक १२.०५.२०१७ व २०.०५.२०२३** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **शैलेष व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शैलेष व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# फलकाने उघड केला ‘दारूचा काळाबाजार

## दारूविक्रीवर महिलांचा प्रहार; ‘दूध ५०, दारू १५०’ फलकाने सरकारला प्रश्न




**सेलु जनमाध्यम :** तालुक्यातील बोरधरण येथे दारूमुक्तीसाठी महिलांनी उभारलेला लढा आता नव्या वळणावर पोहोचला आहे. मां दुर्गा दारूमुक्ती महिला मंडळाने वाहितपूर पॅटर्नचा आदर्श घेत गावात लावलेल्या उपरोधिक फलकातून अवैध दारूविक्रीवर थेट हल्ला चढवला आहे. गावात गाईचे दूध ५० रुपये लिटर, आणि दारू १५० रुपये लिटर २४ तास मिळेल, या आशयाचा फलक सध्या गावात चर्चेचा विषय ठरला असून, प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहे.

महिलांच्या या अनोख्या आंदोलनातून गावातील वास्तव समोर आले आहे. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यासाठी आवश्यक असलेले दूध वेळेवर उपलब्ध होईल की नाही याबाबत अनिश्चितता असताना, आरोग्यास अपायकारक असलेली दारू मात्र सहज आणि चोवीस तास उपलब्ध होते, हा विरोधाभास महिलांनी अधोरेखित केला आहे. विशेष म्हणजे, गावात दारूबंदी लागू असतानाही अवैध दारूविक्री उघडपणे सुरू असल्याचे या फलकातून स्पष्ट होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून गावातील महिलांनी दारूविक्रीविरोधात आवाज उठवला असून, कुटुंबांवर होणारे दुष्परिणाम, वाढते भांडण-तंटे आणि आर्थिक नुकसान यामुळे त्या आक्रमक झाल्या आहेत. मात्र, संघर्षाचा मार्ग निवडताना त्यांनी शांततापूर्ण पद्धतीचा अवलंब केला आहे. थेट वाद टाळत, अशा उपरोधिक फलकांच्या माध्यमातून प्रशासनावर दबाव निर्माण करण्याची ही रणनीती प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते. या फलकामुळे सोशल मीडियावरही चर्चा रंगली असून, स्थानिक पातळीवर प्रशासन आणि पोलिसांवर कारवाईसाठी दबाव वाढत आहे. गावकऱ्यांमध्येही या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, या प्रकारामुळे संबंधित यंत्रणा खडबडून जागी होते का आणि गावातील अवैध दारूविक्रीवर ठोस कारवाई होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महिलांनी उभारलेला हा लढा केवळ दारूमुक्तीसाठी नसून, गावाच्या सामाजिक आरोग्याच्या जतनासाठी असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# दारू विक्रेत्यांना अभय कुणाचे : राजकीय नेत्यांचे की पोलिसांचे?

## हातभट्ट्यांवर धाड, पण बियरवाल्यांना आशिर्वाद : गांधींच्या वर्ध्यात दारूबंदी की ढोंगबंदी!



**वर्धा । जनमाध्यम** महात्मा गांधींच्या तत्वज्ञानाचा वारसा सांगणारा, ‘दारूबंदी जिल्हा’ म्हणून देशभर ओळख असलेला वर्धा आज उघडउघड दुटप्पीपणाच्या विळख्यात अडकला आहे. एकीकडे हातभट्ट्यांवर धडाकेबाज कारवाया करून पोलीस प्रशासन आपली कामगिरी रंगवताना दिसते, तर दुसरीकडे बियर, देशी दारू, गांजा आणि एमडीसारख्या अमली पदार्थांचा मोकाट बाजार सुरू असल्याचे चित्र नागरिकांच्या डोळ्यासमोर आहे. त्यामुळे दारूबंदी खरोखर आहे की फक्त दिखावा हा प्रश्न आता रस्त्यावर उतरला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयात नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत गृहराज्यमंत्र्यांनी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली खरी; पण प्रश्न असा आहे की, नागरिकांनी सहकार्य करायचे तरी किती आणि कसे, जेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोरच अवैध धंदे बिनधास्तपणे सुरू आहेत, गावोगावी रात्रीच्या अंधारातच नव्हे तर दिवसा ढवळ्याही दारूची विक्री होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. मग या ‘दारूबंदी’चा फायदा नेमका कोणाला, पोलीस कारवायांचा आढावा घेतला तर चित्र आणखी स्पष्ट होते. हातभट्टीवाल्यांवर मोठ्या प्रमाणात धाड टाकून आकडेवारी फुगवली जाते, पण मोठे पुरवठादार, बियर विक्रेते आणि शहरातील संघटित जाळे चालवणारे मात्र कसे काय पोलिसांच्या नजरेतून सुटतात हा योगायोग आहे की ‘व्यवस्था’चाच भाग, असा संशय आता उघडपणे व्यक्त होऊ लागला आहे. स्थानिक पातळीवर ‘हफ्ता संस्कृती’चा आरोपही जोर धरत आहे. पैसे द्या आणि धंदा करा हीच नवी अनौपचारिक नीती राबवली जाते का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. छोट्या हातभट्टीवाल्यांना पकडून ‘कडक कारवाई’चा गाजावाजा केला जातो; पण मोठ्या माशांना जाळ्यातून सोडून दिले जाते, अशी धारणा आता घट्ट होत चालली आहे. यामुळे पोलीस विभागाच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. वर्ध्यातील तरुणाई अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असल्याची भीतीही व्यक्त होत आहे. एमडीसारख्या घातक ड्रग्सची वाढती उपलब्धता ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची नाही, तर सामाजिक आरोग्याचीही गंभीर समस्या बनत आहे. तरीही यावर ठोस, सातत्यपूर्ण आणि मोठ्या साखळ्यांवर घाव घालणारी कारवाई का दिसत नाही? ‘गांधींचा वर्धा’ ही ओळख जपायची असेल, तर दारूबंदी कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्षात दिसली पाहिजे. अन्यथा ही दारूबंदी म्हणजे फक्त ढोंगबंदी ठरेल, यात शंका नाही. प्रशासन आणि पोलीस यंत्रणेनं आता स्वतःकडे बोट दाखवण्याची वेळ आली आहे. केवळ आकडेवारीचा खेळ थांबवून मूळ मुळावर घाव घालण्याची गरज आहे. नागरिकांचा संताप दिवसेंदिवस वाढतो आहे. आज प्रश्न विचारले जात आहेत; उद्या हेच प्रश्न आंदोलनात बदलले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? वर्ध्याला ‘दारूबंदी जिल्हा’ ही ओळख वाचवायची असेल, तर आता शब्द नव्हे, तर कठोर कृतीची गरज आहे, नाहीतर इतिहास माफ करणार नाही.

# कामगार दिनी पत्रकार रविराज घुमे यांचा गौरव



**वर्धा जनमाध्यम :** कामगार दिनानिमित्त येथे आयोजित कार्यक्रमात पत्रकारितेचा सन्मान आणि शिक्षण विषयावरील विचारमंथनाचा संगम पाहायला मिळाला. कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने यशवंत महाविद्यालय येथे विद्यमान शैक्षणिक स्थिती आव्हाने आणि उपाय या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या प्रसंगी उत्कृष्ट पत्रकार म्हणून रविराज घुमे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पत्रकारितेतील त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाला माजी शिक्षण मंत्री वसंत पुरके, शेतकरी नेते विजय जावंधिया, वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष अभ्युदय मेघे, तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. चर्चासत्रात सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील आव्हाने, गुणवत्तावाढीचे मुद्दे आणि सुधारणा उपायांवर सविस्तर चर्चा झाली. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. कामगार दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# कामगार दिनी पालिकेच्या ‘खऱ्या हिरों’चा सन्मान; दोन कर्मचाऱ्यांचा गौरव



**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त येथील नगर पालिका सभागृहात आयोजित कार्यक्रमात दोन चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. बांधकाम सभापती ममता बोंगाडे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी शिपाई म्हणून कार्यरत हेमंत बावने आणि पाणी पुरवठा विभागातील राजु गीरीजापुरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शहरातील विविध कामांसाठी नेहमी तत्पर असणारे हे कर्मचारी ‘पालिकेचा श्वास’ मानले जातात. विशेषतः पाणीपुरवठ्याच्या जबाबदारीतून दररोज शहरभर पाणी वितरणाचे महत्त्वाचे काम ते पार पाडतात. कामाच्या स्वरूपामुळे अनेकदा नागरिकांच्या नाराजीला सामोरे जावे लागूनही, कोणतीही तक्रार न करता हसतमुखाने सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. अल्पावधीतच त्यांच्या कार्याची नोंद घेत त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे बोंगाडे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राणी कलोडे होत्या. यावेळी उपाध्यक्ष अकील शेख व मुख्याधिकारी पोर्णिमा गावीत यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरसेवक, नगरसेविका आणि पालिका कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# ‘फॅमिली हेल्थ कार्ड’ने आरोग्यसेवेचा खर्च कमी; सावंगी रूग्णालयात नवी योजना सुरू



**वर्धा जनमाध्यम :** सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांनी सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी ‘फॅमिली हेल्थ कार्ड २०२६-२७’ ही योजना सुरू केली आहे. कमी शुल्कात अधिकाधिक वैद्यकीय सुविधा देण्यावर या योजनेचा भर असून, नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या योजनेअंतर्गत कार्डधारकांना ओपीडी व आयपीडी सेवांवर २० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच सुमारे २५८० रुपयांच्या विविध तपासण्या मोफत देण्यात येणार आहेत. यामध्ये रक्त, मूत्र, ब्लड शुगर, लिव्हर व किडनी फंक्शन टेस्ट, ईसीजी, अल्ट्रासाऊंड आणि एक्स-रे यांसारख्या महत्त्वाच्या तपासण्यांचा समावेश आहे. त्यामुळे आजारांचे लवकर निदान होऊन वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

चार सदस्यांच्या कुटुंबासाठी केवळ ३०० रुपयांत हे कार्ड उपलब्ध असून, अधिक सदस्यांसाठी नाममात्र शुल्क आकारले जाणार आहे. या कार्डची वैधता ३१ मार्च २०२७ पर्यंत राहणार आहे. रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचण्यात अडचण येऊ नये यासाठी काही मार्गांवर मोफत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांना मोफत उपचाराची सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे मोठ्या आजारांवरील खर्चाचा भार कमी होण्यास मदत होणार आहे. ही योजना शालिनीताई मेघे सुपर स्पेशालिटी सेंटर आणि सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल येथेही लागू राहणार आहे. रुग्णालय प्रशासनाने नागरिकांनी या योजनेत सहभागी होऊन आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.



# कार नदी कालव्याच्या कामास प्रारंभ

## २०.२९ कोटींच्या निधीतून सिंचनाला चालना

**आर्वी जनमाध्यम :** कार नदी प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या दुरुस्ती व नूतनीकरणाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांच्या हस्ते पार पडला. अनेक वर्षांपासून जीर्णावस्थेत असलेल्या या कालव्यामुळे सिंचनासाठी सोडल्या जाणाऱ्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत होता. त्यामुळे शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना पाण्याअभावी अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येच्या निराकरणासाठी २० कोटी २९ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून कालव्याचे सिमेंट अस्तरीकरण व आरसीसी ट्रफ बांधकाम करण्यात येणार असून, सुमारे २० किलोमीटर लांबीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे जवळपास चार हजार हेक्टर क्षेत्रातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. यावेळी आमदार वानखेडे यांनी सांगितले की, भविष्यातील सिंचनासाठी वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून, कोरडवाहू भागात पाणी पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. या सोहळ्याला अधिकारी, पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाविद्यालय परिसरात धारदार शस्त्रासह युवक ताब्यात

## पोलिसांची तत्पर कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** संत गजानन मंदिरासमोरील महाविद्यालयाच्या खुल्या मैदानाजवळ संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या युवकाला रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. शांतनु राजू रामटेके (वय २१, रा. रसूलाबाद रोड, सिंदी मेघे) असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून धारदार लोखंडी सुरा जप्त करण्यात आला. पोलीस पथक नियमित पेट्रोलिंग करत असताना त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. संशयित युवकाला घेराव घालून पकडण्यात आले. पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्या कमरेला लपवून ठेवलेला सुमारे ४१ सेंमी लांबीचा टोकदार सुरा आढळून आला. त्याच्याकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे तपासात निष्पन्न झाले.तसेच संबंधित युवकावर हद्दपारी आदेश लागू असतानाही तो मनाई क्षेत्रात फिरत असल्याचे उघड झाले. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ व भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक धीरज खोब्रागडे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचा सहभाग होता. आरोपीला अटक करून पुढील चौकशी सुरू असून शहरात अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी मोहीम अधिक तीव्र केली आहे.

# पुलगावमध्ये वृद्धाचा छातीत दुखून मृत्यू

**पुलगाव :** शहरातील मोतीलाल विधुरकर (वय अंदाजे ६०) यांचा छातीत दुखू लागल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, मोतीलाल यांना मागील काही महिन्यांपासून आजाराचा त्रास होता. रविवारी रात्री अचानक छातीत वेदना सुरू झाल्याने त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी मर्ग नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# स्वावलंबी ग्राउंडवर शस्त्रासह तरुण अटकेत; हद्दपारीचा भंग उघड

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वावलंबी ग्राउंड परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून अटक केली. यश संजय श्रीवास्तव (वय २३, रा. हिंदनगर, गणेश मंदिर परिसर) असे अटकेत घेतलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून धारदार लोखंडी सुरा जप्त करण्यात आला.

पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचांच्या उपस्थितीत आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला लपवून ठेवलेला सुमारे ३१.५ सेंमी लांबीचा टोकदार सुरा आढळून आला. विशेष म्हणजे संबंधित आरोपीवर यापूर्वी हद्दपारीचा आदेश लागू असूनही तो मनाई क्षेत्रात फिरताना आढळला. या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ तसेच भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या शस्त्राचा पंचनामा करून आरोपीला रामनगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू असून शहरातील हद्दपार गुन्हेगारांवर पोलिसांनी विशेष मोहीम राबवली असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# महाराष्ट्र दिनी नवभारत अध्यापक विद्यालयात उत्साहात ध्वजारोहण



**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र दिनानिमित्त नवभारत अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात देशभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. प्राचार्य डॉ. सुनील गावंडे यांच्या हस्ते तिरंगा फडकवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी परिसर देशप्रेमाच्या घोषणांनी आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाने भारावून गेला.

या कार्यक्रमाला जगजीवनराम माध्यमिक विद्यालय व नवभारत अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून परिसरातील ज्येष्ठ नागरिक इंजी. दिलीप जवदंड आणि सुरेश श्रीरंगवार यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रा. राजेश कापसे यांनी विद्यार्थ्यांसोबत राष्ट्रभक्तीपर गीत सादर केले, ज्याला शिक्षक महेश मसराम यांनी संगीताची साथ दिली. या सादरीकरणाने वातावरण अधिकच देशभक्तीमय झाले. यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक प्रभाकर उईके, प्रा. वंदना बारई, प्रा. श्रावण राठोड, प्रा. अभय मकेश्वर, प्रा. गणपत तिजारे, ज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी पाटील, अरुणा चरडे, जेसिका स्थूल, हेमंत माटे, वैशाली बाळसराफ, मिलिंद मून तसेच लिपिक मेघना तायेडे, प्रथमेश साटोटे, संतोष राऊत, पांडुरंग टेकाम व अतुल सोनवणे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना अधिक दृढ करत राष्ट्रनिष्ठेचा संदेश दिला.

# ‘यशवंत चौक’ की भ्रष्टाचाराचा चौक, तिहेरी खर्चाने सेलूकरांची लूट; प्रशासन झोपेत



**सेलू जनमाध्यम :** शहराच्या मध्यवर्ती असलेल्या यशवंत चौक येथील विकासकामांचा बोजवारा उडाला असून, सौंदर्यीकरण’च्या नावाखाली जनतेची उघड लूट सुरू असल्याचा संतप्त आरोप नागरिकांकडून केला जात आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेला भुयारी उड्डाणपूल, त्यानंतर त्याचे पाडकाम आणि आता रखडलेले रस्ते काम या तिहेरी खर्चामुळे नागरिकांच्या खिशाला जबर फटका बसला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, तांत्रिक त्रुटींमुळे पाडण्यात आलेल्या पुलाचा मलबा ठेकेदाराने विकल्याची चर्चा रंगत आहे. शासनाच्या पैशातून उभारलेल्या बांधकामाचा राडारोडा विकण्याचा अधिकार ठेकेदाराला कोणी दिला, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

हा प्रकार केवळ निष्काळजीपणाच नव्हे, तर संगनमताचा संशय निर्माण करणारा असल्याचे बोलले जात आहे. गेल्या दोन वर्षांपासून रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत पडून आहे. धुळीचे ढग, खड्डेमय रस्ते आणि सतत होणारे अपघात यामुळे नागरिकांचे जगणे त्रासदायक झाले आहे. धुळीमुळे डोळे, कंबर व सांधेदुखीच्या तक्रारी वाढल्या असून, व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. वाहनधारकांना दुरुस्तीचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. सर्व्हिस रोडची कोणतीही व्यवस्था न करता काम हाती घेतल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मात्र मौन बाळगून असल्याने संताप अधिकच वाढला आहे. हेच सौंदर्यीकरण असेल, तर ती जनतेची क्रूर थट्टा आहे, अशा शब्दांत नागरिकांनी रोष व्यक्त केला. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन ढिम्म असल्याने आता न्यायालयीन लढाईचा इशारा देण्यात आला आहे. तिहेरी खर्चाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि तात्काळ दर्जेदार रस्ता पूर्ण करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १५६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जिल्ह्यात बारावीच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

## जि.प.महाविद्यालयाची दमदार कामगिरी

**नांदगाव पेठ/वार्ताहर**

येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने बारावीच्या निकालात यंदाही भक्कम कामगिरी करत ६५.४५ टक्के निकालाची नोंद केली आहे. मर्यादित साधनसामग्री, ग्रामीण पार्श्वभूमी आणि स्पर्धात्मक वातावरणात खासगी संस्थांशी टक्कर देत जि.प. शाळेने हा निकाल मिळवला असल्याने या यशाचे विशेष महत्त्व अधोरेखित होत आहे.महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत गुणवत्ता आणि शैक्षणिक दर्जा आजच्या स्पर्धात्मक युगातही प्रथमस्थानी ठेवला आहे. आरती प्रवीण डोईफोडे हिने ८२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. शासनाच्या 'कॉपीमुक्त अभियान' अंतर्गत कडक शिस्तीत परीक्षा पार पडूनही विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून हे यश मिळवले आहे.



यावर्षी ६० पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, १ विद्यार्थिनी डिस्टिंक्शन, ४ प्रथम श्रेणी, २२ द्वितीय श्रेणी आणि ९ पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. आरती प्रवीण डोईफोडे हिने ८२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. मुस्कान अशोक खरुले (६९.५०%) हिने द्वितीय, तर धनश्री रघुवंशी (६३.१७%) हिने तृतीय क्रमांक मिळविला. रेवती इंगळे हिने ६२.६७ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या जि.प. शाळांच्या क्षमतेचा हा निकाल प्रत्यय देणारा असून, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले आहे.या यशाबद्दल प्राचार्य देवेंद्र ठाकरे, पर्यवेक्षक सुनील राऊत, प्रा. डॉ. उल्हास घारड, शितल अटाळकर, फाळके सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## श्री देवराव दादा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान विभाग शाखेचा निकाल

**तिवसा**-तालुक्यातील श्री देवराव दादा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखेचा निकाल १००% लागलेला आहे.विज्ञान



शाखेत एकुण ९५ विद्यार्थी होते त्यापैकी ९५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते.व त्यापैकी अमित रविंद जिरापुरे हा विद्यार्थी प्रथम आला असून बाकी सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले.प्राविण्य श्रेणीत २ विद्यार्थी व प्रथम श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अमित रवींद्र जिरापुरे ८०%गुण घेवून महाविद्यालयात प्रथम आलेला आहे.तर श्रवण संजय कुबडे ७९% घेवून दुसरा व दीप गजानन मोरे ७४.% गुण घेऊन महाविद्यालयात गुणानुक्रमे तिसरा आलेला आहे. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले.त्यामुळे या शाखेचा सुध्दा निकाल १०० लागला आहे.अशा पध्दतीने महाविद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या अभुतपुर्व यशाबद्दल श्री गणेशदास राठी छात्रालय समिति अमरावती चे अध्यक्ष वसंतबाबु मालपाणी,संस्थेचे उपाध्यक्ष जुगलकिशोर गट्टाणी,सचिव डॉ गोविंद जी लाहोटी, कोषाध्यक्ष प्रकाश जी हेडा,सहसचिव मोहनकुमार कलंत्री, प्रशासकीय अधिकारी डॉ आभा लाहोटी, महाविद्यालयाचे प्राचार्य चौधरी सर, पटेल सर पंचारीया सर,पवन हेडा सर,वर्ग शिक्षक करवा मॅडम,योगेश हेडा,उमाळे मेडम जोशी सर,वैशाली अविनाशे मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जगदंब ज्युनिअर सायन्स कॉलेजची संस्कृती घायर प्रथम

**चांदूरबाजार/वार्ताहर**

स्थानिक जगदंब ज्युनिअर सायन्स कॉलेजने, बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ५८ विद्यार्थ्यांनी ७५ पेक्षा जास्त गुण मिळवत, यश संपादन केले आहे.

शाळेतील शिक्षकांचे परिश्रम व विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील सातत्याने,हे उत्तुंग यश प्राप्त झाले आहे. बारावीच्या परीक्षेत संस्कृती पी. घायर (८५.६७%) हिने, शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच शाळेतील सक्षम एन. राऊत (८३.६७%) द्वितीय, तर लाजरी एस. गनवीर (८३.३३%) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.इतर प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये इश्वरी मोहोड (८२.८३%), सामिया सौदागर (८२.६७%), जानवी पाडोळे (८२.५०%), स्वरा सांगेकर (८२.३३%), स्वरा देशमुख (८२.१७%), शर्वरी कोंडे



(८१.६७%), कृष्णा महल्ले (८१.५०%), आयुशी गावणेर (८१.३३%), सोहम देऊलकर (८१.१७%), भूमी नीचत (८१%), स्मित तायवाडे (८१%), अनिरुद्ध कोंडे (८०.८३%), अनुष्का अधाऊ (८०.६७%), मृणली सूर्यवंशी (८०.६७%), कुंजल बोबडे (८०.५०%), मनश्री मंगळे (८०.५०%), तेजश्री कथे (८०.५०%), स्वरा मेश्राम (८०.३३%), गुंजन मेश्राम (८०%) यांचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष विनोद कोरडे, संचालक मनोज कटारिया, सचिव छाया कोरडे, ज्ञानेश्वरी कोरडे, मनीष एकलारे, उदय देशमुख, दत्ता देशमुख,प्राचार्या कीर्ती ठाकरे, तसेच विभागप्रमुख सौरभ खाजोने, उमेश सोनी, सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## या.द.व. देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**तिवसा** -या.द.व. देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १२ वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे. वाणिज्य शाखेचा



निकाल याही वर्षी १००% लागला असून कला शाखेचा निकाल ९०.००% टक्के लागला. महाविद्यालयाचा एकत्रित निकाल ९५.७३ ३ लागला आहे. वाणिज्य शाखेमधून कुमारी तनुजा नंदकुमार ढोरे हिने ८४.८३३ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. कुमारी तन्वी प्रकाश दौड हिने ७५.५०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला. कुमारी डिंपल किरण भागडे यांनी ७५.००% गुण मिळवून तिसरा क्रमांक कमविला.कला शाखेमधून अनुराग भवनदास गाडगे यांनी ७८.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. कुमारी हर्षदा सुरेंद्रराव चामट हिने ७५.५०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला तर हरीओम किशोर कामलकर यांने ६९.३३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला महाविद्यालयाने याही वर्षी उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर हेमंत देशमुख, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. योगेश देशमुख प्रा. गौरी गनोरकर प्रा. वृषाली जगताप प्रा. खुशबू कुथे प्रा. पूजा भोयर प्रा. राजकुमार तिडके प्रा. भरत गोंजारे आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अरूणोदय ज्यु. कॉलेजचा १०० टक्के निकाल

**अमरावती** - वि.म.वि. परिसरातील अरुणोदय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स इयत्ता १२ वी बोर्डाच्या फेब्रुवारी २०२६ परिक्षेचा निकाल जाहिर झाला. अरूणोदय ज्यू. कॉलेज ऑफ सायन्सचा निकाल १०० टक्के लागला.

मैत्री राजेश बोदीले, मोहम्मद अंझर कुरेशी,चतुर्थी विनोद भुंबर, आकांक्षा मुकूंद माहोरे, अनुज सतिश नाईक, सेजल गजानन राऊत, मिताली मंगेश फलटनकर, वसुंधरा शंतनू वानखडे यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले.अरुणोदय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या यशाबद्दल अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे पाटील, सचिव डॉ. भारती वसंत लुंगे पाटील यांनी अरुणोदय ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत, प्राविण्यप्राप्त विद्यार्थी व शिक्षकवृंदांचे अभिनंदन केले.

## कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९०:३८ टक्के

**खल्लार** - येथिल कनिष्ठ कला महाविद्यालयाचा (१२) निकाल हा ९०:३८ टक्के लागला असून १२ वीच्या परीक्षेला एकुण ५२ विद्यार्थी बसले होते.

यात प्रथम श्रेणीत ११ द्वितीय श्रेणीत ११ तर तृतीय श्रेणीत ४ विद्यार्थी असे एकुण ४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले आहे.



## सरहद गांधी उर्दू हायस्कूल, शेख मिरन ज्यू. कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**कुऱ्हा** - नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी परीक्षेच्या निकालात कुऱ्हा येथील सरहद गांधी उर्दू हायस्कुल व शेख मिरन उर्दू ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यंदाही यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ६७.५६% टक्के लागला आहे .

ज्यामध्ये जारिया तस्कीन रियाज अहमद शेख ८२.८३% टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. फलक नाज जाकीर अहमद ८२.६७% टक्के गुणांसह द्वितीय आणि अशमीरा कशफ अब्दुल अजीज ८०.६७ % टक्के मिळवून तिसरा क्रमांक पटकावला, तसेच सय्यदा रामिश अल्मास सैयद कैसर ७७.५० % टक्के गुण मिळवून चौथा क्रमांक पटकाविला.जुबिया फातेमा सरफराज खान ७६.८३ % टक्के गुण प्राप्त केले.

सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद हारून मो. मुश्ताक, प्राचार्य अनिस अहमद खान आणि सर्व शिक्षकांना दिले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मो. हारून मो. मुश्ताक, सचिव मोहम्मद अहफाज, प्राचार्य अनिस अहमद खान आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालयाचे सुयश



**तिवसा** - स्थानिक कृष्णाबाई दंडाळे कन्या उच्च माध्यमिक विद्यालयाने बारावीच्या परीक्षेमध्ये यशाची परंपरा कायम ठेवत बारावी च्या निकालामध्ये भरघोस यश मिळवले आहे. कला विभागातून कु. कशीश हरीभाऊ कठाणे हिने(५२४) ८७.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. कु. सानिया राजकुमार लव्हाळे हिने(५१२) ८५.३३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक व पल्लवी किशोरराव वराठी हिने(४९२) ८२ % टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे.

विज्ञान विभागामध्ये कु. महेक तसलीम खा पठाण हीने(४९७) ८२.८३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक, कु. गौरी चतुरसिंग बंडवाल हिने(४५८) ७६.३३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक व कु. गायत्री संजय कुथे हिने(४३६) ७२.६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. कला विभागाचा व विज्ञान विभागाचा निकाल १०० टक्के लागलेला आहे.संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे योग्य मार्गदर्शन, मुख्याध्यापिकेचे कुशल नेतृत्व व शिक्षक लोकांच्या मेहनतीमुळे हे सर्व शक्य झाले आहे.सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे विवेक संस्थेचे अध्यक्ष गंगाधररावराव दंडाळे, सचिव विद्याधरराव दंडाळे, संस्थेच्या सदस्या छायाताई दंडाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रा. जयश्री सोनारे, शाळेचे पर्यवेक्षक प्रा. एस व्ही बुरघाटे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

## मराठी हिंदी कवितांचा अनोखा संगम! 'प्रभात' सभागृहात रंगली काव्यसंध्या

**अमरावती (प्रतिनिधी )**

महाराष्ट्र दिन कामगार दिन तथा बुद्ध पौर्णिमा दिनाचे औचित्य साधून स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ, अमरावती जिल्हा तथा प्रभात एज्युकेशन सोसायटीच्या वतीने प्रभातच्या सभागृहात मराठी -हिंदी काव्य संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ आणि प्रभात एज्युकेशन सोसायटीच्या वतीने समतापर्व कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यातीलच एक पर्व हा काव्यसंध्या कार्यक्रम. या अध्यक्ष प्रभात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वि .दा. पवार तर उद्घाटक नरेंद्र देवरणकर निर्दोष हे होते. प्रमुख अतिथी म्हणुन नगरसेविका सौ. अर्चना अशोक पांडे, नगरसेवक योगेश रघुनाथ विजयकर, भुषण अरविंद पाटणे, संस्थासचिव सौ .कविता विलास पवार, स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर, दर्यापूर तालुका अध्यक्ष विजय हरणे, पाटील विचारपीठावर उपस्थित होते. काव्य संध्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ कवी गझलकार अब्दुल समद रजा होते. महामानवांच्या प्रतिमेचे पूजन तथा दिपप्रज्वलाने या काव्य संध्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी संजय सरवटकर यांनी राबविण्यात येत असलेल्या समतापूर्व कार्यक्रमाची माहिती आपल्या प्रास्ताविकामधून दिली. या मराठी हिंदी काव्य संमेलनात नामांकित कवी नरेन्द्र देवरनकर ,हनुमान गुजर, गंभीर, शिवा प्रधान, निलिमा भोजने, नर्गिस अली, कल्पना विघे, भास्कर काळे, विद्रोही,अविनाश गोंडाने, प्रविण कांबळे, शब्दास्त्र, सुनील घटाळे, वऱ्हाडी कवी राजेश महल्ले यांनी त्यांच्या बहारदार कविता प्रस्तुत करून रसिक श्रोत्यांची वाहवा मिळवली. काव्य संध्या कार्यक्रमाचे खुमासदार मंच संचालन कवी प्रीतम जोनपुरी तर आभार उषा जैन यांनी मानले. कार्यक्रमाला श्रीकृष्ण नाईक, यु.एम.रामटेके, राजु कांडलकर, सुरेश मोहोड,सुशीला जुनघरे,अरुणा पवार, कोमल अमोल बेलसरे , वैशाली गजानन कांडलकर, अमृता संजय जुनघरे, संजय वाघुळे,सनशाइन इंग्लिश स्कूलच्या, मुख्याध्यापिका माधुरी नेरकर, अब्दुल अरमान अब्दुल अकबर, सहाद खान साजिद खान, शेख उजेर, मुसैफ खान, यांचेसह मोठ्या संख्येने रसिक श्रोते उपस्थित होते.

## जि.प.प्राथमिक मराठी शाळा येथे महाराष्ट्र वर्धापन दिन साजरा

**खल्लार**-वडूरा येथिल जिल्हा परिषद उच्च माध्यमिक प्राथमिक शाळेत ६६ वा महाराष्ट्र दिन हर्षउल्हासात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य देवानंद भोरखडे,आशा चव्हाण, उमेश पंडीत,अमोल पंडीत,नामदेवराव चव्हाण उपस्थित होते.प्रथम राष्ट्रीय गान वंदे मातरम् घेण्यात आले.त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका वनमाला शेवतकर यांनी ध्वजस्तभाचे पूजन करून ध्वजारोहण केले. राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगिताचे गायन करण्यात येऊन राज्य गितांचे गायन करण्यात आले.महाराष्ट्र राज्याचा गौरवशाली इतिहास शाळेचे शिक्षक विजय मकेश्वर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विस्तृत रूपात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.



वर्षभर विद्यार्थी विविध प्रकारच्या स्पर्धेमध्ये सहभागी होतात .त्यांचे कौशल्य कर्तृत्व व त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांची एक वेगळीच छाप सोडतात .अशा विद्यार्थ्यांचा व त्यांच्या कलागुणांचा गुणगौरव व्हावा म्हणून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन तसेच विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्याकरिता घेण्यात आलेले विविध उपक्रम याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करून शाळेविषयी असलेली तळमळ आणि पुढील वाटचाली करीता सहकार्य देण्याचे आश्वाशित केले कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका वनमाला शेवतकर, शिक्षक विजय मकेश्वर, अंगणवाडी सेविका मिर्ना उंबरकर,अंगणवाडी सेविका मदतनीस चैताली काळे, प्रधानमंत्री पोषण आहार योजना सेविका सुलभा नांदणे,प्रधानमंत्री पोषण आहार सेविका मदतनिस प्रतीक्षा हरणे यांनी परिश्रम घेतले. त्याबद्दल शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका वनमाला शेवतकर, विजय मकेश्वर यांनी त्यांचा विशेष सन्मान केला.

## नांदरुन येथे विविध उपक्रमांनी बुद्ध जयंती उत्साहात



**खल्लार** - नांदरून येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. बुद्ध वंदना, धम्मपाठ, विचार प्रबोधन कार्यक्रम तसेच इतर आयोजन सुद्धा करण्यात आले. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत बुद्धांच्या शिकवणीचा जागर केला.

संध्याकाळी गावातून भव्य कॅण्डल रॅली काढण्यात आली. यात युवक, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'बुद्धं शरणं गच्छामि'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. रॅलीमुळे गावात शांतता, बंधुता आणि समतेचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संदीप रायबोले, अशोक रायबोले, अविनाश रायबोले, उमेश रायबोले, श्रीकृष्ण रायबोले, दिनेश रायबोले,लक्ष्मण रायबोले, रामदास रायबोले, विद्याधर रायबोले, आचल रायबोले,राजेश्री रायबोले, अर्चना रायबोले ललिता रायबोले, कमला रायबोले, सुनिता रायबोले, वंदना वानखडे, सुधाबाई रायबोले, पदमा रायबोले, व ग्रामस्थ व युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## बी.एस.पाटील महाविद्यालयाला 'एनईपी.स्कूल कनेक्ट' उपक्रमासाठी पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाला सात गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 'नाविन्यपूर्ण उपक्रम - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्कूल कनेक्ट पुरस्कार १ मे विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त प्रदान करण्यात आला.

'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, अमरावती या महाविद्यालयाला रु. ५००१/- रोख पुरस्कार देऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सन्मानिय कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर यांचा शाल श्रीफळ, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम ५००० देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे एनईपी मास्टर ट्रेनर प्रा.डॉ.प्रमोद गारोडे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ अविनाश असनारे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एच.आर.देशमुख, अधिष्ठाता डॉ.वैशाली गुळधें, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदूरकर उपस्थित आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्याबद्दल भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा या महाविद्यालयाची 'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी निवड झाली आहे, ही संपूर्ण अचलपूर तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. महाविद्यालयाने राबवलेला एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' हा

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे गौरव



उपक्रम केवळ कागदावर मर्यादित न राहता, तो प्रत्यक्ष जमिनीवर उतरवणारा एक पथदर्शी प्रकल्प ठरला आहे. अचलपूर तालुक्यातील ३२ कनिष्ठ महाविद्यालयांपर्यंत पोहोचून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्व पटवून देणे, हे या महाविद्यालयाच्या व्यापक दृष्टीकोनाचे प्रतीक आहे. या उपक्रमाद्वारे जवळपास १४०० हून अधिक विद्यार्थ्यांना बदलत्या शिक्षण पद्धतीचे, बहुविध प्रवेश व निर्गमन (मल्टीपल एन्ट्री ॲन्ड एक्झिट) आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चे मास्टर ट्रेनर प्रा डॉ प्रमोद गारोडे यांच्या कुशल नियोजनात व नेतृत्वात त्यांच्या संपूर्ण टीमने घेतलेले परिश्रम आज फळाला आले आहेत. विद्यार्थी आणि पालकांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल असलेल्या शंका दूर करून, त्यांच्यात सकारात्मकता निर्माण करण्याचे मोलाचे कार्य या महाविद्यालयाने केले आहे. केवळ पदवी देणे हे उद्दिष्ट न ठेवता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एन.ई.पी. चा प्रभावी वापर कसा करता येईल, याचे उत्तम उदाहरण या महाविद्यालयाने मांडले आहे. महाविद्यालयाला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सहभागी झालेल्या ३२ शाळा-महाविद्यालयांच्या सांघिक परिश्रमाची पावती आहे. अचलपूर सारख्या ग्रामीण व निमशहरी भागात अशा प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे, इतर शैक्षणिक संस्थांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाचे पुनःश्च मनःपूर्वक अभिनंदन ! भविष्यातही हे महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात असेच नवनवीन मानदंड प्रस्थापित करेल, अशी खात्री आहे. . महाविद्यालयाला मिळलेल्या पुरस्काराबद्दल भारतीय विद्या मंदिराच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ आराधनाताई वैद्य, उपाध्यक्ष प्रा डॉ रमेशराव बिजवे, प्रा डॉ सतीश कुळकर्णी, सरचिटणीस डॉ प्रशांत भागवतकर, कोषाध्यक्ष अनंतराव सोमवंशी तसेच कार्यकारिणी सदस्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे अभिनन्दन करून शुभेच्छा दिल्यात.

# खनिजाचे गौण अन् अधिकाऱ्यांचे मौन

## कोट्यवधींचा महसूल गिळंकृत; अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर व रुदाळी परिसर सध्या गौण खनिज उत्खननाच्या नावाखाली सुरू असलेल्या मोठ्या घोटाळ्यामुळे चर्चेत आला आहे.

शासकीय अहवालांनीच गंभीर अनियमितता उघड केल्यानंतरही संबंधित यंत्रणा मात्र जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे स्पष्ट चित्र आहे. कोट्यवधी रुपयांच्या दंड वसुलीची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवत प्रशासनाने नेमके कोणाचे हित जपले आहे, हा प्रश्न आता जनतेतून जोरदारपणे उपस्थित केला जात आहे.

अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीअंतर्गत नरनाळा अभयारण्याच्या सीमेलगत असलेल्या या भागात खनिज संपत्तीवर अक्षरशः तुटून पडल्याचे दिसते. आदिवासी बांधवांच्या जमिनी पोटखराब दाखवून त्या अकृषक करण्यात आल्या आणि त्यानंतर खाण परवानग्या मिळविण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. मात्र हा सगळा प्रकार केवळ कागदोपत्री मर्यादित राहिला नाही, तर प्रत्यक्षात परवान्याच्या अनेक पट अवैध उत्खनन करून शासनाच्या महसुलाला मोठा फटका देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, या सर्व अनियमिततेची नोंद अधिकाऱ्यांनी स्वतःच्या अहवालात केली आहे. मोजमाप झाले, दंड आकारणी झाली; पण पुढे वसुलीच्या टप्प्यावर मात्र फाईल्स थंड बस्त्यात टाकण्यात आल्या. कोट्यवधी रुपयांची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करण्याऐवजी संबंधित अधिकारी केवळ कागदी हालचाली करत असल्याचे चित्र आहे. ही निष्क्रियता की जाणूनबुजून दिलेली मुभा, याचा उलगडा होणे अत्यावश्यक आहे.

### ■ बेकायदेशीर ब्लास्टिंगने हादरला परिसर

या खदानींमध्ये मोठ्या प्रमाणात जिलेटीन व डिटोनेटरचा वापर करून स्फोटक ब्लास्टिंग करण्यात आले आहे. मात्र यासाठी आवश्यक असलेली डीजीएमएसची कोणतीही वैध परवानगी घेण्यात आलेली नाही. इतकेच नव्हे, तर नियमांनुसार आवश्यक असलेले पात्र ब्लास्टर आणि प्रबंधक यांची नियुक्तीही करण्यात आलेली नाही. डीजीएमएस विभागाने खणीकर्म विभागाला स्पष्ट निर्देश देऊन अशा खदानी तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले असतानाही स्थानिक अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. सततच्या बेकायदेशीर ब्लास्टिंगमुळे परिसरातील घरे हादरू लागली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जमिनीची धूप, पाण्याचे स्त्रोत आटणे आणि पर्यावरणीय समतोल बिघडणे या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः नरनाळा अभयारण्यालगत सुरू असलेल्या या कारवायांमुळे वन्यजीवांनाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

### ■ बेनामी व्यवहारांचा साखळी स्फोट

गाजीपूर व रुदाळी परिसरातील खदानींमध्ये सुरू असलेले बेनामी व्यवहार हे या प्रकरणातील सर्वात मोठे आणि गंभीर अंग ठरत आहे. आदिवासी बांधवांच्या नावावर परवाने घेऊन प्रत्यक्षात आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती किंवा गट हा संपूर्ण व्यवसाय चालवत असल्याची जोरदार चर्चा आहे. खाणकामासाठी लागणारी कोट्यवधींची यंत्रसामग्री, व्यवस्थापन आणि आर्थिक उलाढाल पाहता, नावावर असलेले लाभार्थी केवळ 'मुखवटे' असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सक्त अंमलबजावणी संचालनालय (ED) किंवा इतर केंद्रीय तपास यंत्रणेकडून चौकशीची मागणी आता जोर धरत आहे.

याहून धक्कादायक बाब म्हणजे, ज्या खाणधारकांकडे कोट्यवधींची थकबाकी आहे, त्यांनाच नव्या उद्योगांसाठी परवानग्या देण्याचे प्रकार सुरू आहेत.

महसूल वसुलीचा बोजा बाजूला ठेवत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना पुन्हा संधी देणारे प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. यामुळे शासनाच्या धोरणांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट दिसते.

एकूणच, अकोट तालुक्यातील हे संपूर्ण प्रकरण केवळ स्थानिक पातळीवरील गैरप्रकार नसून मोठ्या प्रमाणात आर्थिक, पर्यावरणीय आणि प्रशासकीय भ्रष्टाचाराचे जाळे असल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने यावर तातडीने कठोर कारवाई न केल्यास जनतेचा रोष अनावर होण्याची शक्यता आहे. आता तरी शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

# टाकळी जहागीरमध्ये वरातीत नाचण्यावरून दोन गटात राडा

## लोखंडी रॉड,चाकूंसह रक्तरंजित हल्ला; आरोपी जेरबंद

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** टाकळी जहागीर गावात लग्नाच्या आनंदोत्सवावर अक्षरशः हिंसाचाराचे सावट पसरल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. किरकोळ कारणावरून सुरु झालेला वाद मध्यरात्री भीषण हल्ल्यात परिवर्तित झाला आणि संपूर्ण गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. बौद्ध विहारावर झालेल्या दगडफेकीमुळे प्रकरण अधिकच गंभीर बनले असून काही काळ गाव तणावाच्या छायेत गेले होते.लोखंडी रॉड, चाकूने हल्ला चढवीत आरोपींनी परिसरात दहशत माजविण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अक्षय सोनोने यांच्या भावाचे रविवारी लग्न असल्याने शनिवारी २ मे रोजी सायंकाळी गावात वरात निघाली होती. रात्री सुमारे १० वाजता टाकळी बाजार परिसरात वरात पोहोचली. यावेळी डीजेच्या आवाजावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून अक्षय प्रकाश सोनोने यांनी मध्यस्थी करत वाद शांत केला. मात्र, हा वाद फक्त वरवर शांत झाला होता.दरम्यान, मध्यरात्री सुमारे १२:३० वाजण्याच्या (पान २ वर)



### ■ क्यूआरटीसह पोलीस बंदोबस्त

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आरसीपी, क्यूआरटी तसेच मुख्यालयातून अतिरिक्त पोलिस बंदोबस्त टाकळी येथे तैनात करण्यात आला. फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलास पुंडकर तसेच डीसीपी गणेश शिंदे यांनीही पोलिस ठाण्यात धाव घेतली.

### बुद्धवंदना घेऊन शांतता राखण्याचे आवाहन

पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजबांधवांनी बुद्धविहाराची स्वच्छता करून त्याठिकाणी बुद्धवंदना घेण्यात आली. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन यावेळी पो.नि. दिनेश दहातोंडे यांनी केले.

# परतवाडातील लक्कड बाजारात आदर्श प्लायवूड दुकानाला भीषण आग

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील लक्कड बजार येथे आज ३ मे रोजी सायंकाळी ८ दरम्यान आदर्श प्लायवूड दुकानाला भीषण आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली . यावेळी अचलपूर नगर परिषदेचे अग्निशमन दलाचे वाहन दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवीण्याचे प्रयत्न वृत्त लिहेपर्यंत सुरू होते. या घटनेमुळे अचलपूर - परतवाडा मार्गावर वाहतूक व्यवस्था काही काळासाठी विस्कळीत झाली होती .अनेक दुचाकी , चार चाकी वाहन रस्त्यावर उभ्या राहून नागरिकांची प्रचंड गर्दी घटनास्थळी निर्माण झाली होती .यामुळे वाहतूक



पोलीस कर्मचारींना वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी मोठी कसरत करावी लागल्याचे चित्र होते .त्या दुकानात शॉर्ट सर्किट मुळे आग लागल्याची प्राथमिक (पान २ वर)

■ या घटनास्थळी नागरिकांची प्रचंड गर्दी असल्याने अग्निशमन दलाचे वाहन व पोलीस कर्मचाऱ्यांना गर्दी बाजूला करण्यामध्ये अनेक अडचणीचा सामना करावा लागला. आग अनेक दुकानांना लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. नेमकी ही आग कशी लागली ? हे तपासानंतर समोर येणार आहे. मात्र अचलपूर नगर परिषद अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी उशीरा दाखल झाल्याची नागरिकात चर्चा आहे .

# रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर 'मकोका'ची कारवाई करणार

## कायदा हातात घेणाऱ्यांना एसपी कदम यांचा कडक इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील गुन्हेगारीला कुठल्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. रेकॉर्डवरील गुन्हेगारांविरुद्ध 'मकोका', तडीपार यांसारख्या कठोर उपाययोजना राबविण्यात येतील, असा स्पष्ट इशारा अमरावती ग्रामीणचे नवे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिला. मंथन हॉल येथे रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

कदम यांनी सांगितले की, जात-पात किंवा धर्म न पाहता कोणत्याही असामाजिक प्रवृत्तीला पाठीशी घातले जाणार नाही. भ्रष्टाचार, अवैध धंदे आणि कायदा हातात घेण्याच्या घटनांवर कठोर कारवाई केली जाईल. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांना त्वरित न्याय मिळवून देणे हीच पोलिसांची सर्वोच्च जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील निमफुले गावचे रहिवासी असलेले निकेतन कदम यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. प्रारंभी त्यांनी आयटी क्षेत्रात नोकरी करत आर्थिक स्थैर्य मिळवले आणि त्यानंतर यूपीएससीची तयारी सुरू केली. तिसऱ्या प्रयत्नात २०१९ मध्ये



त्यांनी आयपीएस पद मिळवले. यापूर्वी लातूर येथे एएसपी आणि नागपूर येथे डीसीपी म्हणून त्यांनी सेवा बजावली आहे. जिल्ह्यातील तरुणाईला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याचे कदम यांनी सांगितले. गांजा, एमडी, चरस यांसारख्या अंमली पदार्थांच्या विक्री व तस्करीविरुद्ध कडक भूमिका घेतली जाईल. केवळ विक्रेत्यांवरच नव्हे, तर मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचून कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मेळघाट आणि धारणी परिसराशी आपले जुने नाते असल्याचे कदम यांनी सांगितले. धारणी येथे कार्यरत असताना त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वाचनालय सुरू केले होते. त्या उपक्रमाचा फायदा घेत अनेक विद्यार्थी आज शासकीय सेवेत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. अल्पवयीन मुलांवर सोशल मीडियाच्या होणाऱ्या दुष्परिणामांबाबत पोलिसांकडून जनजागृती केली जाणार आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये समुपदेशन करून 'गुड टच-बॅड टच' तसेच सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन (पान २ वर)

# मातीतच अंतिम समर्पण : गाठे कुटुंबियांचा पर्यावरणपूरक निर्णय

## अस्थी-विसर्जनाच्या प्रथेला एक नवा पर्याय

**परतवाडा/प्रतिनिधीः-** समाजात पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या रूढी-परंपरांना कधी नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असते, याचे प्रत्यंतर देणारी एक वेगळी घटना अचलपूर तालुक्यात घडली आहे. पत्रकार राहुल गाठे यांचे वडील स्वर्गीय दिगंबरराव गाठे यांचे ३० एप्रिल २०२६ रोजी हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १ मे रोजी पारंपरिक विधीनुसार अग्निदहन करण्यात आले. मात्र त्यानंतरच्या अस्थी-विसर्जनाच्या प्रथेला कुटुंबियांनी एक नवा पर्याय स्वीकारत सामाजिक चर्चेला वाव दिला.



सामान्यतः हिंदू, बौद्ध धर्मीयांमध्ये अंत्यविधीनंतर अस्थी व राख नदीत विसर्जित करण्याची परंपरा आहे. परंतु गाठे कुटुंबियांनी या रूढीला फाटा देत पर्यावरणपूरक आणि भावनिक दृष्टिकोनातून वेगळा निर्णय घेतला. (पान २ वर)

# पॅरोलवर जाण्यासाठी कैद्याने दिले बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र

## कारागृहात पुन्हा बनावट कागदपत्रांचा प्रकार

### -फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** पॅरोलवर रजा मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रांचा आधार घेतल्याचा एक प्रकार पुन्हा अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात उघडकीस आला आहे. कारागृह प्रशासनाने केलेल्या तपासणीत एका शिक्षाबंदीने सादर केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र खोटे असल्याचे उघड झाले. या प्रकरणी शनिवारी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात स्वप्निल अजाबराव खरपे (वय ३९) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आला. वडिलांच्या उपचारासाठी पॅरोलवर रजा मिळावी या हेतूने खरपेने कारागृह प्रशासनाकडे अर्ज केला होता. अर्जासोबत जिल्हा सामान्य रुग्णालयातून जारी केल्याचे दर्शविणारे वैद्यकीय



प्रमाणपत्रही जोडले होते. दरम्यान, कारागृह प्रशासनाने या प्रमाणपत्राची शहानिशा करण्यासाठी संबंधित रुग्णालयाशी संपर्क साधला. तपासणीअंती असे स्पष्ट झाले की, संबंधित प्रमाणपत्र त्या रुग्णालयाकडून जारी करण्यात आलेले नाही. त्यामुळे सादर केलेले दस्तऐवज बनावट असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी कारागृह विभागातील (पान २ वर)

# पोलिस पाटलांचा प्रामाणिकपणा, पाच हजार केले परत



## दर्यापूर बाजार समितीतली घटना

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत प्रामाणिकपणाचा आदर्श घडविणारी घटना नुकतीच घडली. अडत्याचे हरविलेले पाच हजार रुपये चांदई येथील पोलिस पाटील यांनी परत करुन प्रामाणिकपणा अजूनही असल्याचे दाखवून दिले.

शिवर येथील मंगेश बाळासाहेब देशमुख हे दर्यापूर बाजार समितीमध्ये अडते म्हणून कार्यरत असून त्यांचे पाच हजार रुपये हरवले होते.ती रक्कम चांदई येथील पोलिस पाटील गजानन धुमाळे यांना सापडली. त्यांनी लगेच कोणताही मोह न ठेवता प्रामाणिकपणे सदर रक्कम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जमा केली. त्यानंतर संबंधित रकमेची शहानिशा करुन ती रक्कम मालकाला परत देण्यात आली.

या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, प्रभारी सचिव आगरकर , अडते गुणवंत पाटील गावंडे, विनायकराव (पान २ वर)

# कूलरचा शॉक लागल्यामुळे युवकाचा मृत्यू

## जळका पटाचे येथील घटना

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील जळका पटाचे परिसरात कूलरमधील विजेच्या धक्क्यामुळे एका युवकाचा मृत्यू झाला. संतोष माणिकराव राऊत (वय ३२) असे मृताचे नाव आहे.

माहितीनुसार, संतोष राऊत हे घरात एकटेच राहत होते. त्यांच्या आई-वडिलांचे पूर्वीच निधन झाले असून दोन्ही बहिणींचे विवाह झालेले आहेत. ३० एप्रिल रोजी एका लग्न समारंभातून परतल्यानंतर त्यांनी घर आतून बंद केले होते. त्यानंतर



दोन दिवस त्यांच्याशी कोणताही संपर्क झाला नाही. २ मे रोजी त्यांच्या घरातून तीव्र दुर्गंधी येऊ लागल्याने शेजाऱ्यांनी परिस्थितीची पाहणी केली. घरात डोकावून पाहिल्यावर संतोष यांचा मृतदेह पडलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांच्या हाताचा कूलरच्या पाण्याशी संपर्क असल्याचे दिसून आले, तसेच कूलरच्या (पान २ वर)

# ११ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

## महिनाभर दडपलेले प्रकरण उघड

**वर्धा/प्रतिनिधीः-** गावातील ११ वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. सुमारे महिनाभरापूर्वी घडलेली ही घटना दडपून ठेवण्यात आल्याचा आरोप होत असून, पीडितेच्या आईने तक्रार दाखल केल्यानंतर प्रकरण प्रकाशात आले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी पाचवीत शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी ती घरी एकटी असताना आरोपीने तिला आमिष दाखवून आपल्या जवळ बोलावले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी नरेश हिरबाजी दिवे (वय अंदाजे ५०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# शेतकऱ्याचा मुलगा झाला पीएसआय

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदुर रेल्वे तालुक्यातील मांडवा या गावातील शेतकरी रमेश भोमकाळे यांचा मुलगा आशिष रमेश भोमकाळे यांची पोलीस उपनिरीक्षक या पदासाठी निवड झाली आहे. त्यांचे अभिनंदन संपूर्ण गावातील व चांदुर रेल्वे तालुक्यातील युवक युवतीनी मोठ्या उत्साहाने केले.जे मुले -मुली या स्पर्धा परीक्षा करिता सातत्याने प्रयत्न करीत असतात त्यांच्यासाठी एक मोठा आदर्श निर्माण झाला आहे. रमेश भोमकाळे यांचा मुलगा आशिष



रमेश भोमकाळे यांनी mpsc मार्फत पोलीस उपनिरीक्षक ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.रमेश भोमकाळे व पत्नी यांना दोन मुले, एक मुलगी असं त्यांचे कुटुंब आहे. त्यांचे राहते गाव चांदूर रेल्वे तालुक्यातील मांडवा असून त्या गावांमध्यो त्यांच्याकडे चार एकर जमीन आहे. त्या जमिनीवर कुटुंब उदरनिर्वाह करत मुलांच्या शिक्षणासाठी पैसे पुरविण्याचे काम रमेश भोमकाळे यांनी केले. आई वडिलांच्या काबाड कष्टाचे सोनं (पान २ वर)

# कार उलटली; एक ठार, दुसरा जखमी

**कारंजा (घा.) :** भरधाव वेगातील कार अनियंत्रित होऊन उलटल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. ही घटना रविवारी (दि.३ ) दुपारी सुमारे ४ वाजता बोरी पाटी परिसरात घडली.

मृताचे नाव धनराज उर्फ गजा बाबाराव कांबळे (वय ३५, रा. अंजनगाव जिचकार, ता. काटोल) असे आहे. संदीप मुकुंदा राक्षे (वय ३३) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांबळे व राक्षे हे एमएच-३१-०४८८ क्रमांकाच्या




कारने नागपूर मार्गे कन्नमवारग्राम येथे लग्नसमारंभासाठी जात होते. बोरी पाटी जवळ आल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्यालगतच्या नालीत जाऊन उलटली.

अपघातात कांबळे यांचा जागीच मृत्यू झाला. जखमी राक्षे यांना (पान २ वर)